आराजेन्दा प्रत

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय: मा. महासभा सूचना क्र. ०५ दि.०८/१०/२०१८
मा. महासभा शुक्रवार दि. १९/१०/२०१८
रोजी सकाळी ११.०० वाजता
(प्र.क्र. ७३ ते ८५ पर्यंत)

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०८/१०/२०१८

## <u>मा. महासभा</u>

मा. महासभा सुचना क्र. ०५

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. महासभा दि. १९/१०/२०१८ सभा सुचना क्र. ०५

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| ७३ | दि. १८/०७/२०१८ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| ७४ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत. |
| ७५ | भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| ७६ | <u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u><br>अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये हायलँड रस्त्यावरील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी ट्रेंचलेस पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमार्फत पूर्णठेव तत्वावर अंथरणे. |
| ७७ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ७८ | सिल्वर पार्क येथील साईबाबा मंदिरा समोरील चौकास नाव देणे. |
| ७९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरातन शिवमंदिर परिसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परिसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र. १३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे. |
| ८० | राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पायथ्या समांतर ३० मीटर रुंद विकास योजना रस्ता विकसित कामे व नाला बांधणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणे. |
| ८१ | "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" अंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत. |
| ८२ | भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन मधील फुट ओवर ब्रीजवर शेड बांधणे व दुरुस्ती करणेसाठी रेल्वे प्रशासनास रक्कम प्रदान करणेबाबत. |
| ८३ | मौजे नवघर स.क्र.२६७/१ ते ३, २५९/४, २६०/३, २६५/२ ते ४, २६६/१ ते ६ या जागेच्या वापरामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत. |
| ८४ | मौजे भाईंदर स.क्र. ७७१ (जुना), ८१ (नविन), स.क्र. ७७२ (जुना), १११ (नविन) या शासकीय जागा Bus Bay साठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत फेरबदल करणेबाबत. |
| ८५ | मतिमंद मुलांकरिता शाळा बांधणे. |
| ८६ | महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे सण/उत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाजवळ जाहिरात फलक, बॅनर्स यांना परवानगी देणेबाबत. |
| ८७ | मोर्वा येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत. |

| | |
|---|---|
| ९२ | मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. [illegible] या संगणक चालक/लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणेबाबत. |
| ९३ | मतीमंद मुलांना शिकविणा-या व बालवाडी शिक्षकांना शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे. |
| ९४ | शहरातील लेखक, कवी, नाटककार यांच्या कार्यालयाकरीता मिरारोड येथील इंदिरा गांधी हॉस्पिटलमध्ये जागा देणेबाबत धोरण ठरविणे. |
| ९५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखपरिक्षण विभाग यांचेकडील सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत. |
| – | <u>शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे -</u> |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०१८

# ...वर्षी पेक्षा यावर्षी पाऊस कमी; भातसा धरणातील ...होतोय झपाट्याने कमी! मुंबईवर पाणी कपातीचे संकट

सतत पाणी वाहत राहिले. त्यामुळे धरणातील अधिक पाणी सोडण्याचा प्रश्न आला नाही. धरणातील पाणी साठा तसाच राहिल्याने उर्वरित महिन्यात त्याचा वापर करण्यास मिळाला त्यामुळे पाणी कपातीचा मुंबईकरांना जाणवली नाही यावर्षी तालुक्यात तब्ल एक हजार एकशे चौतीस मी. मी. इतका पाऊस कमी पडल्याने पाणी टंचाईची मोठी समस्या निर्माण होणार आहे. सध्या मुंबईला आवश्यक असणारे पाणी हे सध्य स्थितीत १५ मेगावॅट वीज निर्मिती केंद्रातून जाणारे पाणी व नदीत असणारे पाणी व धरणातील ...पाणी देऊन मुंबईची तहान भागवली जात आहे. मुंबईला सर्वात जास्त पाणी पुरवठा हा केवळ भातसा धरणातून होत आहे. आज त्या धरणात आजच्या मितीला १३.१७ टक्के इतका साठा आजच्या मितीस शिल्लक आहे. तर आजच्या मितीला धरण क्षेत्रात केवळ २ हजार ८४ मी.मी. इतका पाऊस पडला आहे मागील वर्षी आजच्या मितीस धरणात १४१. म्हणजेच ९९.१९ इतका साठा होता तर ३ हजार २१८ मी.मी. इतका पाऊस पडला होता म्हणजेच मागील वर्षीच्या मानाने आजच्या मितीस एक हजार एकशे चौतीस इतका पाऊस कमी पडला आहे.

## ...पालिका, ठाणे

...यापन विभाग

...दतवाढ

... होणाऱ्या कचऱ्याचे प्लाज्मा तंत्र ... मिश्र कचऱ्याची विल्हेवाट ... ३ प्रकल्प उभारणे व त्याची १५ ... करणेसाठी अनुभवी संस्थेकडून ...१९ दि.२१/०६/१८ अन्वये दि. ...निविदा मागविण्यात आलेली होती.

सामनेवाला

## ...टीस

...१४ हि दरखास्त दाखल केली असून सदर ...लेले आहेत. तसेच सामनेवाला नं. २ व ...स व... असता वारंवार अपुर्ण पत्यामुळे ...प अर्जुन ...रे रा. भाग्यश्री बिल्डींग ३ रा ...ली ईस्ट सामनेवाला नं. ३ पुष्पलता अर्जुन ... नं. १३० कांदिवली चारकोप वेस्ट मुंबई ...ल्डींग २ रा माळा गणपती मंदिराच्या बाजूला ... तरी दरखास्तदार यांच्या माहिती प्रमाणे ...SS हाच आहे. सबब सामनेवाला यांना ...हेर नोटिस प्रसिध्द करण्यात येत आहे. ...२०१८ अशी नेमण्यात आली आहे. सबब

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०८/१०/२०१८

**मा. महासभा**

**मा. महासभा सूचना क्र. ०५**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती........
नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सूचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने — सही/-
(वासुदेव शिरवळकर)

| | |
|---|---|
| ८९ | सन २०१८/१९ या आर्थिक वर्षाकरिता डासनाशके, अळी नाशके खरेदी करणे कामाची निविदा मान्यतेबाबत. |
| ९० | सुधारित आकृतीबंधास मंजुरी देणेबाबत. |
| ९१ | सुधारित सेवाप्रवेश नियमास मंजुरी देणेबाबत. |
| ९२ | मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणाऱ्या संगणक चालक/लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणेबाबत. |
| ९३ | मतीमंद मुलांना शिकविणाऱ्या व बालवाडी शिक्षकांना शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे. |
| ९४ | शहरातील लेखक, कवी, नाटककार यांच्या कार्यालयाकरिता मिरारोड येथील इंदिरा गांधी हॉस्पिटलमध्ये जागा देणेबाबत धोरण ठरविणे. |
| ९५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखपरिक्षण विभाग |

# कोपर रस्त्यारुंदीकरणातील विस्थापितांना न्याय द्या- रमेश म्हात्रे

**कल्याण :-** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली क्षेत्रातील कोपर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जागा देऊन विस्थापित झालेल्यांचे गेल्या दोन वर्षात पुनवर्सन केले नाही की मोबदला दिला गेला नाही. याकडे स्थायी समितीचे माजी सभापती रमेश म्हात्रे यांनी लक्ष वेधून त्यांचा प्रश्न निकाली निघाला नाही, तर महापालिके विरोधातील विस्थापितांचा असंतोष पुन्हा वाढेल, असा इशारा दिला.

स्थायी समितीच्या ५ ऑक्टोबरच्या सभेत त्यांनी अधिकाऱ्यांना इशारा देताना हा प्रश्न तातडीने काढण्याचा आग्रह धरला. महापालिका अधिनियमाप्रमाणे ५० टक्के जागा तुटल्यानंतरहि १०० टक्के पुनर्वसन करण्याचे वा मोबदला देण्याची तरतूद असता स्वत:हून विकासकामांना जागा देणाऱ्या कोपरवासीयांबाबत अन्याय का? असाहि प्रश्न त्यांनी केला. त्यांना प्रशासनाने पत्रे पाठवून त्यांच्या सहकार्याबाबत कौतुकहि करण्याचे सौजन्य दाखविले नाही. याबाबत नापसंती व्यक्त करून महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यानंतर झालेल्या विस्थापितांचे पुनवर्सन केले. मग कोपरवासीयांबाबत तो न्याय का वापरला नाही, असा प्रश्न केला. त्यांचे पुनवर्सन वा आर्थिक मदतीचे पत्र देण्याबाबत एक महिन्याचे आत निर्णय घ्यावा असाहि आग्रह धरला.

शहर अभियंता प्रमोद कुलकर्णी यांनी या विषयाबाबत सांगितले. की, पुनवर्सन पॉलिसी महापालिकेची असून विस्थापितांना पर्यायी घरे देता येऊ शकतात. प्रसंगी शहरी-गरीबांसाठी घरे देता येतील मात्र याकामी नेमलेल्या समितीने प्रकल्पबाधितांना घरे देण्यास विरोध असल्याचे सांगितले. पुनवर्सनाला पात्र ठरतील त्यांना पुनवर्सन समिती निर्णय घेईल. समितीची सभा गेली दोन वर्षे झाली नाही. लवकरच सभा होईल त्यात निर्णय घेतला जाईल. शेवटी रमेश म्हात्रे यांच्या मागणीनुसार येत्या महिन्याभरात या प्रकल्पग्रस्तांना तातडीने न्याय द्या, असा आदेश सभापतींनी प्रशासनाला दिला.

# गांधीजींच्या यातना संपणार तरी कधी!

**प्रतिनिधी**

**नालासोपारा :-** नुकतीच महापुरुष महात्मा गांधीजींची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अर्नाळा येथील गांधीजींच्या अस्थींचे स्मारक हागणदारीत अडकून विकासाच्या प्रतीक्षेत असल्याचे वृत्त प्रकाशित केल्यानंतर प्रशासनाने या स्मारकाची जयंती निमित्ताने स्वच्छता केली होती. आता पुन्हा हे स्मारक कुत्र्यांच्या साम्राज्यात अखेरच्या घटक मोजत असल्याचे समोर आहे.

गांधीजींच्या हत्येनंतर जगभरात ज्या ठिकाणी त्रिवेणी सागराचा, नद्यांच्या संगम आहे त्या ठिकाणी त्यांच्या अस्थी विसर्जित करण्यात आल्या. विरारकरांचे सौभाग्य कि वैतरणा नदीच्या संगमाच्या ठिकाणी अर्नाळा येथे हे स्मारक ८ फेब्रुवारी १९४८ रोजी अर्नाळा गांधी स्तंभ समितीने बांधले होते. पण आज ७० वर्षे उलटूनहि या स्मारकाचा विकास झाला नाही. महाराष्ट्र पर्यटन विभाग, ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पंचायत समिती, नव्याने स्थापन झालेली महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग या पैकी कोणत्याही प्रशासनाला या स्मारकाची दखल घ्यावीशी वाटली नाही. इतकेच नव्हे तर मतासाठी गांधीजींना स्व:ताची मालमत्ता समजणारा काँग्रेस पक्षहि या स्मारकाविषयी उदासीन आहे. केवळ गांधी जयंतीला येथे डोके टेकवण्यासाठी येणारे लोक, सरकारी आस्थापना आणि राजकीय पुढारी आपले डोक टेकवण्यासाठी येतात हि शोकांतिका असून पुन्हा हे स्मारक विकासाच्या प्रतीक्षेत हे राम म्हणत आहे.

# राष्ट्रवादीच्या 'त्या' पदाधिकाऱ्यांवर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील नाराज

**प्रतिनिधी**

**डोंबिवली :-** २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती दिनी डोंबिवलीत महात्मा गांधीच्या पुतळ्यासमोर राष्ट्रवादीचे दोन पदाधिकारी आपसात भिडले होते. या दोन पदाधिकाऱ्यांवर प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र हा वाद राजेंद्र नांदोस्कर यांच्यात वाद झाला होता. यावेळी, जिल्हाध्यक्ष रमेश हनुमंते यांनी, बघ्याची भूमिका निभावली होती. या घटनेची माहिती प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांना मिळाली. कल्याणात राष्ट्रवादीच्या सुसंवाद मेळाव्यात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन दिल्यानंतर पत्रकारांनी या घटनेबाबत पाटील [illegible]

# शहापुरातील गोठेघरमध्ये शिवसेनाला खिंडार

**प्रतिनिधी**

**शहापूर:-** शहापूर शहरालगत असलेल्या गोठेघरमधील पंडित नाका विभागाचे शिवसेना शाखा प्रमुख विश्वास यशवंत गोरे हे आपल्या समर्थक कार्यकर्ते घेऊन बाहेर पडले असल्याने शिवसेनेमध्ये खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत [illegible]

# माग[illegible] पाणीसा[illegible]

**प्रतिनिधी**

**शहापूर :-** शहापूर [illegible] यावर्षी तब्बल एक हजार [illegible] अधिक पाऊस कमी [illegible] पुढील वर्षी पाणी अतिश[illegible] वापरल्यास त्याचा मोठ[illegible] मुंबईकरांना बसणार तर [illegible] तालुक्यासाठी आरक्षित [illegible] शिंचनालाही त्यामुळे चाप [illegible] असलीच चिन्हे आज[illegible] आहेत.

मागीलवर्षी ता[illegible] समाधानकारक पाऊस [illegible] फारशी पाणीटंचाई वा मुंबई[illegible] पाणी कपातीचे संकट जा[illegible] कारण ऑक्टोबर पर्यं[illegible] सतत पडत राहिल्याने न[illegible]

ठाणे म[illegible]

घनक[illegible]

ठाणे महानगरपालिका क्षे[illegible] ज्ञानावर आधारित विक्रेंद्री[illegible] लावणेकरिता प्रत्येकी १०[illegible] वर्षाकरिता परिचालन, नि[illegible] क्र.ठमपा/घकव्य/पीआरओ[illegible] २५/०६/१८ ते दि.२१/०७[illegible] निविदा सुचना कालावधि[illegible] सदरकामी दि.२३/०७/१८ [illegible] देण्यात आली परंतु प्रथम [illegible] झालेली नसल्याने सदरक[illegible] देण्यात आली परंतु द्वितीय [illegible] प्राप्त न झाल्याने सदरकाम[illegible] आली परंतु तृतीय मुदत[illegible] झाल्याने सदरकामी दि.३१[illegible] देण्यात येत आली. चतुर्थ [illegible] प्राप्त न झाल्याने सदरकाम[illegible] मुदतवाढ देण्यात आली [illegible] झालेली नसल्याने सदरका[illegible] मुदतवाढ देण्यात आली स[illegible] झाल्याने सदरकामी दि.१[illegible]

देण्यात येत आहे. प्राप्त [illegible] निविदाकार अथवा त्यांचे [illegible] कोणतीही निविदा कोणत्या[illegible]

अथवा नाकारण्याचा हक्क [illegible] ठमपा/पिआरओ/घन.व्यव[illegible] दि:०८.१०.२०१८

pls visit our official w[illegible]

www.thanecity.gov[illegible]

# मा. महासभा

# दि. १८/०७/२०१८

# रोजीचे इतिवृत्तांत

१०.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०७/०७/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १३) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १४) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १५) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १६) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १७) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १८) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १९) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| २०) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २१) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २२) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २३) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २४) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २५) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २६) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| २७) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २८) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २९) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| ३०) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३१) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३२) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ३३) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |

| | | |
|---|---|---|
| ३९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४०) | आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४१) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४२) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४४) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४५) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४६) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४७) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४८) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४९) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५०) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५१) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५२) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५३) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५४) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५५) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५६) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५७) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ६१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६३) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६४) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ७०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ७१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ८१) | **अहमद सीराह अकरम** | **सदस्या** |
| ८२) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| ८३) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| ८४) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८५) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| ८६) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| ८७) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ८८) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| ८९) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| ३) | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| ४) | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |
| ५) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |

मा. महापौर :-

नमस्कार उपस्थित सर्व मान्यवर पदाधिकारी, गटनेते, नगरसेवक/नगरसेविका, आयुक्त, अधिकारी, पत्रकार बंधु व नागरिक यांचे स्वागत आहे. आषाढी एकादशी व गुरूपौर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा सर्वांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत पार पाडावी. धन्यवाद.

नगरसचिव :-

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. १८/०७/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** सर्वप्रथम आपण प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करणार आहोत. १० वाजून १० मिनिटे झालेली आहेत. पहिला प्रश्न सदस्य श्री. अनिल सावंत ह्यांचा प्रश्न क्र. २ मिरा भाईदर महानगरपालिका तर्फे चालविण्यात येत असलेल्या परिवहन सेवेबाबत.

अनिल सावंत :-

आदरणीय महापौर मॅडम हा एक प्रश्न आहे विशेष स्वच्छता दराबाबत. मागच्या मिटींगमध्ये या विषयाबाबत चर्चा झाली होती आणि त्यावेळी सुध्दा प्रशासनाने चुकीचे उत्तर दिले होते. आणि आज परत तेच रिपीटेशन झालेले आहे. सन २००१-२००२ ते २०१०-२०११ असा विशेष स्वच्छता कर हा जो लावण्यात आलेला आहे तो शहरातील फक्त ३ कॉम्पलेक्सला आपण लावला. जेसलपार्क,सृष्टी आणि शांतीनगर आता शांती नगरचे जे आपण टेकओव्हर केला तेच मुळात मला वाटते. २००९-२०१० मध्ये टेकओव्हर दिल्यानंतर त्यांना टॅक्स लावण्यात आला. माझा प्रश्न हाच होता की, हा जो टॅक्स लावण्यात आलेला आहे की ज्या हेअरिंगसाठी आपण हा टॅक्स कलेक्ट केला त्याच हेअरिंगसाठी तो खर्च झाला की नाही.

राहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब प्रथमच ह्या सभेला उपस्थित झाले त्यांचे स्वागत त्यांचे निवेदन करतील सर्व शासनक्रम होणे गरजेचे आहे.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही करा.

**मा. महापौर :-**

तुमचे आयुक्तांनी उत्तर दिलेले आहे तुम्ही कन्टीन्यू करा.

**अनिल सावंत :-**

दुसरा प्रश्न आहे परिवहन सेवेबाबत आदरणीय आयुक्त साहेब ज्यावेळी ह्या शहरामध्ये डीएमसी होते त्यांच्या कार्यकाळामध्ये सुध्दा ही परिवहन सेवा मनपा मार्फत चालविण्यात येत होती आज ९० बसेस पालिकेला प्राप्त आहेत आणि त्यातील फक्त ३५ ते ३६ बसेस चालू आहेत तसे उत्तर दिले जाते. मुळात तेवढे सुध्दा चालू नाहीत. शहराची लोकसंख्या वाढत आहे. दूरदूरच्या ठिकाणी कॉम्पलेक्स होत आहेत आणि लोकांना ही परिवहन सेवा चांगली परिवहन सेवा मिळणे गरजेचे होते म्हणून मनपामार्फत ही परिवहन सेवा चालू करण्यात आली. १०१७-२०१९ वर्षामध्ये जवळ जवळ १८ कोटी रूपये महानगरपालिकेच्या बजेटमधून आपण परिवहन सेवेसाठी खर्च केले. ज्या ९० बसेस घेण्यात आल्या त्याच्यासाठी पालिकेचा फंड लावला ५० कोटी बाकी सेंट्रल आले स्टेट गव्हरमेन्ट जवळून अनुदान आले आज आपल्या बसेसची कन्डीशन काय आहे. आज कित्येक बसेस टायर शिवाय त्या ब्रिजखाली उभ्या आहेत. विदाऊट टायर्स पत्रकारांनी वेळोवेळी ह्या बदलच्या माहित्या वृत्तपत्रामध्ये आलेले आहेत. आम्ही सुध्दा लोकप्रतिनिधी म्हणून पाठपुरावा केलेला आहे. परंतू अजूनपर्यत परिवहन सेवेमध्ये कुठलीही सुधारणा होत आहे. असे काही दिसत नाही पालिकेले १८ कोटी रू. खर्च करून जर आपण एक चांगली सेवा देत नसू तर ह्या संपूर्ण प्रकरणामध्ये सखोल चौकशी करण्याची गरज आहे. आणि दोषीवर कारवाई करण्याची गरज आहे. आज करोडो रू. खर्च करून ही बसेसची परिस्थिती काय आहे. महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो की, आयुक्तांनी त्याचे परिवहनचे अधिकारी आले असतील त्यांनी जरा खुलासा करावा. ९० बसेसपैकी फक्त ३५ ते ३६ बसेसच का चालू आहेत काही बसेस हा चेक होऊन पडलेल्या आहेत त्याचा परमीट नाही म्हणून त्या बसेस अशाच उभ्या आहेत. विदाऊट परमिट म्हणजे पालिकेचा पैसा खर्च झाले. गव्हरमेन्टचे झाले म्हणजे लोकांचे टॅक्स मधून जमा झालेले पैसे आहेत. मग अशा परिस्थितीमध्ये ही जर परिस्थिती असेल तर ही परिस्थिती सुधारणार कशी? आणि पालिका त्याच्यासाठी काय उपाययोजना करणार आहे. महापौर मॅडम ह्यांना विनंती करतो की मा. आयुक्तांनी त्याचा खुलासा केला तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

म्हसाळ साहेब खुलासा करा.

**मा. उपायुक्त (मु.):-**

सन्मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबद्दल आपल्याकडे ९० बस प्राप्त नसून ५८ बस प्राप्त आहे ५८ प्राप्त बसपैकी ५७ बसची आपले रजिस्ट्रेशन झालेले आहे एक बसचे रजिस्ट्रेशनमध्ये कंपनीने आपल्याकडे प्रोडयूस केली नसेल त्यांच्याकडे पाठपूरावा करून ते प्राप्त करून घेतलेले आहेत त्याचे सुध्दा रजिस्ट्रेशन साठी आपण पत्रव्यहार केलेले आहेत ते एक दोन दिवसात रजिस्ट्रेशन होईल आणि आज आपल्याकडे ३८ बस सरासरी रस्त्यावरती धावतात टायरच्यासाठी आपल्याकडे कुठलीही गाडी उभी नाही मध्यंतरी आपल्याकडे हेव्ही रेन झाला होता त्यामूळे अचानक ७-८ गाड्याचा क्लश प्लेटला प्रॉब्लेम झाला. तेवढयाच सोडल्या तर, बाकीच्या नियमीत साधारणतः आपल्या बसेसचे रोटेशन सुरू आहे. एकच ठराविक बस खुप दिवसासाठी डेपोमध्ये आहे. ती सुस्थितीमध्ये नाही. ॲक्सीडन्टवाली, इंजिनवाली काही बस सोडल्या तर बाकीच्या बसचा असा मेजर जास्त कालावधीसाठी वर्कशॉपमध्ये हॅन्डअप नाही आहे.

[illegible] आपण ३६ जाहा जे.एन.एन.यु.आर.एम. मध्ये केली होती. परतु बसच्या किमती वाढल्यामुळे ती नंतर ४० कोटीपर्यंत साधारणतः बस आपली कॉस्ट गेली आणि आपल्याला त्याला फक्त ३६ च्या ८० टक्के त्याच्यामध्ये अनुदान मिळणार होते. २० टक्के आपला हिस्सा टाकायचा होता. त्या अनुषंगाने आपल्याकडे २८ कोटी अनुदान मंजूर होणार होते. त्यापैकी २४ कोटी अनुदान आपल्याला मंजूर झालेले आहे. ४ कोटी आपल्याला अद्यापपर्यंत मिळालेले नाहीत. आपला हिस्सा टाकायचा बाकी आहे आणि व्होल्वोच्या ५ ए.सी. बस आपल्याकडे आलेल्या नाहीत. म्हणजे आपण घेतल्याच नाही आणि १० ज्या फोर्स मोटरच्या होत्या त्यासुध्दा आपण घेतलेल्या नाहीत. टाटाच्या २७ बस आपल्याकडे रेडी आहेत. परंतु आपण त्याची डिलेव्हरी घेतलेली नाही.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, ह्या शहरामध्ये मिनी बसची गरज आहे. काही काही रस्ते उदा. शांतीनगर, नवघर, गोडदेव, उत्तन परिसर ह्या ठिकाणी मोठ्या बसेस जाऊ शकत नाहीत आणि ह्या १० बसेस राज्यशासन केंद्रशासन द्यायला तयार आहे आणि आपणच कुठेतरी कमी पडलो. आपण त्या घेतलेल्याच नाहीत. आज ५८ बस पैकी फक्त ३६ बसेस धावत आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. १६ बसेस कम्प्लीटली नादुरुस्त आहेत. बसेस घेतल्या कधी आणि नादुरुस्त झाल्या कधी?

**मा. उपायुक्त (मु.):-**

त्याच्यात वॉरन्टी पिरियडमध्ये आहेत. वॉरन्टी पिरियडमध्ये आपण त्याची नियमित दुरुस्ती करत होतो. त्याच्या नंतरही ह्या ज्या काही १६ बसेस तुमचे म्हणणे आहे की, त्यासुध्दा कायमस्वरुपी उभ्या नाहीत. त्यातल्या बसेस दुरुस्त होतात. येतात जातात अशा पध्दतीने आहे.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा ५८ पैकी ३६ का चालु आहेत, ५८ का नाही? आपण सर्व घेतल्या ना. परमिट आलेले आहे. एका बसला तुम्ही सांगता त्याप्रमाणे परमिट बाकी आहे. मग ५७ बसेस रोडवर का धावत नाहीत? लोकांना आपण ती सेवा देत नाही आहोत.

**मा. उपायुक्त (मु.):-**

आपल्याकडे जेवढ्या बस आहेत तेवढ्या सगळ्याच्या सगळ्या चालवायच्या नसतात. त्यातील १० टक्के बस आपल्याकडे रिझर्व्ह ठेवायच्या असतात.

**अनिल सावंत :-**

१० टक्के ठेवा ५० तरी चालवायला पाहिजे. ५७ बसेस पैकी १० टक्के तुम्ही रिझर्व्ह ठेवता.

**मा. आयुक्त :-**

त्यांची मागणी बरोबर आहे.

**अनिल सावंत :-**

१० टक्के असले तरी ५० चालवायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. आधी तुम्ही ३६-३७ जे चालवतात त्याची संख्या ५० च्या ॲव्हरेजमध्ये चालली पाहिजे. डेली ऑपरेशनमध्ये आणि त्यापध्दतीने........

**अनिल सावंत :-**

साहेब, आज परिस्थिती बघा. रिक्षासाठी मिरारोड स्टेशन असू दे, भाईंदर स्टेशन असू दे.

**मा. आयुक्त :-**

महापौर महोदया, सन्मा. सदस्यांनी ती सुचना मांडलेली आहे त्याची निश्चित प्रशासनाने दखल घेतली आहे. आपले कार्यपालन आणि मेन्टेनन्स चांगल करुन ते मॅक्झीमम ५० च्या लेव्हल पर्यंत...............

मा. महापौर :-

आपले बालाजी खतगावकर ह्यांचे स्वागत करूया. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने सर्व नगरसेवकांच्या वतीने त्याचे स्वागत करूया.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने सन्मा. महापौर महोदया मा. उपमहापौर महोदय उपस्थित सर्व पदाधिकारी, सर्व नगरसेवक बंधुभगिनीनो महानगरपालिकेंच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी, इलेक्ट्रोनिक मिडीयाचे प्रतिनिधी पत्रकार बंधु शहरातील प्रतिष्ठित नागरिक ह्या ठिकाणी या महासभेमध्ये माझे स्वागत झाले. आपल्या सर्वाचे मी आभार व्यक्त करतो आणि येणा-या काळामध्ये शासनाने जी माझ्यावर जबाबदारी दिलेली आहे आणि आपल्या सर्वाच्या सहकार्याने ह्यामध्ये शहरातील शेवटचा माणूस सुध्दा ह्यामध्ये विचारात घेतला जाईल. सार्वजनिक जीवनात काम करणारे जे काही प्रवर्ग आहेत काम करणारे त्यांच्या सुचना कायद्याच्या कसोटीमध्ये ह्या शहरासाठी जितके चांगले करता येईल, ते करण्यांची मी आपल्याला ग्वाही देतो. विशेषतः सामान्य शेवटच्या माणसाला अपक्षा काम असते शहरातील चांगले रस्ते, दिवाबत्ती, दैनदिन स्वच्छता, नियमीत पाणीपूरवठा, हे जे बेसीक गोष्टी आहेत त्याला माझा जास्तीचे प्राधान्य राहील. त्यासोबतच ह्या शहरातले खूप चांगले प्लानिंग झालेले आहे. आणि हे शहर मुंबई उपनगरामध्ये चांगल्या क्षमतेने पुढे येत आहे. तर त्याला लॉगटर्म प्लानिंगमध्ये सुध्दा आम्ही निश्चित चांगले नियोजन करून जास्तीत जास्त शासनाचे केंद्र शासनाचा ह्या शहरासाठी निधी आणि मॅक्झीमम ह्या शहरातून विविध कराच्या माध्यमातून आपल्या सर्वाच्या सहकार्यातून जे उत्पन्न अपेक्षित आहे. ते मोठ्या लेव्हलवर आणून आणि एक कार्यक्षम पध्दतीने आणि एक वेगळ्या लेव्हलवर म्हणजे अतिउच्च।टाऊन समोर ठेऊन काम करण्याची मी हमी देतो. आणि आपले सर्वाचे सहकार्य अपेक्षित करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**अनिल सावंत :-**

कॉग्रेस पक्षातर्फे आयुक्त बालाजी खतगांवकर साहेब ह्यांचे आम्ही स्वागत करतो. या महानगरपालिकेचे डी एम सी म्हणून आपला कार्यकाळ अतिशय तेजस्वी आणि यशस्वी राहिलेला आहे. आपण डी एम सी असते वेळी वृक्ष प्राधिकरणचा चार्ज आपल्याकडे असते वेळी आज ह्या शहरामध्ये जे नविन गार्डन दिसत आहेत त्याचे बरेचशी श्रेय बालाजी खतगांवकर साहेबांना जाते. त्यांनी स्वतः १-१ गार्डन बघून त्याठिकाणी वृक्षप्राधिकरण मार्फत सुंदर असे गार्डन डेव्हलप केलेली आहेत. आणि आम्हाला आशा आहे की त्या प्रशासकीय कामाचा अनूभव ह्या शहराच्या हितासाठी इथे होईलच कॉग्रेस पक्षाचे पूर्ण सहकार्य त्यांना विविध कामांसाठी पूर्ण सहकार्य राहील. परत एकदा कॉग्रेस पक्षाच्या वतीने आम्ही त्यांचे स्वागत करतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

शिवसेना पक्षाच्या वतीने मा. आयुक्त बालाजी खतगावकर साहेबांचे स्वागत करतो आणि ह्या वर्षभरात आपल्याकडे ३ आयुक्त येवून गेले. हे चौथे आहेत आणि खरोखर आमची अपेक्षा आहे ह्या मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये जनतेच्या सुविधा ज्या ज्या असतील त्या तुमच्याकडून सूटतील आणि आमच्या शिवसेना पक्षाच्या वतीने खूप खूप शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेबांचे अभिनंदन करताना अत्यंत आनंद होत आहे अनुभवी धीरगंभीर मोठा अनूभव असलेला ह्या शहराची पूर्ण नाडी परिक्षा असलेले सभागृहातील सर्व नगरसेवक सभागृहाच्या बाहेर सर्व प्रतिनिधी अनन्य संस्था यांच्या अनेक वर्षाचे संबध आपल्याला उपयोगी पडतील. तसेच शासन दरबारी असलेल्या खतगांवकर साहेबांचे वजन हे ही उपयोगी पडेल मी अपेक्षा करतो की मिरा भाईदर शहरासाठी ज्या भरीव योजना राबवायच्या आहेत ह्या यशस्वी करायच्या आहेत. त्यासाठी खतगांवकर साहेबांना यश मिळो. सभागृहनेता म्हणून आपले आश्वासीत करतो की सभागृह आपले कायम पाठीशी उभे राहील त्याच

बरोबर ह्या शहरातील सर्व जाती धर्माचे त्यांचे लोक आपल्या बरोबर शहरातील मी पुन्हा आपले एकदा अभिनंदन करून शुभच्छा देतो धन्यवाद.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम बालाजी खतगावकर साहेबांचे कॉंग्रेस शिवसेना भा.ज.पा. तर्फे स्वागत करण्यात आलेले आहे. मी देखील शिवसेनेचा नगरसेवक म्हणून बालाजी खतगावकर साहेबांच्या पाठीमागे मिरा भाईदरच्या शहराच्या विकासाच्या बाबतील फार मोठा हात आहे. आणि आताच त्यांनी स्वताच्या शब्दामध्ये देखील त्यांनी विकासाच्या बाबतीमध्ये उल्लेख केलेला आहे. मी महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आपल्याला खास करून आमचे विरोधी पक्षातर्फे आपणाला पूर्ण सहकार्य मिळेल ह्या शहराच्या विकासासाठी जसे तुम्ही बांधिलकी असाल त्याच्य पध्दतीने आम्ही देखील आपणाला पूर्ण सहकार्य करायला तयार असु. परंतु फक्त ह्या शहराचा विकास हाच आपल्याला मनी असावा एवढे मी सांगून माझे दोन शब्द संपवतो.

**मा. महापौर :-**

सभागृहाचे कामकाज सूरू करावे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम विधी विभागाकडून एक माहिती मागविलेली परिस्थीती अशी आहे की डायरेक्ट आम्ही पत्रव्यवहार केला आम्हाला उत्तरे मिळत नाही म्हणून आम्हाला प्रश्नोत्तरे आम्हाला टाकावे लागतात. विधी विभागाकडून माहिती मिळाल्यानंतर आपल्या पालिकेच्या पॅनलवर जे वकिल आहेत अतिशय नामांकित वकील आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे ॲड विनय नवरे आहेत उच्च न्यायालयाचे ॲड नारायण बुबना आहेत, ॲड मयुरेश लागु ठाणे न्यायालयाचे ॲड आशिष गोगटे आहेत प्रशांत कोरगावकर आहेत, राजश्री बनसोडे आहेत मनपातर्फे जवळ जवळ १७-१८ मध्ये ४१ लाख २६ हजार २६४ रू. आपण हे दावे लढण्यासाठी खर्च केले आणि हे दावे किती आहेत त्याचे आयुक्त साहेबांनी मला पुस्तकच मिळालेली आहेत, पेन्डीग आहेत. आणि याच्यामध्ये आश्चर्याची गोष्ट अशी आहे, मॅक्झीमम दावे असे आहेत. कॉन्ट्रॅक्टरने चेक दिलेले बाऊंन्स झाले. ज्याला टेन्डर देतो अनामत रक्कम भरतो. होर्डिंगचे असेल, बाजार फी चे असेल. त्यांनी दिलेले चेक बाऊंन्स झाले म्हणून कोर्टात केसेस चालू आहेत आणि आज परिस्थिति अशी आहे, तोच कॉन्ट्रॅक्टर दुसऱ्या नावाने सेम कॉन्ट्रॅक्ट घेतो. पालिकेचे करोडो रुपये बुडवून आज तोच कॉन्ट्रॅक्टर पालिकेचा धंदा करतोय आणि आपण कोर्टामध्ये लढत बसलो आहोत. लाखो रुपये खर्च करत आहोत. ह्या सर्वच प्रकरणांचा आढावा घ्यायचा आयुक्त साहेब आपल्याला गरज आहे. अतिक्रमण इतर केसेस तर बरीच आहेत. आज एवढ्या प्रमाणात खर्च करुन सुध्दा महापालिका का हरते? मागच्या वेळी साहेब एक विषय आला होता. वर्धमान फॅन्टसी सेव्हन वंडर्स. महापालिकेने चांगला उपक्रम ह्या शहरासाठी चालु केला साहेब. आज परिस्थिति काय आहे. पालिकेला जी ठरलेली फी होती जवळ जवळ त्याने २-३ वर्ष झाली बंद केलेली आहे आणि तो कोर्टात गेला. वर्धमान फॅन्टसी मात्र व्यवस्थित चालू आहे. त्याने सबमिटींग केलेल्या आहेत. जवळ जवळ लाखो रुपये त्याच्या बाजूने जे ग्राऊंड आहे. त्या ग्राऊंडवर साहेब लग्नासाठी लाखो रुपये घेतले जातात. आज शहरातील लोकांना जॉगर्स ट्रॅक तिथे आहे. फार जुना जॉगर्स ट्रॅक त्या जॉगर्स ट्रॅकवर जायचे असेल तर फी द्यावी लागते. तो म्हणजे काय त्याचे इन्कम चालु आहे. कोर्टात मात्र केस चालु आहे आणि पालिकेचे इनकम बंद आहे. अशा परिस्थितीमध्ये ह्या सर्व प्रकरणांचा विचार करुन पालिकेचे जे कॉन्ट्रॅक्टर आहेत ज्यांचे चेक बाऊंस झालेले आहेत. त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहेत आणि एवढे चांगले वकील असते वेळी पालिका का हरते. केसेस पालिका का हरते. त्याच्यावर थोडा विचार होण्याची आयुक्त साहेब, महापौर मॅडम फार गरज आहे. माझी आपल्याला विनंती आहे आयुक्त साहेब लॉ डिपार्टमेंटशी कन्सल्ट करुन त्याचा योग्य पाठपुरावा करुन जे कॉन्ट्रॅक्टर डिफॉल्टर आहेत आणि दुसऱ्या नावाने तोच धंदा करत आहेत त्यांना कम्प्लीटली ब्लॅक लिस्टेड करुन त्यांच्यावर कारवाई करावी.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्य अनिल सावंतजी यांनी या ठिकाणी विधी विभागाच्या कामकाजाबद्दलचे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मुख्यत्वे महापालिकेमध्ये काम करणारे विविध ठेकेदार आणि त्याच महापालिकेला देय असलेल्या रक्कमेचे डिस्प्युट हे मान्यवर न्यायालयामध्ये चालु आहेत असा त्यांचा आक्षेप आहे आणि तेच ठेकेदार इतर नावांनी महापालिकेमध्ये कामे करतात. अशा बाबतीत सर्व ठेकेदारांचा आढावा घेतला जाईल. ह्या सोबतच विधी विभागाचा कामकाजाबाबतचा पूर्ण आढावा घेतला जाईल आणि जे महापालिकेला देय रकमा आहेत ते वसुल करण्याचा आम्ही प्रयत्न केला जाईल. दुसरा मुद्दा त्यांनी ह्या ठिकाणी मांडलेला आहे. वर्धमानच्या बाबतीत कोर्ट मॅटरमुळे वर्धमानचे कामकाज सुरळीत

चालु आहेत. पण महापालिकेचे इन्कम फेल झालेले आहे. तर त्याबाबत सुध्दा निश्चित आढावा घेऊन अपेक्षित कारवाई केली जाईल.

**अनिल सावंत :-**

साहेब त्यानंतरचा प्रश्न आहे आपला कम्प्युटर विभागातर्फे आपण बऱ्याच वर्षापासून सर्व डिपार्टमेन्टचे कम्प्युटराईज चालु केलं. अपेक्षा ऑफिसमध्ये दोन सहकारी असतील तरी कुठच्याही प्रभाग कार्यालयामध्ये गेल्यानंतर त्या व्यक्तीला पाणी देईल आणि टॅक्स पेमेन्ट करण्याची सुविधा असावी. आज परिस्थिती अशी आहे नविन प्रभाग रचना झालेली आहे साहेब जुना पेट्रोल पंप एक छोटेसे उदाहरण देतो. जुना पेट्रोल पंपपासुन आमचा १९ नंबर वॉर्ड लागतो. त्या विभागाला नेऊन टाकले रामनगरमध्ये १५० रुपये रिक्षाचा खर्च येतो. आणि तिथे गेल्यानंतर उत्तर हे कळते की सिस्टीम बंद आहे. रसाजला दुसरे कार्यालय आहे तिथे गेलो तिथे ही परिस्थिती अशी आहे की इथे आम्ही घेत नाही. तिकडे रामनगरला जो रामनगरला गेल्यानंतर सिस्टीम बंद आहे. काही ठिकाणी तर हाताने पावत्या खतविल्या जातात. ऑन रिटर्न आणि त्यांची एन्ट्री होत नाही आणि पुढचा वर्षामध्ये त्याला ते एरियस दाखवले जातात. याच्यामध्ये दिलेले माहिती अधिकार आणि नगरसेवकांच्या पत्रांना उत्तर हे आपल्या वेबसाईटवर टाकणे अपेक्षित आहे. मला वाटत नाही एकाही नगरसेवकाने विचारलेल्या पत्राचे उत्तर वेबसाईटवर टाकण्यात येत असेल. आज पाणी पुरवठ्याचा एक गोंधळ सांगतो साहेब. पाणी पुरवठा विभागाची बिल कम्प्युटरवरच काढतील. मागच्या वेळी आयुक्त साहेब होते, पवार साहेब त्यावेळी सरसकट जे मीटर बंद होते त्यांना वाढवून बिल पाठवली कारण हे का तर आम्हाला पाणी पुरवठा जास्त झालेला आहे. महापौर मॅडम त्यावेळी आदेश दिला होता अशी जी सरसकट पाठविले असतील त्यांचे रेक्टीफिकेशन करावं आणि त्यांच्याकडून करेक्ट ॲप्रोप्रिएशन करावी. साहेब त्या बिलांचे रेक्टीफिकेशन झालच नाही. इथे डायसवर आयुक्त साहेबांनी आणि महापौर मॅडमने आदेश दिले होते की त्याचे ॲक्टीफाय करा त्यानंतर लोक भरतील. आणि बऱ्याच ठिकाणी लोकांनी बिलं भरलेली नाही. म्हणून पालिकेने त्यांचे पाईपलाईन कट केली गेली. आज पाणीपट्टीमध्ये वाढ झाली बजेटमध्ये आणि त्याचा इफेक्ट होता. १ एप्रिलपासून पण लोकांना जी आज फेब्रुवारी मार्चची बिले गेलेली आहेत त्याच्यामध्ये साहेब नविन रेटप्रमाणे बिले पाठवली गेली. म्हणजे जो रेट एप्रिलपासून लागणार होता तो त्या रेटने फेब्रुवारी मार्चमध्ये बिले पाठवली गेली लोकांना आणि प्रशासनातर्फे असे सांगण्यात येत आहे की तुम्ही बिलं भरा. पुढच्या बिलमध्ये आम्ही ॲडजस्ट करु. साहेब आज कम्प्युटर आहे फास्ट काम व्हायला पाहिजे. ही अपेक्षा असते. कुठचेही रहिवासी जर ते बिल रेक्टीफिकेशनसाठी घेऊन आले तर त्यांना उभ सुध्दा तिथे करत नाही. बाहेरच्या बाहेर हाकलून देतात. मग आज हा लोकांनी भुर्दंड का भरावा. रेक्टीफिकेशन तुम्ही सांगता नंतर देणार ते पैसे घेतल्यानंतर त्या लोकांचे त्याच्यावर व्याज जाणार जास्त दराने बिलं २५ ते ३० टक्के जास्त दराने बिले आलेली आहेत. अशाप्रकारे हा संगणक विभागाचा कारभार आहे. संगणक विभागातला कार्यरत बऱ्याच वस्तु ज्यावेळी इलेक्शन येतात त्यावेळी मात्र ती सिस्टीम बरोबर कार्यरत असते. मग आज ही एवढी कामे दिलेली आहेत. सामग्रीसाठा, रजिस्टर नोंद करणे, मालमत्ता कर वसुली, पाणी पुरवठा, दैनंदिन आवक जावक, माहिती अधिकार, लोकशाही दिन पत्रांना उत्तरे, इ-गर्व्हनर्स कामी कर आकारणी मॉडेल, पाणी पुरवठा मॉडेल ही सर्व एवढी जी कामे दिलेली आहेत ही अद्यावत कामे वेबसाईटवर किती आहेत.

**नगरसचिव :-**

सावंत साहेब प्रश्नोत्तराचा वेळ संपलेला आहे. १० वाजून ४० मिनिटे झालेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

महापौर महोदय सन्मा. सदस्यांनी तो १९ वॉर्ड पेट्रोलचा काय मुद्दा मांडत होतात.

**अनिल सावंत :-**

साहेब काय झाले आहे. प्रभाग रचना प्रभाग समिती ज्यावेळी स्थापन झाल्या त्यावेळी प्रशासनाने एक गोषवारा दिला होता. परंतु सत्तापक्षाने त्याची फोड केली त्यामुळे जुना पेट्रोल पंपचा जो वॉर्ड नं. १९ तो नेऊन टाकला रामनगरला आता ते अंतर बघा किती आहे. दुसरा लोढा कॉम्पलेक्सचा जो वॉर्ड होता ९ नंबर तो नेऊन टाकला. भाईंदरला आणि आज लोक अक्षरशः त्यांना जेव्हा तिकडे जावं लागतं. अक्षरशः शिव्या घालतात साहेब. कारण लोकांना काही माहिती नसते. आता असं आहे सत्तापक्षाने आपल्या सोयीनुसार तो केला प्रशासनाने ॲटलिस्ट त्यामुळे जी गैरसोय झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना मी सांगु इच्छितो मी याचा खुलासा करतो. प्रभाग निश्चित करण्याची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली होते त्यात सत्तापक्ष किंवा विरोधी पक्ष किंवा नगरसेवक यांचा काही सहभाग नसतो. हे टोटली इलेक्शन कमिशनरच्या कामकाजाखाली काम झालेले आहे. महापौर

जुबेर इनामदार :-

प्रशासनाने दिलेला गोषवारा भौगोलिक रचनेप्रमाणे त्याला तोडफोड करण्यात आली आणि प्रभागांना जिथे नको तिथे पाठविण्यात आलेले आहे.

सुरेश खंडेलवाल :-

तुम्ही गेले होते हायकोर्टात याचिका दाखल केली होती. फेटाळली ना झाला विषय.

नगरसचिव :-

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी आहे दिपीका पंकज अरोरा यांची वन विभागाच्या कामकाजाबाबत आहे आणि दुसरी लक्षवेधी आहे सन्मा. सदस्य अनिल सावंत यांची.

मा. आयुक्त :-

माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे सभागृहाला मेन्टेन ठेऊन खेळीमेळीच्या वातावरणात कामकाज व्हावं.

मा. महापौर :-

आज विशेष विषय होने के बावजुद मैं लक्षवेधी एक भी नही लुंगी। आगे का कामकाज शूरू करे।

जुबेर इनामदार :-

लक्षवेधी महापौर मॅडम घ्यावी लागेल.

मा. महापौर :-

मैं आज नही लुंगी। सभी विशेष विषय है इसलिए मैं आज एक भी लक्षवेधी नही लुंगी। आगे का विषय शुरु किजीए।

जुबेर इनामदार :-

अस होत नाही मॅडम, लक्षवेधी अधिकार आहे. संविधानिक अधिकार आहे. तुम्ही कसा हिसकावणार. साहेब संविधानिक अधिकार आहे उपविधीचा भाग आहे तो सचिव साहेब विषयपत्रिकेवरचा विषय वाचायच्या आधी महापौरांना तशी माहिती द्या. लक्षवेधी तुमच्याकडे आलेली आहे की नाही?

नगरसचिव :-

मी सांगितल. कदाचित आपले लक्ष नसेल त्या दोन्ही लक्षवेधी आलेल्याचे मी वाचन करुन महापौरांकडे सुपुर्त केलेले आहे.

जुबेर इनामदार :-

शहरातील निगडीत जी वस्तु असेल ज्वलंत विषय असेल त्यावर. चर्चा झाली पाहिजे. अशा आलेल्या लक्षवेधीला महापौर मॅडम तुम्हाला प्राधान्य द्यायला पाहिजे आणि त्यावर चर्चा झाली पाहिजे. लक्षवेधीचे विषय असे फेटाळता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

मी तुम्हाला केबीनमध्ये बोलवून तुमचे काय म्हणणे आहे त्याचे निवारण करुन देणार.

जुबेर इनामदार :-

महासभेची चर्चा केबीनमध्ये होत नाही मॅडम.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या. मी आज नाही घेणार.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २१, **दि. २०/०२/२०१८, दि. २६/०२/२०१८, दि. २८/०३/२०१८ (दि. २६/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा), दि. २८/०३/२०१८, दि. १८/०४/२०१८ व दि. ०२/०५/२०१८ (दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे**

जुबेर इनामदार :-

माझे ह्या विषयावर समाधान झालेले नाही. लक्षवेधी झाली पाहिजे. हा पायंडा तुम्ही नविन टाकायचा प्रयत्न करत आहात. महापौर मॅडम ते होऊ शकत नाही.

मा. महापौर :-

शेवटी घेणार.

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज तुम्ही कसे बदलू शकता.

**मा. महापौर :-**

शेवटची वेळ देणार.

**अनिल सावंत :-**

मॅडम तसे नाही होत. तुमच्या विषय पत्रिकेवरचा विषय आहे. लक्षवेधी प्रश्नोत्तर तुम्हाला घ्यावी लागणार. तुम्ही टाईम लिमिट द्या असे फेटाळू कसे शकता.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम तुम्हाला लक्षवेधी घ्यावी लागेल आणि सभा कामकाज नियम कसे बदलू शकता.

**अनिल सावंत :-**

आम्ही एवढे सहकार्य करत आहोत मॅडम आणि ही जी मांडलेली लक्षवेधी आहे शहरामध्ये जो हाहाकार माजला पावसामध्ये त्या विषयीची लक्षवेधी आहे. त्याच्यावर आपल्या चर्चा नाही करायची आहे का?

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडमने आपल्याला सांगितलेले आहे लक्षवेधी वरती नंतर चर्चा करु.

**जुबेर इनामदार :-**

केबीनमध्ये आम्ही चर्चा नाही करणार.

**मा. उपमहापौर :-**

आपण सभागृहात करु.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

शहर बुडून गेले त्याच्यावर चर्चा नाही करत. आपल्या आपत्कालीन विभागाचे बारा वाजले त्याच्यावर तुम्ही चर्चा नाही करणार. तर कधी चर्चा करणार. आपली दोन महिन्याने मिटींग लागली.

**निलम ढवण :-**

एवढा वेळ गेला लक्षवेधीवर चर्चा झाली असती.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

शहराचा सेन्सीटिव्ह विषय असताना पण त्याच्यावर चर्चा कराविशी वाटत नाही का?

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला लक्ष वेधण्याचे काम लोकप्रतिनिधी करतात. तुमच्याकडे दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. सत्ता तुमची अधिकार तुमचा प्राधान्य ज्याला द्यायचे असेल त्याला द्या.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

अधिकार असेल तरी नियम बदलु शकता का?

**जुबेर इनामदार :-**

हा तुम्ही सभागृहात नविन पायंडा पाडता आहात का?

**निलम ढवण :-**

नियम बदलु शकता का तुम्ही ते पण सांगा.

**अनिल सावंत :-**

सभा कामकाजाप्रमाणे मिटींग चालणार की नाही?

**धृवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब आदेशाचे पालन करावे.

सचिव साहेब हे एकतर एवढे मोठे पुस्तक दिलेले आहे त्याच्यातली चुका शोधणार [illegible]

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांत तुम्हाला दिलेला आहे. आणि वेळेतच दिलेले आहे. उशिरा दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

सचिवांनी कामकाजाच्या सहाय्याप्रमाणे महापौरांसमोर लक्षवेधी ठेवलेली आहे.

**अनिल सावंत :-**

एक तरी घ्यायला पाहिजे. चर्चा तरी व्हायला पाहिजे साहेब.

**मा. आयुक्त :-**

फक्त त्याचा क्रम बदललेला आहे. कामकाजातला क्रम बदललेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

**दि. २०/०२/२०१८, दि. २६/०२/२०१८, दि. २८/०३/२०१८ (दि. २६/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा), दि. २८/०३/२०१८, दि. १८/०४/२०१८ व दि. ०२/०५/२०१८ (दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)** रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २१ :-**

**दि. २०/०२/२०१८, दि. २६/०२/२०१८, दि. २८/०३/२०१८ (दि. २६/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा), दि. २८/०३/२०१८, दि. १८/०४/२०१८ व दि. ०२/०५/२०१८ (दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे**

**ठराव क्र. २२ :-**

**दि. २०/०२/२०१८, दि. २६/०२/२०१८, दि. २८/०३/२०१८ (दि. २६/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा), दि. २८/०३/२०१८, दि. १८/०४/२०१८ व दि. ०२/०५/२०१८ (दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)** रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२, **कलम ३० अन्वये विशेष समित्या गठित करणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

*महाराष्ट्र महानगर अधिनियम प्रकरण 2 कलम 30 अन्वये खालीलप्रमाणे विशेष समित्या गठीत करुन त्यांच्या* कामकाजाचे क्षेत्र निश्चित केलेले आहे आणि कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवायचे आहेत आणि अशा समितीच्या शिफारसी स्थायी समिती व मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येतील.

| अ.क्र. | विशेष समित्यांचे नाव | अधिकार (कार्यकक्ष) |
|---|---|---|
| 1) | पाणी पुरवठा व मलनिःस्सारण समिती | १) शहरातील पाणी वितरणाबाबत देखरेख ठेवणे<br>२) नविन पाईप लाईन टाकणे, दुरुस्ती व इतर कामांचा आढावा घेणे<br>३) वॉल्वमनच्या कामाचा आढावा घेणे |

| | | |
|---|---|---|
| | क्रिडा व सांस्कृतिक समिती | १) शहरातील झोपडपट्टयांचा आढावा घेणे<br>२) झोपडपट्टया सोयी सुधारणा करणेबाबत आढावा घेणे<br>३) दारीद्र रेषेखालील नागरीकांच्या सोयी सुविधांचा आढावा घेणे<br>४) शासनाकडून येणाऱ्या दलित वस्ती सुधारणा अनुदानाच्या कामाचा आढावा घेणे<br>५) समाजातील विधवा, घटस्फोटीता, अंध, अपंग, मुली/महिला यांच्याकरीता शासनाने दिलेल्या योजनांचा लाभ देणे तसेच अंध अपंग व गटई कामगारांना स्टॉल देणेबाबत निर्णय घेणे तसेच संबंधीत विभागाकडे शिफारस करणे<br>६) शाळेचे सर्व क्रिडा संबंधी स्पर्धा आयोजित करणे त्याचे नियोजन करणे<br>७) महापालिकेच्या क्रिडा स्पर्धा आयोजित करणे.<br>८) महापालिकेचे वर्धापन दिन, स्वातंत्र्य दिन, 1 मे, गणपती विसर्जन नवरात्र विसर्जन तसेच इतर धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी नियोजन करणे. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, पुर्वनियोजन करणे.<br>९) सर्व प्रकारच्या परवान्याची माहिती घेणे, कोणताही परवाना देण्यापूर्वी समितीपुढे माहिती देणे.<br>१०)फेरीवाले संदर्भात कामकाज पाहणे व निर्णय घेणे, फेरीवाले धोरण निश्चित करणे व फेरीवाला संबंधीत इतर कामे पाहणे. |
| 3) | विधी व नियोजन समिती | १) महापालिकेच्या दाव्याबाबत आढावा घेणे.<br>२) दाव्याच्या आलेल्या निर्णयावर विचार विनीमय करणे<br>३) “से” दाखल केल्याबाबतची वेळोवेळी माहिती देणे<br>४) अभियोक्त्याच्या कामांचा आढावा घेणे व नविन अभियोक्ता नेमणेकरीता शिफारस करणे.<br>५) मनपाच्या विरुध्द गेलेल्या निकालाबाबत न्यायालयाच्या निर्णयाबाबत वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करणेकरीता शिफारस करणे<br>६) शहरातील रस्त्यांवर नियोजन करणे त्यामध्ये फेरीवाले हटविणे, फॅनिंग करणे, अतिक्रमण हटविणे इ. कामांचा आढावा घेणे<br>७) विकास आराखड्यामधील आरक्षणे विकसीत करणे, ताब्यात घेणेबाबत शिफारस करणे.<br>८) अग्निशमन परवाना देणे, इ. कामकाजाची माहिती समितीपुढे ठेवणे.<br>९) पावसाळ्यातील नाल्यांच्या साफसफाई कामांचा आढावा घेणे<br>१०)अतिक्रमणाबाबत अहवाल घेवून कारवाईसाठी शिफारस करणे.<br>११) पार्किंग नो पार्किंग, फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचा आढावा घेवून कारवाईसाठी शिफारस करणे<br>१२) महापालिकेची मालमत्ता कर, जाहिरात कर, परवाना, विकास आकार, मोबाईल टॉवर व इतर येणे असलेल्या वसुली व खर्चाचा आढावा घेवून त्याबाबत शिफारस करणे.<br>१३) स्ट्रीट लाईट, अग्निशमन, पाण्याच्या टाक्या या कामाचा आढावा घेवून शिफारस करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | [illegible] औषधांची आढावा घेणे<br>५) पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचा आढावा घेणे<br>६) दैनंदिन कामाचा आढावा घेवून त्यांच्या बिलाची शिफारस करणे.<br>७) हॉस्पीटल, दवाखाने, आरोग्य केंद्राचा आढावा घेवून शिफारस करणे.<br>८) घनकचरा, उद्याने, शौचालये या कामांचा आढावा घेणे.<br>९) शहरातील सर्व स्मशान, दफन भुमी, उद्यानांची देखरेख व निगा ठेवणे<br>१०)महापालिकेचे मैदाने सुशोभिकरण व इतर कामांवर शिफारस करणे<br>११) वृक्ष लागवडीवर देखरेख ठेवणे<br>१२) धोकादायक व विकास कामात आड येणाऱ्या वृक्षांबाबत शिफारस करणे |

वरील प्रमाणे 4 समित्या गठीत करुन त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले आहे व प्रत्येक समितीला रु.1 कोटी रुपयांची याप्रमाणे रु.4 कोटी तरतुद करावी लागणार आहे. सदरची रक्कम सन 2017-18 व सन 2018-19 मुळ अंदाजपत्रकातील "अ" **अंदाजपत्रक (महसुली खर्च), ब -आरोग्य व सोयी, 1- साफसफाई व सोयी, 4-वॉर्ड साफसफाई व नालेसफाई, 11-बांधकामे, 4-सार्वजनिक रस्ते/देखभाल/दुरुस्ती/पुर्नपृष्टीकरण, क अंदाजपत्रक महसुली खर्च, अ-17 मलनि:स्सारण केंद्र देखभाल दुरुस्ती, भांडवली खर्च ब 2- नविन जलवाहिनी टाकणे** या बार्बीमधून घेवून विशेष समिती या नविन लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात यावी. तसेच प्रत्येक समितीला रु.5 लाखापर्यंतचे कामाचे अंदाजपत्रक मंजुर करण्याचे अधिकार देण्यात येत आहे. तसेच वरील समित्यांना त्यांच्या कामकाजाकरीता संबंधीत विभागाने गोषवारे, टिप्पण्या, माहिती देणे बंधनकारक आहे तसेच मा. महासभा वेळोवेळी जी कामे सुचविल ती कामे करावयाची आहेत. सदर समित्यांनी शिफारस केलेली कामे मा. स्थायी समिती/मा. महासभेने निर्णय घेवून कार्यवाही करावयाची आहे व त्यावर प्रशासनाने अंमलबजावणी करावी. सदर समित्या 9 सदस्यांच्या असाव्यात व समिती सचिव म्हणून संबंधीत विभागाचे उप-आयुक्त यांनी काम करावयाचे आहे असा मी ठराव मांडत आहे.

**दिपिका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

तदर्थ समितीचे नियम सांगा.

**नगरसचिव :-**

महापालिका सभेस उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे प्रत्येक समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ठ केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवले पाहिजे व ते अशा समितींच्या शिफारशींसह महापालिकेस सादर केले पाहिजे असा निर्देश देता येईल. तसेच महापालिकेस तशाच ठरावाप्रमाणे आपला अधिकार व कर्तव्य यापैकी कोणते अधिकार व कर्तव्य विर्दिनिष्ठ केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येईल. हा ३० (२) मध्ये नमुद आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**जुबेर इनामदार :-**

आमचा ठराव आहे.

**अनिल सावंत :-**

मतदान घ्या ना.

**धृवकिशोर पाटील :-**

मतदान घ्या.

**मा. उपमहापौर :-**

तुमचे म्हणणे मांडा तुमचा ठराव ठेवा, आपण मतदान घेऊ.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२ करिता दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन ठराव पारित करणे अपेक्षित असल्यामुळे हा ठराव मतदानासाठी पुकारण्यात येत आहे. या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांनी कृपया हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे असेल त्यांनी कृपया हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाहीत.

**मा. महापौर :-**

ठरावाच्या बाजूने ५८, विरोधात २८, तटस्थ ० इतकी. हा ठराव वाचन केल्यानंतर सभागृहामध्ये एकून ८६ सदस्य उपस्थित आहेत ह्याच्यामध्ये २/३ सदस्याकरिता ८६ ला ३ ने भागले असता ५७.३३ असे अपेक्षित आहे म्हणजे ५७ सदस्य उपस्थित असणे ठरावाच्या बाजूने अपक्षित आहे. तथापि ठरावाच्या बाजूने ५८ मतदान झालेले आहे. आणि ठरावाच्या विरोधात २८ मतदान झालेले आहे.

**मा. महापौर :-**

सुचक धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५८.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय पालिकेची आर्थिक परिस्थिती आपण आल्यापासून ही सगळी चाचपणी केलीच असेल विशेष अनुदान हा महाराष्ट्र शासनाकडून आपल्याला उपलब्ध होणार होता ३३ कोटी रू. त्यातून अजून पर्यत ३३ पैसे.......................

**नगरसचिव :-**

जुबेर साहेब, आपला कृपया ठराव आधी द्या त्याच्यावरती मतदान घेतले जाईल त्यानंतर तुम्ही तुमचे म्हणणे मांडा.

**जुबेर इनामदार :-**

तसे होत नाही तुम्ही आपल्या वेळेला महापौर बोलले दुसरा विषय वाचा. मी माझे भाषण केल्यानंतर माझा ठराव वाचीन. तो माझा अधिकार आहे.

**नगरसचिव :-**

आता आपण मतदानाची प्रक्रिया सूरू करूया.

**अनिल सावंत :-**

तुम्ही मतदान घेतल दोन्ही ठराव घेण्यासाठी.

**जुबेर इनामदार :-**

माझा ठराव वाचल्यानंतर परत तुम्हाला फेर मतदान घ्यावे लागेल.

**अनिल सावंत :-**

त्यांनी जो ठराव घेतलेला आहे त्याचा आता आमचा हा ठराव आहे त्या ठरावावर मतदान घ्या.

**मा. उपमहापौर :-**

ठराव वाचा.

**मा. आयुक्त :-**

ते ठरावच मांडत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सत्तेचा दबावाखाली एवढे बळी पडू नये शासन आहे. शासन दरबारी अजून लोक ऐकतात पारदर्शक काम करणारे मुख्यमंत्री आहेत ना.

**धृवकिशोर पाटील :-**

सभागृहामध्ये कोणाला बोलायचे असेल त्यांनी महापौराची परवानगी घेतली पाहिजे. आपण जर परवानगी दिली नसेल तर त्यांना बोलायचा अधिकार नाही.

**जुबेर इनामदार :-**

ठराव बोलताना मला परवानगीची गरज लागत नाही. ठरावाचा माझा अधिकार आहे.

**जंयतीलाल पाटील :-**

आता धृवकिशोरजीने परवानगी घेतली का?

**मा. महापौर :-**

तुम्ही पण परवानगी घेतली नाही. तुम्ही पण बसून जा कोईभी सदस्य परवानगी शिवाय उठेगा नही। आप बैठ जाईए।

**जुबेर इनामदार :-**

या पालिकेमध्ये अशा समिती गठीत झाल्या होत्या याच व्यासपिठावर विराजमान उपमहापौर साहेब होते ह्या समिती यांनी विसर्जन करून आणले होत आणि त्याचे कारण तेव्हा तेच होत की पालिकेची आर्थिक परिस्थिती अशा समिती गठीत करण्यासाठी आपल्याला गरज नाही. समिती गठी करायच्या अडचण आणि कुठेतरी जाऊन आपल्याला त्याला आर्थिक बोजा पालिकेवर पडणार. ४ कोटी रू. तरतूद करायला सांगितली उद्या तुमचा पगार आणि आमचे मानधन या पालिकेकडून आम्हाला मिळेल की नाही त्याची शाश्वती देता येत नाही अशी परिस्थिती आणून ठेवलेली आहे. आणि अशा परिस्थितीत अशा समिती गठीत करणे अयोग्य विषय आहे. फक्त पद वितरण करण्यासाठी पालिकेला वेठीस धराव की ह्या अर्थव्यवस्थेला वेठीस धरायचे हा काही शहरातल्या हिताचा नाही.

**जुबेर इनामदार :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला असून सदर विशेष समित्यांचा खर्च महानगरपालिकेला पेलवणार नाही. तरी सदरच्या विशेष समित्या गठित करु नये असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२ साठी दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन श्रीम. दिपिका अरोरा. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्री. हरिश्चंद्र आमगावकर. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. पहिला ठराव सुचक धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाही.

**मा. महापौर :-**

श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५८, विरोधात २८, तटस्थ ० इतकी मत पडली आहेत श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी माडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२ :-**

**कलम ३० अन्वये विशेष समित्या गठित करणे.**

**ठराव क्र. २३ :-**

महाराष्ट्र महानगर अधिनियम प्रकरण 2 कलम 30 अन्वये खालीलप्रमाणे विशेष समित्या गठीत करुन त्यांच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केलेले आहे आणि कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवायचे आहेत आणि अशा समितीच्या शिफारसी स्थायी समिती व मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येतील.

| अ.क्र. | विशेष समित्यांचे नाव | अधिकार (कार्यकक्ष) |
|---|---|---|
| 1) | पाणी पुरवठा व मलनि:स्सारण समिती | १) शहरातील पाणी वितरणाबाबत देखरेख ठेवणे<br>२) नविन पाईप लाईन टाकणे, दुरुस्ती व इतर कामांचा आढावा घेणे<br>३) वॉल्वमनच्या कामाचा आढावा घेणे<br>४) नविन कनेक्शनची माहिती घेणे<br>५) सिव्हरेज कामावर देखरेख ठेवणे<br>६) पाणी गळती कामाचा आढावा घेणे |
| 2) | शिक्षण व समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती | १) शहरातील झोपडपट्ट्यांचा आढावा घेणे<br>२) झोपडपट्ट्या सोयी सुधारणा करणेबाबत आढावा घेणे<br>३) दारीद्य रेषेखालील नागरीकांच्या सोयी सुविधांचा आढावा घेणे<br>४) शासनाकडून येणाऱ्या दलित वस्ती सुधारणा अनुदानाच्या कामाचा आढावा घेणे<br>५) समाजातील विधवा, घटस्फोटीता, अंध, अपंग, मुली/महिला यांच्याकरीता शासनाने दिलेल्या योजनांचा लाभ देणे तसेच अंध अपंग व गटई कामगारांना स्टॉल देणेबाबत निर्णय घेणे तसेच संबंधीत विभागाकडे शिफारस करणे<br>६) शाळेचे सर्व क्रिडा संबंधी स्पर्धा आयोजित करणे त्याचे नियोजन करणे<br>७) महापालिकेच्या क्रिडा स्पर्धा आयोजित करणे.<br>८) महापालिकेचे वर्धापन दिन, स्वातंत्र्य दिन, 1 मे, गणपती विसर्जन, नवरात्र विसर्जन तसेच इतर धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी नियोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, पुर्वनियोजन करणे.<br>९) सर्व प्रकारच्या परवान्याची माहिती घेणे, कोणताही परवाना देण्यापूर्वी समितीपुढे माहिती देणे.<br>१०)फेरीवाले संदर्भात कामकाज पाहणे व निर्णय घेणे, फेरीवाले धोरण निश्चित करणे व फेरीवाला संबंधीत इतर कामे पाहणे. |
| 3) | विधी व नियोजन समिती | १) महापालिकेच्या दाव्याबाबत आढावा घेणे.<br>२) दाव्याच्या आलेल्या निर्णयावर विचार विनीमय करणे<br>३) "से" दाखल केल्याबाबतची वेळोवेळी माहिती देणे<br>४) अभियोक्त्याच्या कामांचा आढावा घेणे व नविन अभियोक्ता नेमणेकरीता शिफारस करणे.<br>५) मनपाच्या विरुध्द गेलेल्या निकालाबाबत न्यायालयाच्या निर्णयाबाबत वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करणेकरीता शिफारस करणे<br>६) शहरातील रस्त्यांवर नियोजन करणे त्यामध्ये फेरीवाले हटविणे, फेंनिंग करणे, अतिक्रमण हटविणे इ. कामांचा आढावा घेणे<br>७) विकास आराखड्यामधील आरक्षणे विकसीत करणे, ताब्यात घेणेबाबत शिफारस करणे.<br>८) अग्निशमन परवाना देणे, इ. कामकाजाची माहिती समितीपुढे ठेवणे.<br>९) पावसाळ्यातील नाल्यांच्या साफसफाई कामांचा आढावा घेणे<br>१०) अतिक्रमणाबाबत अहवाल घेवून कारवाईसाठी शिफारस करणे.<br>११) पार्किंग नो पार्किंग, फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचा आढावा घेवून कारवाईसाठी शिफारस करणे<br>१२) महापालिकेची मालमत्ता कर, जाहिरात कर, परवाना, विकास आकार, मोबाईल टॉवर व इतर येणे असलेल्या वसुली व खर्चाचा आढावा घेवून त्याबाबत शिफारस करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ४) खरेदी केलेल्या औषधांचा आढावा घेणे<br>५) पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचा आढावा घेणे<br>६) दैनंदिन कामाचा आढावा घेवून त्यांच्या बिलाची शिफारस करणे.<br>७) हॉस्पीटल, दवाखाने, आरोग्य केंद्राचा आढावा घेवून शिफारस करणे.<br>८) घनकचरा, उद्याने, शौचालये या कामांचा आढावा घेणे.<br>९) शहरातील सर्व स्मशान, दफन भुमी, उद्यानांची देखरेख व निगा ठेवणे<br>१०)महापालिकेचे मैदाने सुशोभिकरण व इतर कामांवर शिफारस करणे<br>११) वृक्ष लागवडीवर देखरेख ठेवणे<br>१२) धोकादायक व विकास कामात आड येणाऱ्या वृक्षांबाबत शिफारस करणे |

वरील प्रमाणे 4 समित्या गठीत करुन त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले आहे व प्रत्येक समितीला रु.1 कोटी रुपयांची याप्रमाणे रु.4 कोटी तरतुद करावी लागणार आहे. सदरची रक्कम सन 2017-18 व सन 2018-19 मुळ अंदाजपत्रकातील "अ" **अंदाजपत्रक (महसुली खर्च), ब -आरोग्य व सोयी, 1- साफसफाई व सोयी, 4-वॉर्ड साफसफाई व नालेसफाई, 11- बांधकामे, 4-सार्वजनिक रस्ते/देखभाल/दुरुस्ती/पुर्नपृष्टीकरण, क अंदाजपत्रक महसुली खर्च, अ-17 मलनि:स्सारण केंद्र देखभाल दुरुस्ती, भांडवली खर्च ब 2- नविन जलवाहिनी टाकणे** या बाबींमधून घेवून विशेष समिती या नविन लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात यावी. तसेच प्रत्येक समितीला रु.5 लाखापर्यंतचे कामाचे अंदाजपत्रक मंजुर करण्याचे अधिकार देण्यात येत आहे. तसेच वरील समित्यांना त्यांच्या कामकाजाकरीता संबंधीत विभागाने गोषवारे, टिप्पण्या, माहिती देणे बंधनकारक आहे तसेच मा. महासभा वेळोवेळी जी कामे सुचविल ती कामे करावयाची आहेत. सदर समित्यांनी शिफारस केलेली कामे मा. स्थायी समिती/मा. महासभेने निर्णय घेवून कार्यवाही करावयाची आहे व त्यावर प्रशासनाने अंमलबजावणी करावी. सदर समित्या 9 सदस्यांच्या असाव्यात व समिती सचिव म्हणून संबंधीत विभागाचे उप-आयुक्त यांनी काम करावयाचे आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | निरंक |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | रॉड्रीक्स मोरस जोसेफ | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरधर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | यादव मिरादेवी रामलाल | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | शाह रिटा सुभाष | ११ | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| १२ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | गोहिल शानू जोरावर सिंह | १३ | पाटील अनिता जयवंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | अरोरा दीपिका पंकज | | |
| २२ | नाईक विविता विवेक | २२ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन |
| २३ | बेलानी हेमा राजेश | २३ | पाटील वंदना विकास |
| २४ | भोईर विणा सुर्यकांत | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| २५ | सोनार सुरेखा प्रकाश | २५ | भोईर कमलेश यशवंत |
| २६ | मुखर्जी अनिता बबलू | २६ | अहमद साराह अकरम |
| २७ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट |
| २८ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २८ | बांड्या एलायस दुमिंग |
| २९ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाळ | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३२ | शेट्टी अरविंद आनंद | | |
| ३३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ३४ | तिवारी अशोक सूर्यदेव | | |
| ३५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | |
| ३६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | |
| ३७ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| ३८ | रकवी वैशाली गजेंद्र | | |
| ३९ | कांगणे मीना यशवंत | | |
| ४० | परमार हेतल रतिलाल | | |
| ४१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ४२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |
| ४३ | म्हात्रे नयना गजानन | | |
| ४४ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ४५ | थेराडे संजय अनंत | | |
| ४६ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | |
| ४७ | जैन राजेंद्र भवरलाल | | |
| ४८ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ४९ | जैन दिनेश तेजराज | | |
| ५० | गजरे दौलत तुकाराम | | |
| ५१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | |
| ५२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | |
| ५३ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ५४ | व्यास रवि वासुदेव | | |
| ५५ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | |
| ५६ | पांडेय पंकज सूर्यमणि | | |
| ५७ | भोईर गणेश गजानन | | |

| ५८ | पारधी सुजाता यशवंत | | | | |
|---|---|---|---|---|---|

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मा. महापौर तुमच्या परवानगीने एक अभिनंदनाचा ठराव आहे. **मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांनी भारतीय सिमारेषेवर कार्यरत असताना दाखविलेल्या असाधारण शौर्याबद्दल दि. २६ जानेवारी २०१८ रोजी भारताचे माननीय राष्ट्रपती यांचे हस्ते "सेना मेडल" प्रदान करण्यात आले. मेजर कौस्तुभ हे या शहराचे सुपुत्र असून शीतल नगर, रुम नं. ९, हिरल सागर, मिरारोड (पूर्व) ठाणे-१०११०७ येथे राहतात. २०१० साली कम्बाईन डिफेन्स सर्विस परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांनी ऑफीसर्स ट्रेनिंग चेन्नई येथे पूर्ण केले. ऑक्टोंबर २०११ मध्ये ते लेफ्टनंट पदावर रुजु झाले. २०१३ साली ते कॅप्टन झाले व २०१८ साली मेजर पदावर कार्यरत आहे. सध्या ते ३६ वी बटालियन दि राष्ट्रीय रायफल्स मध्ये असून भारताच्या सिमेवर देशाचे रक्षण करण्याचे महानग कार्य करत आहेत.**

**त्यांचे कार्य महान असून त्यांना मिळालेल्या पदकामुळे या शहराचासुध्दा गौरव झालेला आहे. या सभागृहातर्फे त्यांचा गौरव व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम कौस्तुभ सुभेदार आहेत त्याचे वडील ह्या ठिकाणी आलेले आहेत. माझी आपल्याला विनंती राहील आपण स्केटींगच्या विद्यार्थ्यांचा ज्यावेळी सत्कार करणार आहोत. तेव्हा त्यांना सुध्दा बोलवून त्यांचा सुध्दा सत्कार करण्यात यावा.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम आणखीन अभिनंदनाचा ठराव मांडतो. आपले खासदार श्री. राजेंद्र गावीत यांना प्रचंड मताने विजय झाला त्यांचे ही अभिनंदन सभागृहात करत आहे. त्याच बरोबर आमदार निरंजन डावखरे हे ही प्रचंड मतांनी निवडून आले त्यांचे ही सभागृह अभिनंदन करत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

प्रभाग समितीचे सहा सभापती झाले यांचे पण हार्दिक अभिनंदन.

**अभिनंदन ठराव क्र. २१ :-**

**मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांनी भारतीय सिमारेषेवर कार्यरत असताना दाखविलेल्या असाधारण शौर्याबद्दल दि. २६ जानेवारी २०१८ रोजी भारताचे माननीय राष्ट्रपती यांचे हस्ते "सेना मेडल" प्रदान करण्यात आले. मेजर कौस्तुभ हे या शहराचे सुपुत्र असून शीतल नगर, रुम नं. ९, हिरल सागर, मिरारोड (पूर्व) ठाणे-१०११०७ येथे राहतात. २०१० साली कम्बाईन डिफेन्स सर्विस परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांनी ऑफीसर्स ट्रेनिंग चेन्नई येथे पूर्ण केले. ऑक्टोंबर २०११ मध्ये ते लेफ्टनंट पदावर रुजु झाले. २०१३ साली ते कॅप्टन झाले व २०१८ साली मेजर पदावर कार्यरत आहे. सध्या ते ३६ वी बटालियन दि राष्ट्रीय रायफल्स मध्ये असून भारताच्या सिमेवर देशाचे रक्षण करण्याचे महानग कार्य करत आहेत.**

**त्यांचे कार्य महान असून त्यांना मिळालेल्या पदकामुळे या शहराचासुध्दा गौरव झालेला आहे. या सभागृहातर्फे त्यांचा गौरव व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

अभिनंदन ठराव क्र. २१अ :-

खासदार श्री. राजेंद्र गावीत यांना प्रचंड मताने विजय झाला त्यांचे अभिनंदन सभागृहात करत आहे. त्याच बरोबर आमदार निरंजन डावखरे हे ही प्रचंड मतांनी निवडून आले त्यांचे ही सभागृह अभिनंदन करत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. २३, **महानगरपालिकेच्या शाळा खाजगी संस्थांकडून देखरेख व शैक्षणिक दर्जा उंचावणेकरीता देणेबाबत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचविण्याकरिता महापालिका प्रशासनातर्फे आपल्यातर्फे आपण चांगला उपक्रम राबविला. नुकतेच मागे सगळ्या शिक्षकांचे आपण ट्रेनिंग ठेवले होते. त्या ट्रेनिंगमध्ये बाहेरुन चांगले शिक्षकांना बोलवले होते. काही मोटिव्हेशन ट्रेनर्सना बोलवले होते आणि त्या सगळ्या शिक्षकांचे आपण एक चांगल मोटिव्हेशन केले. कसं विद्यार्थ्यांना शिकवायचं आणि त्यांची शैक्षणिक पातळी कशी वाढवायची. त्या हिशोबाने पण त्यांनी प्रयत्न केले होते. तसेच आपल्या ज्या महापालिका शाळेत ह्या शाळांमध्ये आपण ई-क्लास रुम सुध्दा स्थायी समितीमध्ये तो प्रस्ताव पास केलेला आहे. असे लवकर निविदा येऊन काही शाळांमध्ये आपण त्याच्यामध्ये ई-क्लास रुम पण करणार आहोत. तसेच पालक प्रबोधन मिटींग पण आपण घेणार आहोत. प्रत्येक शाळेमध्ये जे पालक आहेत त्या पालकांना बोलवून त्या पालकांनी त्या मुलांची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली पाहिजे. त्यांना कपडे त्यांना एज्युकेशनचे साहित्य त्यांनी अभ्यास करतो की नाही आणि शाळेचे शिक्षक कसे शिकवतात याबद्दल एक पी.टी.ए पॅरेन्ट ट्युशन असोसिएशन आपण करणार आहोत. असे वेगवेगळे उपक्रम करणार आहोत. आणि तसेच ह्या ज्या शाळा आहेत ह्या शाळा काही मिरा भाईंदर शहरातील काही महत्वाच्या शाळा आहेत. जस आर.बी.के. स्कुल असेल किंवा एन.एच हायस्कूल असेल, अभिनव विद्या मंदिर आहे. भाईंदर सेकेंडरी अशा बऱ्याच नामवंत संस्था आहेत. सेव्हन स्क्वेअर ॲकेडमी आहेत. ह्या संस्थांना पण आपण आपल्या महापालिका शाळा दत्तक द्यायच्या असा संकल्प आहे. म्हणून आपण हा विषय आणला होता. आणि म्हणून आम्ही ठराव करतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सध्या इ. १ ली ते ८ वी पर्यंत एकूण ३६ शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये मराठी माध्यम-२१ शाळा, उर्दू माध्यम-०५ शाळा, हिंदी माध्यम-०५ शाळा व गुजराती माध्यम -०५ शाळा अशा एकुण ३६ शाळा कार्यरत आहेत. त्यामध्ये मराठी माध्यमाचे विद्यार्थी-४५११, उर्दू माध्यमाचे विद्यार्थी-१२२२, हिंदी माध्यमाचे विद्यार्थी-२५९५ व गुजराती माध्यमाचे-३४१ विद्यार्थी असे एकूण ८६६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शासनाकडून २०२ पायाभुत शिक्षक पदे मंजुर असून सध्या १८० शिक्षक कार्यरत आहेत. या महानगरपालिकेच्या ३६ शाळा २२ इमारतींमध्ये भरतात.

महाराष्ट्र शासनाकडून "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" हा मोठा उपक्रम सुरु आहे. महानगरपालिका शिक्षण विभागात सध्या शिक्षणाधिकारी एकच अधिकारी आहेत. याशिवाय कोणतीही पर्यवेक्षण यंत्रणा कार्यरत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांचा शैक्षण्कि गुणवत्ता व दर्जा उंचाविण्यासाठी व उपक्रम राबविण्यासाठी मुंबई व मिरा भाईंदर पहरसरातील स्वयंसेवी खाजगी संस्थांची (NGO) खाजगी शाळा महानगरपालिकेच्या शाळांना देखरेखीकरीता (स्वच्छता व सुरक्षितता) नेमणूक करावी. परंतु या सेवेबाबत महानगरपालिकेकडून कोणताही मोबदला दिला जाणार नाही. संबंधीत संस्थेने नि:स्वार्थ भावनेने काम करणे, महानगरपालिकेच्या शाळांमधील प्रशासनात हस्तक्षेप करणार नाही. तसेच मुख्याध्यापक/शिक्षकांच्या प्रशासकीय कामात कोणताही हस्तक्षेप करु नये ही सुध्दा काळजी घेणे.

...... ..... ५पून व संस्थानी पत्र दवून आमंत्रीत करावे व महापौर, आयुकत व पदाधिकारी यांचेशी बैठक घेवून इच्छुक संस्थेला नेमुन द्याव्यात. त्याच संस्थेने महापालिका शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देणे, मुलांचे कौन्सीलिंग करणे, मुलांचा बौध्दीक व शारिरीक विकास करणे तसेच संस्थांना/शाळेला आर्थिक वा वस्तु रुपाने शालेय उपयोगी सामान द्यावयाचे असल्यास ते स्विकारावे. याव्यतिरीक्त आणखी कोणत्या सुधारणा कराव्यात जेणेकरुन महापालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल व त्याबाबतची माहिती महापालिका आयुक्तांना द्यावयाची आहे. या सर्व बाबींवर विचार विनीमय करणेकामी दर दोन महिन्यांनी आयुक्त यांनी पदाधिकारींसमवेत सदर संस्थांचे व शाळांचे बैठकीचे आयोजन करावयाचे आहे. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचा गौरव सत्कार करण्यात यावा. तसेच महापालिका शाळा, खाजगी संस्था/ शाळा यांना देखरेख व शैक्षणिक दर्जा उंचावणेकरीता हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम साहेब परत तीच परिस्थिती आहे. प्रशासनाचा गोषवारा वेगळा आहे. ठराव वेगळा आहे. प्रशासनाने गोषवारा वेगळा सिक्युरीटी आणि हाऊस किपींगसाठी एन.जी.ओ. यांना देण्यांत यावे द्या ना त्याच्यामध्ये स्थानिक संस्थांना प्राधान्य द्या. प्रॉपर्टीची पेपर नोटिस काढा. ज्या संस्था पुढे यायच्या असतील त्या येतील. पण ज्यावेळी शाळा दत्तक द्यायचा विषय निघतो हे अस आपण करु शकतो का? उद्या शाळा दत्तक दिल्या तर शाळांची परिस्थिती काय ह्या सभागृहामध्ये सांगितले गेले की आम्ही कायदा उपक्रम हाताळत आहोत. साहेब ह्या पालिका शाळांमध्ये जे संगणक दिले गेले गेल्या वर्षभरापासून धुळ खात पडलेले आहेत. आज शाळांची जी २२ इमारती आहेत त्यांची परिस्थिती अतिशय भयानक आहे. मिरारोड मार्केटच्या शाळेचे तुम्हाला उदाहरण देतो. बाजुच्या गोडाऊन मधून त्याचा उपयोग करत आहेत. स्ट्रक्चरल ऑडीट इमारतींचे कधी झालेले नाही. मी माहिती मागवली होती. पण मला माहिती मिळाली नाही. पालिका करोडो रुपये खर्च करते. पी.डब्ल्यू.डी. असेल, आरोग्य असेल आपण जो विषय आणला होता देखभालीसाठी, हाऊस किपींगसाठी आणि सिक्युरीटीसाठी जर काही संस्था येत असतील एन.जी.ओ. आणि पालिकेचा एकही पैसा खर्च न होता तर हरकत नाही. पण शाळा दत्तकच द्यायचा विषय निघाला आहे तर शाळा म्हणजे महापालिकेची प्रॉपर्टी कुठच्या तरी संस्थेला देऊन टाकायची आणि मग ती संस्था काय करणार त्या प्रॉपर्टीचा उपयोग आपल्या सोयीसाठी करणार मग कोचिंग क्लासेस असो एक्स्ट्रा क्लासेस असो हे पालिकेच्या प्रॉपर्टीमध्ये तस काही होऊ ' शकत. आयुक्त साहेब गोषवारा आणि ठराव याचा आपण विचार करावा आणि त्या अनुषंगानेच कारवाई करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सावंत साहेब हा जो विषय आणला या विषयामध्ये आपण म्हणतो की आपण ठराव वेगळा आहे. अशी भुमिका आपण घेतली परंतू ह्या शाळांना नव चैतन्य देण्याची गरज आहे. मिरा भाईदर महानगरपालिका शाळा १९९४ साली जेव्हा आपल्या ताब्यात आल्या त्यानंतर त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले. आपण मिरारोडच्या शाळेचा उल्लेख केला. त्या शाळा विसरायला मी नगरसेवक असताना १९९८ साली बांधायला सुरूवात केली तर एवढ्यात काय त्याचे स्ट्रक्चर ऑडिट करायच महानगरपालिकेचे आहे ते महापालिका घेणार परंतु तुमच्या बोलण्यातून अस स्पष्ट होत आहे की जस ती शाळा मोडकळीस आली.

**अनिल सावंत :-**

साहेब मोडकळीस नाही मी बोललो गैरवापर होत आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा जो आमचा प्रयत्न आहे मिरा भाईदर महानगरपालिकेत आजपर्यंत प्रशासन अधिकारी म्हणूनच त्या खात्यात काम करत होते पहिल्यांदा शिक्षण अधिकारी आल्यानंतर ह्या शाळांचा प्रगतीचा आलेख हा उन्नत व्हाव या दृष्टीकोनातून आपण ह्या स्पर्धेचा युगामध्ये मोठ्या शाळा आहेत त्यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले पाहिजे हा उद्देश आहे. ह्याच्यामध्ये कुठच्याही प्रकारचे महानगरपालिकेला खर्च होणार नाही ही बाब सुस्पष्ट आहे. महानगरपालिकेच्या शिक्षणला याच्यात देखील आपण अत्यंत प्रगतशील आहेत आपण संगणकाचा उल्लेख केलात महानगरपालिकेची शाळा आपण डिजिटल करण्याचे काम सूरू केलेले आहे. सर्व शाळामध्ये इंग्रजी अक्षर व पहिल्या वर्गापासून सुरू केलेली आहे. पालक सभा प्रत्येक शाळेमध्ये होतात ज्या परिसरात ती शाळा आहे त्या परिसरातल्या पालकांची समिती देखील शाळेवरती घेतलेला आहे. परंतू

आपल्याला असे वाटते की ह्या मोठ्या शाळा आहेत [illegible]
प्रगती करत आहे. थोडस आपल्याला मार्गदर्शन झाले तर अधिक चांगले काम आपण करू शकू. तुम्हाला गौरवानं सांगतो ज्या प्रामाणिक शाळेत मी शिकत होतो. घोडबंदरची शाळा क्र. ०९ ह्या शाळेमध्ये गेल्या ९ वर्षात सभागृहामध्ये कौतुकाची गोष्ट आहे गेल्या ६ वर्षामध्ये राजा शिवाजी विद्यालय मध्ये पहिला क्रमांक आलेला विद्यार्थी हा महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतलेला विद्यार्थी होता. म्हणजे निश्चित त्या मुलांमध्ये पोटेन्शिअल आहे त्या मुलांना आपल्याला अधिक ताकद कशी देता येईल. अधिक नविन काय शिकवता येईल ह्या दृष्टीकोनातून तो ठराव घेतला त्याच्यामध्ये काही वेगळा विचार करायची काही गरज नाही. ही संपूर्ण शहराची गरज आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम अशी माझी एक सुचना आहे की एकतर महापालिकेचा अखत्यारीत अंतर्गत प्रत्येक ठिकाणी कुठच्या ना कुठच्या वास्तुवर म्हणा किंवा इतर ठिकाणी देखरेख करण्याचेही प्रत्येक वेळी खाजगी संस्थांचा आता वापर केला जात आहे. तर खाजगी संस्थांचा वापर करण्यापेक्षा महापालिकेचे अधिकारी इतके वर्ष याच्यावर देखरेख करतच आहेत. परंतु त्यांच्या जोडीला जर त्या-त्या प्रभागातील नगरसेवक किंवा त्या आपल्या ज्या मेन हुद्दयावर असणारे अशा पध्दतीने त्यांची जर एखादी कमिटी आपण स्थापन केली आणि त्या-त्या त्यांच्या प्रभागातील शाळांवर देखरेख करण्यासाठी जर तुम्ही त्यांचे अस्तित्व तिथे ठेऊन दिले तर ते आणखीन चांगल्या प्रकारे त्याच्यावर नियंत्रण ठेऊ शकतील. प्रत्येक वेळी खाजगी संस्थांना त्याच्यात समाविष्ठ करुन घेऊन कदाचित त्याचा दुरुपयोग होण्याचा देखील संभव आहे. त्याच्यामुळे खाजगी संस्थांना प्रत्येक ठिकाणी इनव्हॉल्व आपण करु नये ही माझी सुचना आहे.

**मा. उपमहापौर :-**

ताई ह्या विषयात तुमच्या माहितीसाठी प्रत्येक शाळा आहेत. त्या परिसरातील जो नगरसेवक आहे तो त्या शाळा समितीचा अध्यक्ष असतोच आणि सर्व शाळांनी समित्या नेमलेल्या आहेत.

**निलम ढवण :-**

मग त्यांना काय अधिकार आहेत. खाजगी संस्थांना का देत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या सुचना आपले मार्गदर्शन होऊ द्या ना.

**निलम ढवण :-**

वैती साहब माझे म्हणणे असे आहे की तुम्ही जर तिथला नगरसेवक तिथला अध्यक्ष आहे. अध्यक्ष असतांना मग तिथल्या स्थानिक नगरसेवकांचा तिथल्या वास्तूवर शाळेवर त्यांचे नियंत्रण नाही का? तुम्हाला खाजगी संस्था कशाला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

खाजगी संस्था म्हणजे काय बोलतो ह्या मिरा भाईदरमध्ये १० वीच्या बोर्डमध्ये दरवर्षी १०० टक्के रिझल्ट देणारे अनेक शाळा आहेत मिरा भाईधर मधल्या ह्या शाळांमधला हा जो त्यांचा मधला महत्वाचा गुण आहे. त्यांने कुठच्या प्रकारची शिस्त काय प्रकारचे शिक्षण याच्यासाठी आपल्याला ते मार्गदर्शन करायला येतील दत्तक द्या म्हणजे काय आपण शाळा त्यांना चालवायला देत नाही शाळा पूर्णतः महानगरपालिकाच चालवणार आहेत. फक्त त्याच्यावरती देखरेख मार्गदर्शन हे प्रायव्हेट संस्थेचे घेतोय स्वागतर्ह आहे आणि त्यांना मानधन देत नाही महानगरपालिका खर्च करत नाही आणि कूठचे अधिकार देत नाही.

**निलम ढवण :-**

मा. आयुक्त साहेब जरी खर्च झाला नाही मार्गदर्शन जरूर घ्याव. चांगल्या संस्थाचे मार्गदर्शन जरूर घ्याव. त्याच्यामुळे फायदा तर होणारच आहे. असे पण आपण महानगरपालिकेतर्फे बरेच करू शकतो काही त्यांची व्याख्यान म्हणा इतर काही ज्या गोष्टी असतात त्या आपण करू शकतो. म्हणून अगदी महासभेत विषय ठेवून खाजगी संस्थामागे ते करण्याचे काय हेतू आहेत. मग तिथले नगरसेवक सक्षम नाहीत का? त्या शाळेसाठी काय पाहिजे त्या मुलांना काय दिले पाहिजे. हे आता तर ४-४ नगरसेवक प्रत्येक प्रभागामध्ये त्या नगरसेवकांना तिथे त्या शाळेत दत्तक म्हणून द्या त्या शाळेचे विकास नियंत्रण, त्या शाळेला काय पाहिजे. त्यांना आवश्यक सुविधा कशा मिळाल्या पाहिजेत त्या विषयावर शिक्षणाधिकारी यांना घेऊन त्यांनी त्याच्यावर त्यांना त्या सुविधा द्याव्यात. आयुक्त साहेबांशी ह्या विषयावर बोलणे झालेले आहे का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर आणि उपमहापौर महोदय सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. जो प्रस्ताव आलेला आहे प्रत्येक शाळा निहाय आपली नगरसेवक अध्यक्ष असलेली समिती आहे. आता बहुसंख्य सदस्य असल्यामुळे कदाचित त्याच्यामध्ये कोण अध्यक्ष, कोण सहअध्यक्ष ती ऑर्डर मी तपासून घेतो. ही संस्था असाईन होत असताना याच्यामध्ये कुठलेही मानधन नाही. मावेदा नाही किंवा त्यांचे हस्तक्षेप नाही. त्यांची चांगली आयडीया आपल्याला घ्यायच्या आहेत. तेव्हा संस्थेसोबत जे कोणी आमच्या वॉर्डातील सदस्य असतील त्या कामकाजाच्या अध्यक्ष असतील त्यांच्या नियंत्रणाखाली ही संस्था आणि प्रशासन काम करेल अशी एक त्यांची सुधारणा याच्यामध्ये ॲड करावी अस मला वाटतं.

**निलम ढवण :-**

धन्यवाद साहेब आणि एक मुद्दा साहेब यालाच धरुन अपंगाच्या ज्या शाळा आहे. अपंग मुल किंवा विकलांग मुल आहेत. मंदबुध्दीची त्यांच्यासाठी देखील आपल्या शिक्षण विभागामार्फत आता बऱ्याचशा खाजगी शाळा चालु झालेल्या आहेत आणि त्या खाजगी शाळा अवाढव्य फी आकारतात. खरतर त्यांना शिक्षण देणे हा पहिला त्यांचा अधिकार आहे. आणि तो त्यांना मिळणे गरजेचे आहे. परंतु आर्थिक परिस्थिती किंवा त्या मुलांवर होणारा पालकांचा खर्च विचारात घेता त्या मुलांसाठी ज्या शाळा आहेत. सर्वसामान्य शाळांपेक्षा देखील त्यांच्या एकतर कदाचित मोफत शिक्षण दिले जावे अन्यथा कमीत कमी खर्च त्या शाळेमार्फत केला जावा. कारण आता खाजगी संस्थांनी ज्या शाळा चालु केल्या आहेत ८-८, ९-९ हजार महिन्याला त्यांची फी असते यावर आपण नियंत्रण ठेवावे आणि त्यानुसार त्यांना एकतर मोफत नसेल तर कमीत कमी फी आकारुन त्या विकलांग आणि मतिमंद मुलांसाठी शाळांमध्ये त्यांना योग्य ते शिक्षण दिलं जावं अशी मी आपणाला विनंती करते.

**मा. आयुक्त :-**

महापौर महोदया याबाबत शासनाने काय स्टॅन्डिंग ऑर्डर आहेत त्या तपासून त्याबद्दल कारवाई केली जाईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम हा जो ठराव आला खरतर याच्यामध्ये दत्तक देण्याचा विषयच नाही. कुठेही शब्द आला नाही की आपण शाळा दत्तक देत आहोत. ठराव माझ्याकडे आहे. असे काही नाही मी असे म्हणेन की ह्या गोष्टीचे समाधान करेन याचे कारण असे आहे की तुम्हाला सर्वांना आपण जे सभागृह सगळे सदस्य बोलले किंवा सभागृहात उपस्थित सर्व सदस्य महापालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांचे शिक्षण दर्जाबाबत आपण सगळेच जण असमाधानी आहोत. आता काही ना काही गोष्टी करुन नविन नविन प्रयोग करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दर्जा कसा उंचावेल हा सगळ्यांचा प्रयत्न असला पाहिजे. तुमचाही असला पाहिजे आमचाही असला पाहिजे. तुम्हीही त्या विचारापासून वेगळे नाहीत. आणि त्या दृष्टीने जर नामवंत शाळांमधल्या तिथल्या प्रशासनाचा काही आपण अनुभव घेतला तर निश्चितपणे आपल्या महापालिकेच्या शाळांना संजीवनी मिळाल्यासारखे होईल आणि त्याच्यामध्ये आपण प्रयोग करायला काय हरकत आहे. मुळात शिक्षण हा एक प्रयोगाचा भाग आहे. आपण शिक्षण संस्थांमध्ये अधिक के.जी. पासून तयारच करत आलेलो आहोत आणि जसा आपल्याला रिझल्ट मिळत गेला त्याप्रमाणे शिक्षण दर्जा हा ऊंचावत जातो. हा त्या प्रशासनाचा भाग झाला. त्या विषयाचा भाग झाला आणि म्हणून हा जो ठराव झाला याचा मी पूर्णपणे समर्थन करते. राहीला मुद्दा निलम ताईंचा निलम ताई म्हणाल्यात त्या विषयात तो विषय चांगलाच आहे. प्रश्न नाही पण निलम ताई आपल्याला सांगते असा ठराव केलेला आहे. आपल्या मागच्या महासभेमध्ये मतिमंद मुलांची शाळा ह्या विषयावर आपला ठराव झालेला आहे. आपल्या सगळ्यांना आठवत असेल. बोलतात हा मुद्दा बरोबर आहे. त्या मुलांचा येण्याजाण्याचा पालकांना खर्च करावा लागतो. त्यांच्या शिक्षणासाठी फी द्यावी लागते. मा. आयुक्त साहेब आपण जेव्हा नवघरच्या मैदानावर आलो होतो त्यावेळेला तो विषय होता. नवघर शाळेचे दोन वर्ग आपल्याला ते बघायचे आहेत आणि सेंट्रलाईज म्हणून तिथे ती शाळा उघड करणार आहोत. त्याच्यामुळे तो ही विषय झालेला आहे. सभागृहात झालेला आहे आणि आयुक्तांच्या समोर सुध्दा तो विषय झालेला आहे. फक्त एवढीच विनंती करीन महापौरांना पत्र दिले उपमहापौरांना पत्र दिले, सभागृह नेत्यांना पत्र दिले की याची कारवाई लवकर व्हायला पाहिजे. आता जवळ जवळ जुन महिना संपलेला आहे. जुलै सुध्दा संपत आलेला आहे. शाळा कुठेतरी सुरु व्हायला पाहिजे. तुम्ही म्हणता तशा ह्या भागामध्ये शाळा आहेत. अवाढव्य फीमध्ये शाळा चालतात कारण त्यांना तोच खर्च सगळा वैयक्तिक करायचा असतो. हा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा ही आपणांस विनंती.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. याचा अर्थ प्रशासनाची भुमिका त्यांनी मांडली. प्रशासनाच्या गोषवाऱ्यामध्ये स्वच्छता व सुरक्षितता हा विषय मांडला गेलेला आहे. काय मनस्थिती होती आणि का केला हा खरतर अजुन हा स्पष्ट गोषवारा थातुरमातुर गोषवारा हा माझा स्पष्ट आरोप आहे. साहेब महापालिकेमध्ये शिक्षक जे आहेत ते बी.एड आहेत. ६० ते ७० हजार रुपये पगार आहे. खाजगी शाळांमध्ये मला वाटत पूर्ण मिरा भाईंदरमध्ये पिंजुन काढल. तुम्ही तर २० हजार पेक्षा जास्त कुणाला कुठल्या शिक्षकाला पगार नसेल. त्याला कारण असं आहे.

**मा. उपमहापौर :-**

पी.एच.डी शिक्षिका पण आपल्याकडे महापालिका शाळेत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

असतील साहेब असतील आणि आपला गौरव आहे. साहेब तुमच्या दिलेल्या निवेदनावर मी येणार आहे. याचा अर्थ साहेब पालिकेचा शिक्षक म्हणजे मिरा भाईंदरमध्ये जे अध्यापक आहेत. शाळेचे त्यांना सुध्दा इतका पगार नसेल तितका पगार आपण देतो आणि बी.एड नाहीत साहेब खाजगी शाळेमध्ये १२ वी पास टिचर मुलांना शिकवितात. ते आपल्याला काय शिकवतील साहेब आपण सक्षम आहोत. प्रशासन चालवतो म्हणजे आपल्यापेक्षा अनुभव कुणाचा असु शकतो याचा अर्थ आम्ही कुठेतरी कमी पडतो प्रशासन कमी पडते. आणि तो अती कमी पडतो म्हणून आपण ते उचलायचं आणि आपलं बोझ दुसऱ्याच्या खांद्यावर टाकायचं तो मी नव्हे. तुम्ही आम्हाला सुधरवा ही भुमिका पालिकेची बी.एड केलेला टिचरला १२ वी ची टिचर काय शिकवेल? तो अध्यापक आहे तो १२ पास असेल.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब हा जो विषय आहे हा वास्तवतः ह्या सभागृहातल्या प्रत्येक सदस्याने याच्यामध्ये होकारार्थी भुमिका घेतली पाहिजे. कारण या आपल्या शाळेत शिकतात कोण जो समाजातला शेवटचा घटक आहे तो शिकतो. त्या शाळेमध्ये आपण वह्या, पुस्तक, दफ्तरे, कपडे, बुंट, सॉक्स हे सगळ आपण त्याला देत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब प्रशासकीय कामकाजाला खाजगीकरणाचा रुट द्यायचा आहे का?

**मा. उपमहापौर :-**

नाही.

**जुबेर इनामदार :-**

नाही द्यायचा आहे ना मग साहेब प्रशासनाने हा गोषवारा दिल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी ताकदीने बोलल पाहिजे होतं. आपला स्तर वाढवा. शिक्षकांना सांगा त्यांचे क्लासेस घ्या. कुठे कमी पडतात ते बघा.

**मा. उपमहापौर :-**

ह्या सगळ्या गोष्टी सुरु आहेत. महापौरांच्या नेतृत्वाखाली सातारा, सांगली व पश्चिमकडचे लोक आम्ही घेऊन सभागृहामध्ये यांची सेमिनारं घेतल्या आम्ही शिक्षकांचे सेमिनार घेतले. आपल्या शाळांचा दर्जा वाढलाच पाहिजे. आणि तिच एकमेव भुमिका आहे. करता येणेसारखी ज्या-ज्या गोष्टी आहेत परंतु आज तुम्ही कालच्या तुलनेत आज जर आपल्या शाळांची तुम्ही जर व्हिजीट केली माझ्या प्रभागात दोन शाळा आहेत. त्या दोन शाळांचे पालकत्व घेतल्या सारखे मीच त्या शाळेत जात असतो. मी सातत्याने त्या विद्यार्थ्यांच्या संपर्कात आहे. शिक्षकांच्या संपर्कात आहे, आपल्या शाळांमध्ये आता पालक सभा होतात. आपल्या शाळांमध्ये गॅदरींग होतात. आपल्या शाळांमध्ये आता साहित्य मेळावे होतात. आपल्या शाळा स्पर्धापरिक्षेमध्ये भाग घेतात. ती गौरवाची गोष्ट आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही स्वतःचाच बोलत आहेत तुमचेच निवेदन मी तुम्हाला परत तेच बोलतो म्हणजे आम्ही कुठे कमी नाही.

**मा. उपमहापौर :-**

अजुन दर्जा वाढला पाहिजे कारण काय माहिती आहे का जो विद्यार्थी शाळेत येतो त्या ठरावाला तुमचा विरोध नाही हे मला नक्कीच कळते.

**जुबेर इनामदार :-**

त्यांचा गोषवारा स्पष्ट नाही. तो ठराव त्यांनी वाचलेला आहे. प्रशासनाने गोषवारा दिला तो थातुरमातुर गोषवारा आहे. सुरक्षितता आणि स्वच्छता व स्वच्छतासाठी आपली पालिका कमी आहे का व आरोग्य आपले प्रथम कर्तव्य आहे आणि मुलांची सुरक्षा आपण करु शकत नाही एवढे लाचार?

मा. महापौर महोदय सन्मा. सदस्य बार बार प्रशासनाबद्दल मत मांडत होते. आपल्या अनुमतीने त्यांना खुलासा देऊ इच्छितो तत्कालीन आयुक्त महोदयांनी हा गोषवारा दिलेला आहे. प्रशासन त्याच्याशी सहमत आहे. या शहरामध्ये जे काही एन.जी.ओ. आहेत. सामाजिक संस्था आहेत. महापालिकेची कुठलीही आर्थिक लायबलीटी न करता मदत करायला जर पुढे येत असतील तर त्याची मदत घ्यायला हरकत नाही त्यामध्ये पॉझिटीव्ह आपण चर्चा करा त्याची कार्यप्रणाली निश्चित केली जाईल. ठरावाच्या आधारे त्याची कार्यप्रणाली निश्चित केली जाईल. त्या पदाधिकारी महापालिकेचे गटनेते याच्यामध्ये धोरण निश्चित करुन आपण याची अंमलबजावणी करु.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आमची एक शंका आहे. उपमहापौर साहेब देखभाल म्हणजे काय? एन.जी.ओ. म्हणजे खाजगी संस्थेला तुम्ही शाळा देणार. देखभालीसाठी ॲक्च्युअली त्याच्यामध्ये काम त्यांना काय आहेत. देखभाली म्हणजे काय? आमच्या सभागृहात ते अजुन काही कळत नाही. आम्हाला ती शंका उपस्थित होते की देखभाल कशाची करणार आहेत? त्या शाळा चालवणार आहेत किंवा काय का याचा खुलासा ह्या गोषवाऱ्यामध्ये कसल्याही प्रकारचा नाही. मग आम्ही काय समजायचं संस्था कशासाठी.........

**मा. उपमहापौर :-**

गोषवारा नीट वाचा. गोषवाऱ्यामध्ये काय दिलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम शिक्षणअधिकारी आहेत मग त्यांचा अधिकार पुढे काय राहणार आहे. त्या शाळेतल्या शिक्षकांचा अधिकार काय राहील. आपण सहज त्यांच्यावरती अविश्वास दाखवत आहोत. महापालिका हा एक ठाम मुद्दा आहे. महापौर मॅडम हे कुठेतरी उद्याला ही संस्था ह्या शाळा देखभालीसाठी घेतील ते त्यांचे उपयोग करणार नाहीत याची खात्री काय?

**मा. उपमहापौर :-**

*शेवटचा पॅरेग्राफ परत वाचा.*

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम ही शंका जी आहे त्याचे निरसन करा.

**रुबिना शेख :-**

मॅडम पिछले ५ सालो से मेरा एक एन.जी.ओ. है। जिसके माध्यम से हम डिफ्रन्ट स्कुल में जाते है। आपको पता है सर और सारे पालिका में स्कुल में भी में जाती हूँ। वहाँ पे हमारे एन.जी.ओ. के तरफ से टिचींग भी करते है। मैं एक पॉईंट आप लोगो के सामने यह रखना चाहती हूँ की इस पॉईंट पे इतनी सारी बाते हो रही है और इतनी सारी अच्छी बाते हम सजेस्ट कर रहे है। सर एक बहुत इम्पॉटन्ट मुद्दा यह है की, अपनी इन पालिका के स्कुल में टिचर्स की जो कमी है वह बहुत ही अफसोस की बात है की हमारी इतनी अच्छी स्कुल है इनका स्ट्रक्चर भी कुछ अच्छा होना चाहिए और वहाँ पे पढनेवाले बच्चे भी बहुत ब्राईट है। सिर्फ एक दुःख की आत है यह मॅडम की वहाँ पे टिचर्स बहुत कमी है। २-२, ३-३ क्लासेस एकही क्लास में बैठती है। ६-७, ५-६ एकही क्लास में बैठती है और एकही टिचर उनको पढाता है। हर क्लास के सबजेक्ट अलग होते है। हर क्लास को इम्पॉटन्ट देने की जरुरत है। सारे सबजेक्ट को इम्पॉटन्ट देने की जरुरत है। लेकिन सातवी कक्षा का बच्चा, छटवी कक्षा का बच्चा, चौथी कक्षा का बच्चा एक ही क्लास में बैठके पढता है मॅम और यह बहुत ही ज्यादा अफसोसवाली बात है। सबसे पहले मेरा खयाल है हम लोगों को इस बात पे ध्यान देना चाहिए की हमारी पालिकाओ की स्कुल में जितने भी टिचर की कमी है पहले हम उसको पुरा करे इसके अलावा एन.जी.ओ. को देने की बात चल रही है। वहाँ के टिचर एन.जी.ओ. के टिचर को बुलाते है की हमारे पास टाईम नही है। आप लोग हमारा सिलॅबस पुरा किजीए तो प्लीज इस पॉईंट पे ध्यान दिजीए।

**मा. महापौर :-**

आप बैठ जाईए ठिक है। आपका ठराव मांडीए सब लोग बैठ जाइए। अब बहुत चर्चा हो गई इस विषय पे।

... संस्थाओ में पढा रहे है और उनके स्कुल का रिझल्ट १०० टक्का आ रहा है। इसका मतलब उन पर किसीका नियंत्रण है, कंट्रोल है और हमारे स्कुलो में जो भी बी.एड, डी.एड और पी.एच.डी. टिचर है अभी अभी आपने बताया तो ऐसी टिचर क्या पढाने में सक्षम नही है। हमारी टिचर बहुत ज्यादा सक्षम है और उन्हें जो सुविधा प्रोव्हाईड की जानी चाहिए स्कुलो में वह हमारी प्रशासन की तरफ से उन्हें अव्हेलेबल होनी चाहिए। हमारे पास इतना बडा एज्युकेशन डिपार्टमेंन्ट है इतने खर्च हो रहे है उनको सॅलरी दि जा रही है। हमारे पास २२ स्कुलो में २२ बिल्डींगो में ३६ स्कुल चल रहे है। २२ बिल्डींग में ३६ स्कुल मतलब २२ जगह व्हिजीट करना है और महिने में २२ वर्किंग डेज मेरे खयाल से होते ही है। तो अपने पास जो शिक्षण अधिकारी है जो स्टाफ है अगर महिने में एक बार बाहर स्कुल का व्हिजीट करे इन्स्पेक्शन करे तो हमारे शिक्षण का लेव्हल बहूत ही उचा उड सकता है। इसके लिए किसी संस्था की देखरेख की जरुरत नही है और दुसरी चिज संस्था एन.जी.ओ. ऐसी शैक्षणिक संस्था लिखा हुआ नही है की कोई भी स्कुल आपसे डिमांड किया है या उन्होंने आपसे ऐसा रिक्वेस्ट किया है की आपकी स्कुलो का दर्जा बढाना चाहते है। मैं ऐसा सजेशन देना चाहती हूँ की स्कुल में व्हिजीट करने से संस्थाओ के या टेक ओव्हर करने से स्कुल से शैक्षणिक दर्जा नही बढेगा बल्की हमारे टिचरो का प्रशिक्षण उनके माध्यम से जहाँ उनके टिचरो को प्रशिक्षण दिया जाता है वह प्रशिक्षण में हमारे टिचरो को भी भेजा जाए। महिने में एक बार, दो बार जैसे की वह लोग अपनी शिक्षण की श्रेणी को बढा सके। यह मेरी सुचना है ठराव पर।

**मा. महापौर :-**

प्रशिक्षण लिया हुआ है।

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम आपकी परमिशनसे रुबिना मॅडमने अभी जो बताया की टिचर्स कमी है यह तो सही बात है। वन टू फोर के लिए एकही टिचर होती है जो सारे स्टॅन्डर्ड चारो के लिए...............

**मा. महापौर :-**

एक ही बात बार बार.................

**मर्लिन डिसा :-**

सेकंडरी जो आप बोल रहे मोटीवेशनल टास्क और यह जो बच्चो को पढाना होता है पोर्शन कम्पलीट करना होता है। मेरा यह सुझाव है की हमारे पास डिग्री कॉलेजेस भी है एम.डी.अे कॉलेजेस भी है, दालमिया कॉलेज तो में वह दालमिया कॉलेज के एम.बी.ए. स्टूडन्ट के साथ में काफी बी.एम.सी. स्कूल में जाके मैंने प्रोग्राम किए है और मेंने बाबर सर को भी ऑफर भी किया है। मेरा सर्व्हिसेस की मैं आपको मोटिव्हेशनल टास्क दुंगी टिचर को और जो भी हेल्प चाहिए एज्युकेशन डिपार्टमेंट में दुंगी। तो यह ऑटोनाम जो कॉलेजेस है। बॉम्बे में उनको जो स्टॅडन्ट उनके डिग्री कॉलेजेस के स्टूडन्ट जो क्रेडीट के लिए ऑनर्स पाने के लिए जो क्रेडीट्स उनको सोशली यूज फूल प्रोडक्ट केसीफीडब्ल्यू बोलते है तो वो माध्यम से वे देम कम्स व्हिजीट बी.एम.सी. स्कूल. उनको उधर पढा सकते है उनकी हेल्प ले सकते है।

**मा. महापौर :-**

ठिक है अभी सब बैठ जाइए। बहुत चर्चा हो चुकी है आप ठराव पढिए।

**स्नेहा पांडे :-**

मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत सध्या इ. १ ली ते ८ वी पर्यंत एकूण ३६ शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये मराठी माध्यम-२१ शाळा, उर्दू माध्यम-०५ शाळा, हिंदी माध्यम-०५ शाळा व गुजराती माध्यम -०५ शाळा अशा एकूण ३६ शाळा कार्यरत आहेत. त्यामध्ये मराठी माध्यमाचे विद्यार्थी-४५११, उर्दू माध्यमाचे विद्यार्थी-१२२२, हिंदी माध्यमाचे विद्यार्थी-२५९५ व गुजराती माध्यमाचे-३४१ विद्यार्थी असे एकूण ८६६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शासनाकडून २०२ पायाभुत शिक्षक पदे मंजुर असून सध्या १८० शिक्षक कार्यरत आहेत. या महानगरपालिकेच्या ३६ शाळा २२ इमारतींमध्ये भरतात.

महानगरपालिका शाळा खाजगी संस्थाकडून देखरेख व शैक्षणिक दर्जा उंचावणेकरीता देणेबाबत खाजगी संस्थेला देण्याऐवजी आपण आपल्या महानगरपालिकेच्या शाळांची गुणवत्ता वाढावी याकरीता प्रयत्न करावे. शिक्षण आणि शिक्षोत्तर कर्मचाऱ्यांची गुणवत्ता, प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे वाढविण्यात यावे. जर आपण खाजगी संस्थांना देखरेखीची आणि भौतिक सुविधा निर्माण करणेकरीता दिले तर या शाळांच्या जागेचा गैरवापर, प्रचार आणि अन्य कार्यक्रमांच्या माध्यमांना होऊ शकतो. स्वच्छता आणि सुरक्षिततेसाठी सुध्दा आपले मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जबाबदार कर्मचारी कार्यरत असले पाहिजे. कारण शाळेत लहान मुले आणि विशेषत: मुली शिकायला येतात. त्यांची सुरक्षा व कुठल्या प्रकारचे गैरकृत्य घडू नये ही महत्वाची बाब लक्षात घेवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा खाजगी संस्थांना न देऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वत: चालवावे, असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्रीम. वर्षा भानुशाली. दुसरा ठराव सुचक श्रीम. स्नेहा पांडे, अनुमोदन श्री. अनिल सावंत. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. श्रीम. स्नेहा पांडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५१, विरोधात २८, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २३ :-**

**महानगरपालिकेच्या शाळा खाजगी संस्थांकडून देखरेख व शैक्षणिक दर्जा उंचावणेकरीता देणेबाबत.**

**ठराव क्र. २४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सध्या इ. १ ली ते ८ वी पर्यंत एकूण ३६ शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये मराठी माध्यम-२१ शाळा, उर्दू माध्यम-०५ शाळा, हिंदी माध्यम-०५ शाळा व गुजराती माध्यम -०५ शाळा अशा एकूण ३६ शाळा कार्यरत आहेत. त्यामध्ये मराठी माध्यमाचे विद्यार्थी-४५११, उर्दू माध्यमाचे विद्यार्थी-१२२२, हिंदी माध्यमाचे विद्यार्थी-२५९५ व गुजराती माध्यमाचे-३४१ विद्यार्थी असे एकूण ८६६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शासनाकडून २०२ पायाभुत शिक्षक पदे मंजुर असून सध्या १८० शिक्षक कार्यरत आहेत. या महानगरपालिकेच्या ३६ शाळा २२ इमारतींमध्ये भरतात.

महाराष्ट्र शासनाकडून "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" हा मोठा उपक्रम सुरु आहे. महानगरपालिका शिक्षण विभागात सध्या शिक्षणाधिकारी एकच अधिकारी आहेत. याशिवाय कोणतीही पर्यवेक्षण यंत्रणा कार्यरत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांचा शैक्षण्कि गुणवत्ता व दर्जा उंचाविण्यासाठी व उपक्रम राबविण्यासाठी मुंबई व मिरा भाईंदर पहरसरातील स्वयंसेवी खाजगी संस्थांची (NGO) खाजगी शाळा महानगरपालिकेच्या शाळांना देखरेखीकरीता (स्वच्छता व सुरक्षितता) नेमणूक करावी. परंतु या सेवेबाबत महानगरपालिकेकडून कोणताही मोबदला दिला जाणार नाही. संबंधीत संस्थेने नि:स्वार्थ भावनेने काम करणे, महानगरपालिकेच्या शाळांमधील प्रशासनात हस्तक्षेप करणार नाही. तसेच मुयाध्यापक/शिक्षकांच्या प्रशासकीय कामात कोणताही हस्तक्षेप करु नये ही सुध्दा काळजी घेणे.

प्रशासनाने जाहिरात देवून व संस्थांना पत्र देवून आमंत्रीत करावे व महापौर, आयुकत व पदाधिकारी यांचेशी बैठक घेवून इच्छुक संस्थेला नेमुन द्याव्यात. त्याच संस्थेने महापालिका शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देणे, मुलांचे

कौन्सीलिंग करणे. मुलांचा बौध्दीक व शारिरीक विकास करणे तसेच संस्थांना/शाळेला आर्थिक वा वस्तु रुपाने शालेय उपयोगी सामान द्यावयाचे असल्यास ते स्विकारावे. याव्यतिरीक्त आणखी कोणत्या सुधारणा कराव्यात जेणेकरुन महापालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल व त्याबाबतची माहिती महापालिका आयुक्तांना द्यावयाची आहे. या सर्व बाबींवर विचार विनीमय करणेकामी दर दोन महिन्यांनी आयुक्त यांनी पदाधिकारींसमवेत सदर संस्थांचे व शाळांचे बैठकीचे आयोजन करावयांचे आहे. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचा गौरव सत्कार करण्यात यावा. तसेच महापालिका शाळा, खाजगी संस्था/ शाळा यांना देखरेख व शैक्षणिक दर्जा उंचावणेकरीता हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | निरंक |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | रॉड्रीक्स मोरस जोसेफ | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरधर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | यादव मिरादेवी रामलाल | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | शाह रिटा सुभाष | ११ | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| १२ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | गोहिल शानू जोरावर सिंह | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | भोईर सुनिता शशिकांत | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | सोंस नीला बर्नाड | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | रावल मेघना दिपक | १८ | पाटील धनेश परशुराम | |
| १९ | मोकाशी दिपाली आनंदराव | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | जैन सुनिता रमेश | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | नाईक विविता विवेक | २१ | सपार उमा विश्वनाथ | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | परदेशी गिता हरीश | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | सय्यद नुरजाहॉं नाझर हुसेन | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | पाटील वंदना विकास | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | अहमद साराह अकरम | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४५ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४६ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४८ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४९ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५० | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५१ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, **वर्ग-०१ नगरसचिव या पदावर पदोन्नती देणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागु आहेत. तसेच महानगरपालिकेचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नगरसचिव (श्रेणी-०१) चे ०१ पद रिक्त आहे. आस्थापनेवरील सदर रिक्त पदावर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.२६/०४/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ अंतर्गत पदांचा आढावा घेण्यात आला. तसेच शासनाकडून रोस्टर मंजूर केल्यानुसार व सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ नुसार भरतीचे प्रमाण विचारात घेऊन पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या नगरसचिव (वर्ग-०१) या पदाची माहिती खालीलप्रमाणे.

<u>गट-अ अंतर्गत पदावर पदोन्नती</u>

वर्ग-०१ संवर्गातील खालील पदे पदोन्नतीसाठी रिक्त आहेत.

वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००

| अ.क्र. | पदनाव | रिक्त पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | नगरसचिव | ०१ | खुला-०१ |

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ नुसार पदोन्नती देण्यासाठी विहीत केलेली नेमणूकीची पद्धत व टक्केवारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाव | मंजूर पदे | नेमणूकीची पद्धत व टक्केवारी (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण-२०१४)<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती | शासनाकडील रोस्टर मंजूरीनुसार नेमणूकीची पद्धत व टक्केवारी |
|---|---|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | नगरसचिव | नामनिर्देशन –<br>(अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>(ब) विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य. |
| | | पदोन्नती –<br>नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील उपसचिव/सहाय्यक आयुक्त व तत्सम वर्ग-०२ च्या पदाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव. |

वरीलप्रमाणे अर्हता लक्षात घेता, महापालिका आस्थापनेवरील उपसचिव/सहाय्यक आयुक्त व तत्सम वर्ग-०२ अधिकाऱ्यांमधुन पात्र ठरणाऱ्या अधिकाऱ्यास जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०१ या संवर्गातील नगरसचिव पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील अधिकाऱ्याची पदोन्नतीकरीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाव | संवर्ग | धारण केलेली शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. वासुदेव शिरवळकर | उप-नगरसचिव | खुला | बी.ए., एल.एल.बी.<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>एम.एस.सी.आय.टी. |

नगरसचिव हे पद श्रेणी-०१ चे असुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

**ठराव :-**

प्रस्तावित गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे सदर पदावर पदोन्नती निवड समितीने निवड केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) अन्वये नगरसचिव पद वर्ग १ या पदावर श्री. वासुदेव शिरवळकर यांना दिलेल्या पदोन्नतीस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम मैं आपकी परमिशन से बोल रही हूँ यहाँ पर गोषवारा में ऐसा दिया हुआ है की नाम निर्देशन और पदोन्नती दोनो तरफ से यह पद भरा जा सकता है। तो पहिले यह क्लिअर होना है की यह नामनिर्देशन से कर रहे या पदोन्नती से। इसका क्लिअर गोषवारा नही है और दुसरी बात यह है की पदोन्नती हमेशा सेवाजेष्ठता लिस्ट से ही होनी चाहिए जो की शासन का जी.आर है की हर जनवरी में ज्येष्ठता लिस्ट निकालनी चाहिए लेकिन अपनी महानगरपालिका में २०१५ के बाद जेष्ठता यादी निकाली नही गयी है। मेरी जानकारी नुसार २०१५ की लिस्ट के अनुसार पदोन्नती हो रही है विधी मॅडम को बुलाया जाए। उस बारे में मुझे भी जानकारी लेनी है। क्योंकी मेरे पास शासन का जी.आर है ऐसा की हर जनवरी के महिने जब तक सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द नही होती है किसी भी पदोन्नती को परमिशन नही दिया जा सकता।

**मा. महापौर :-**

म्हसाळ साहेब खुलासा करतील.

पदोन्नती दिलेली आहे.

**स्नेहा पांडे :-**

तीन साल से जेष्ठता लिस्ट क्यों नही निकाली गई। पहला तो यही सवाल है। अपने पास इतना बडा विधी डिपार्टमेंन्ट है उतना खर्च हो रहा है तो जेष्ठता की लिस्ट क्यों नही बनाई गई।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांची सुचना विचारात घेता सर्व आस्थापनाच्या संवर्गाच्या जेष्ठता सुची आपण करंट वर्षामध्ये अंतिम कराव्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम प्रशासनाने खरतर गोषवारा स्पष्ट दिला पाहिजे होता. आता सेवाजेष्ठता बोलले म्हसाळ साहेब सेवा जेष्ठतामध्ये अनुक्रम कसा आहे म्हसाळ साहेब.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

१ जानेवारी २०१५ ची अंतिम सेवाजेष्ठता यादी आहे. त्याच्यामध्ये १. स्वप्नील सावंत. २. चिंतामण शिंदे ३. हेमंत पाटील. ४. दिलीप जगदाळे ५. वासुदेव शिरवळकर ६. बाबुराव वाघ ७. मंजिरी डिमेलो ८. दादासाहेब खेत्रे ९. जनार्दन भासे १०. गोविंद परब ११. वसंत राणे १२. संजय दोंदे १३. सुदाम गोडसे म्हणजेच पहिले जे चार होते..........

**अनिल सावंत :-**

पहिजे जे चार होते शिरवळकर साहेब पाच नंबरला होते. म्हणजेच चार गेले. आयुक्त साहेब मुद्दा असा आहे की गोषवाऱ्यामध्ये जर क्लिअरकट आले असते ना उद्या कसे होईल की आपण ठराव करु त्याला पदोन्नती देऊ. उद्या कोणीतरी कोर्टात गेल्यानंतर त्याला स्टे येईल. या गोष्टी घडायला नको म्हणून गोषवारा तो पूर्ण पाहिजे.

**स्नेहा पांडे :-**

म्हसाळ साहेब मेरे पास जो लिस्ट है उसमें आठ ही नाम है। ४ ऑगस्ट २०१५ को यह लिस्ट प्रकाशित हुई है उसमें आठ ही नाम है। आपने ११ नाम बताए।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य ने पुछा था की जेष्ठता सूची के नाम पढो तो उन्होंने अभी जो सचिव है पदभार में उनके निचे के भी नाम पढे जरुरत नही।

**स्नेहा पांडे :-**

२०१५ की जो लिस्ट है उसमें आठ नाम है श्री वसंत राणे, गोविंद परब, सुदाम गोडसे, संजय दोंदे, जनार्दन भासे, दादासाहेब खेत्रे, अविनाश जाधव, सुनिल यादव.

**मा. आयुक्त :-**

आपके माध्यम से में जानकारी देता हूँ उपायुक्त मुख्यालयने खुलासा करावा. निवड समितीची पदोन्नतीची ज्यावेळी बैठक झाली ह्यावर जे लोक होते त्यांनी आक्षेप घेतला का?

**स्नेहा पांडे :-**

माझ्या माहितीप्रमाणे घेतलेला आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

डी.पी.सी.सी. ची बैठक झाली होती. २३ तारखेला त्यावरती ह्या वरच्यांना आक्षेत नव्हता. पदोन्नती दिल्याच्यानंतर जेव्हा आम्ही आदेश काढला त्याच्यानंतर आमच्याकडे आक्षेप आलेला आहे. परंतु जी जेष्ठता यादी आहे ती जेष्ठता यादी अद्याप प्रसिध्द व्हायची आहे.

**स्नेहा पांडे :-**

म्हसाळ साहेब मेरे पास रेकॉर्ड है पुरा उन्होंने ऑब्जेक्शन लिया हुआ है। बाद में आपने विधी डिपार्टमेन्टने हायकोर्ट के वकिल से अभिप्राय मांगा हुआ है। विधी मॅडम का भी रिपोर्ट है इसमें की २८ जनवरी २००६ तक जो ग्रॅज्युएट नही है उनका प्रमोशन नही हो सकता है। यह मेरे पास पुरा रेकॉर्ड की कॉपी पडी हुई है। विधी मॅडम को बुलाइए। है की नही है आज, उनका ही लिखा हुआ लेटर है। विधी मॅडमने अभिप्राय लिया हुआ है हायकोर्ट के वकील से।

**मा. उपायुक्त (मु.) :-**

अंतिम यादीवरती केलेले होतं.

**स्नेहा पांडे :-**

अंतिम यादीवरती शिरवळकर साहेबांचे नाव नाही. मग यांच कस नाव आलं. जी यादी आहे ४ ऑगस्ट २०१५ ची त्याच्यामध्ये ह्यांचे नाव नाही आणि वेगळी एक लिस्ट आहे. त्याच्यामध्ये अनग्रॅज्युएट जे लोक आहेत. त्यांची सिनियारीटी पण आहे. ह्यांच नाव अनग्रॅज्युएटच्या लिस्ट वर्ग सेकंडमध्ये आहे. ते क्लिअर करा आणि विधी मॅडमला बोलवा. त्यांचाच अभिप्राय आहे. स्पेसिफाय रिक्वीपमेंट रुल्स २००५ वे देन इस्टीक्युलेट पिरेड फॉलींग विच द प्रमोशन वुड ऑटोमॅटीकली स्टॅन्ड कॅन्सल हा विधी मॅडमचा अभिप्राय आहे माझ्याकडे.

**मा. उपमहापौर :-**

स्नेहा मॅडम ह्या विषयात ठराव झालेला आहे. आपला सेवाप्रवेश नियम काय सांगतात. त्या नियमानुकुल जी शैक्षणिक अर्हता पाहिजे ती अर्हता वासुदेव शिरवळकर ह्यांच्याकडे आहे. हरिभाऊ रिटायर्ड झाले ते होते तोपर्यंत उपसचिव म्हणून वासुदेव शिरवळकर यांनीच कामकाज पाहिले. आजपर्यंतच्या सभागृहाचे कामकाज ते पाहतात आणि प्रत्येकांनी आपलं मत काय मागितल असेल तो विषय वेगळा आहे. ह्या सभागृहामध्ये वासुदेव शिरवळकर यांनी सचिव म्हणून कामकाज पाहण्याचा ठराव दिलेला आहे. तुम्हाला त्या विषयात आक्षेप असेल, विरोध असेल तर तुमचा ठराव मांडा. आणि जेव्हा मा. आयुक्त सभागृहात निवेदन करतात तेव्हा विधी मॅडम असा खुलासा सारखा आपल्याला करायची गरज नाही.

**स्नेहा पांडे :-**

ज्यांना रुल रेग्युलेशन माहित आहेत तेच करु शकतात ना.

**मा. उपमहापौर :-**

पण खुलासा केलेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

मला शिरवळकर साहेबांच्या नावाचा विरोध नाही मला फक्त रुल रेग्युलेशनमध्ये बसते का.

**मा. आयुक्त :-**

आपला काय आक्षेप हेच आम्हाला क्लिअर होत नाही. सर्वांत पहिला मुद्दा माझा असा आहे की आप स्पष्ट बोलिए की आपका क्या आक्षेप है।

**स्नेहा पांडे :-**

मुझे किसी भी बात का आक्षेप नही है। शिरवळकर साहब की पदोन्नती पर मुझे कोई आक्षेप नही है। मेरे पास जो रुल्स रेग्युलेशन पेपर से नॉलेज में जो था की इसके पहिले आठ लोग सिनियारीटी लिस्ट और भी है। मैं किसी स्पेसिफाय के लिए शिफारस करने लिए खडी नही हूँ। इसके पहिले आठ लोग सिनियारीटी लिस्ट में नाम था। मेरे पास जो निर्णय है की २८ फरवरी २००६ तक जो ग्रॅज्युएट थे ऑलरेडी वर्किंग यहाँ पे उनका ही प्रमोशन हो सकता था तो २८ फरवरी २००६ तक शिरवळकर साहब अनग्रॅज्युएट की लिस्ट में थे। कोई भी निर्णय लिया जाए तो रुल्स रेग्युलेशन के हिसाब से लिए जाए। कल को कोई उठ के कोर्ट जाए, फिर यह पदोन्नती रद्द हो फिर सारे सभासद हम लोग सर्वानुमते मंजुर करते है पदोन्नती हमारे उपर भी कल को यह नही आए की रुल्स के खिलाफ आप लोग भी कैसे गए।

इसलिए इसपर पुरा कोर्ट का निर्णय आने दिजीए विधी विभाग का सल्ला लिजीए। फिर यह विषय अगले महासभा में सविस्तर लाईए। मेरा इतना ही कहना है।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्यांचा आक्षेप माझ्या लक्षात आलेला आहे. त्यांच्या ह्या पदोन्नतीला आक्षेप नाही किंवा कुणा व्यक्तीची शिफारस नाही. त्यांच असे म्हणणे आहे की जी यादी पब्लीश झालेली आहे त्याच्या आधारे हे निर्णय होतात. हा नियमाने झाला पाहिजे. कोणावर अन्याय झाला नाही पाहिजे. दुसरी बाब हे सभागृह मंजुरी देताना आम्ही सदस्य कोणी अडचणीत आले नाही पाहिजे. याची पूर्ण दखल प्रशासन म्हणून मा. आयुक्त ग्वाही देईल. सगळे नियमात असेल तरच याचा अंतिम निर्णय होईल.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. २४ :-**

**वर्ग-०१ नगरसचिव या पदावर पदोन्नती देणेबाबत.**

**ठराव क्र. २५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागु आहेत. तसेच महानगरपालिकेचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नगरसचिव (श्रेणी-०१) चे ०१ पद रिक्त आहे. आस्थापनेवरील सदर रिक्त पदावर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.२६/०४/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ अंतर्गत पदांचा आढावा घेण्यात आला. तसेच शासनाकडून रोस्टर मंजूर केल्यानुसार व सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ नुसार भरतीचे प्रमाण विचारात घेऊन पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या नगरसचिव (वर्ग-०१) या पदाची माहिती खालीलप्रमाणे.

<u>गट-अ अंतर्गत पदावर पदोन्नती</u>

वर्ग-०१ संवर्गातील खालील पदे पदोन्नतीसाठी रिक्त आहेत.

वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००

| अ.क्र. | पदनाव | रिक्त पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | नगरसचिव | ०१ | खुला-०१ |

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ नुसार पदोन्नती देण्यासाठी विहीत केलेली नेमणूकीची पद्धत व टक्केवारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाव | मंजूर पदे | नेमणूकीची पद्धत व टक्केवारी (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण-२०१४)<br>४. नामनिर्देशन<br>५. पदोन्नती<br>६. प्रतिनियुक्ती | शासनाकडील रोस्टर मंजूरीनुसार नेमणूकीची पद्धत व टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | नगरसचिव | ०१ | नामनिर्देशन/ पदोन्नती | एकाकी पदास शासन निर्णय दि. २१/०९/१९९८ नुसार आरक्षण नाही. |

वर्ग-०१ संवर्गातील खालील पदे पदोन्नतीसाठी रिक्त आहेत.

| अ.क्र. | पदनाव | मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पद्धती |
|---|---|---|
| १. | नगरसचिव | <u>नामनिर्देशन</u> –<br>(आ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>(ब) विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य.<br><u>पदोन्नती</u> –<br>नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका |

| | | |
|---|---|---|
| | | आस्थापनेवरील उपसचिव/सहाय्यक आयुक्त व तत्सम वर्ग-०२ च्या पदाचा किमान ०५ वर्षांचा अनुभव. |

वरीलप्रमाणे अर्हता लक्षात घेता, महापालिका आस्थापनेवरील उपसचिव/सहाय्यक आयुक्त व तत्सम वर्ग-०२ अधिकाऱ्यांमधुन पात्र ठरणाऱ्या अधिकाऱ्यास जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०१ या संवर्गातील नगरसचिव पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील अधिकाऱ्याची पदोन्नतीकरीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाव | संवर्ग | धारण केलेली शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| २. | श्री. वासुदेव शिरवळकर | उप-नगरसचिव | खुला | बी.ए., एल.एल.बी. एल.एस.जी.डी. एल.जी.एस. एम.एस.सी.आय.टी. |

नगरसचिव हे पद श्रेणी-०१ चे असुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

**ठराव** :-

प्रस्तावित गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे सदर पदावर पदोन्नती निवड समितीने निवड केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) अन्वये नगरसचिव पद वर्ग-१ या पदावर श्री. वासुदेव शिरवळकर यांना दिलेल्या पदोन्नतीस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, **सबर्बन रेल्वे कंसल्टटीव्ह कमिटी** (Suburban Railway User's Consultative) **वर मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्रतिनीधी पाठविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**संजय थेराडे :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून सर्बबन रेल्वे युजर्स कन्सल्टेटीव्ही कमिटी वर मा. महासभा दि.29/09/2016 ठराव क्र.78 अन्वये श्री. भरत नाथमलजी कोठारी यांची नियुक्ती केलेली आहे. सेक्रेटरी, सर्बबन रेल्वे युजर्स कन्सल्टेटीव कमिटी यांनी दि.14/06/2018 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वे संबधी प्रश्न मांडणे व दैनदिन कामकाजात सहभागी होण्यासाठी सदर कमिटीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून पुढील दि.31/12/2019 पर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिनिधी नेमण्यासाठी नांव कळविणेस विनंती केलेली आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून सदर कमिटीवर श्री. भरत नाथमलजी कोठारी यांचे नांव निश्चित करून रेल्वे प्रशासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

विजय राय :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. २५ :-

**सबर्बन रेल्वे कंसल्टटीव्ह कमिटी** (Suburban Railway User's Consultative) **वर मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्रतिनीधी पाठविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

सदर कामटावर श्री. भरत नाथमलजी कोठारी यांचे नाव निश्चित करून रेल्वे प्रशासनाकडे [illegible] मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. संजय अनंत थेराडे                अनुमोदक :- श्री. विजय राय

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २६, गाव मौजे उत्तन येथील "रोझ कॉटेज इमारतीपासून उत्तन नाका" (बस स्थानक) पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे १२.०० मी. रुंद इतके रस्ता रुंदीकरण करणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महानगरपालिका क्षेत्रातील गांव मौजे उत्तन येथील "रोझ कॉटेज इमारतीपासुन उत्तन नाका (बस स्थानक) पर्यंत" जाणाऱ्या रस्त्याची मा.आयुक्त सो., मा महापौर सो., मा.आमदार सो., व मा.शहर अभियंता यांच्या समवेत दि.10/05/2018 रोजी पाहणी केली असता सदरचा रस्ता अरुंद असल्यामुळे रहदारीस तथा वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. यास्तव उक्त रस्त्याचे 12.00 मी. रुंद पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यास मा. महापौर सो., व मा. आमदार सो., यांनी सुचित केले आहे.

महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावांसाठी "मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे.तसेच वगळलेल्या भागासाठी दि.०३/०६/२०१६ रोजी मंजूरी आहे.

उक्त विकास योजने अंतर्गत "काका बाप्टीस्टा चौक" (मौजे उत्तन, स.क्र. 298 पासुन) उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत (मौजे उत्तन, स.क्र. 9 पर्यंत) 12.00 मी.रुंद व पुढे उत्तन नाका (बस स्थानक) पर्यंत 9.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

महानगरपालिकेचे नियुक्त ठेकेदार मे. राणे मॅनेजमेंट कन्सल्टंट्स प्रा.लि.यांचेकडील उक्त रस्त्याचा विद्यमान मोजणी नकाशा सोबत जोडला आहे.या नकाशात नमुद "अ ते ब" हा रस्ता 12.00 मी.पर्यंत रुंद करणेबाबत वरील प्रमाणे सुचित केले आहे.सदरचा रस्ता मंजूर विकास योजना अंतर्गत 9.00 मी.रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. या रस्त्याचे रुंदीकरण झालेले असून मोजणी नकाशात दर्शविण्यात आल्याप्रमाणे या रस्त्याच्या दक्षिणेकडील बाजूस महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने गटाराचे बांधकाम केलेले आहे.

प्रस्तावित रस्ता विकास योजनेप्रमाणे 9.00 मी.रुंदीचा आहे.सदर रस्ता 12.00 मी.रुंद करण्याचे प्रयोजन आहे.जमिन मालकास जागेचा मोबदला अथवा विकास हक्क प्रमाणपत्र देणे कामी सदरचा रस्ता विकास योजनेत 12.00 मी.रुंद दर्शविणे आवश्यक आहे.तथापि नकाशात दर्शविवल्याप्रमाणे "काका बापटीस्टा चौक" (मौजे उत्तन, स.क्र. 298 पासुन) उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत (मौजे उत्तन, स.क्र. 9 पर्यंत) 12.00 मी.रुंद रस्ता विकास योजनेमध्ये दर्शविला असून प्रत्यक्षात जागेवरील सदर रुंदीनुसार रस्ता उपलब्ध असल्याचे दिसून येते.सबब नियोजनाच्या दृष्टीने व रस्ता रुंदीच्या सलगतेच्या दृष्टीने

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, प्रशासनाने गोषवारा दिला नाही. प्रशासनाला उत्तर द्याव लागेल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब धन्यवाद तुमचे. आज आम्हाला आयुक्त साहेब उत्तर देताहेत. याच्या पूर्वीचा गोषवारा काढून बघा मिनिटस्.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाचे अधिकार आहेत. आवश्यक त्या ठिकाणी शासन खुलासा करेल. बाकीचे अधिकार सभागृहाचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा गोषवारा असला म्हणजे धोरण प्रशासनाचा असायला पाहिजे. साहेब विषय असा आहे हा विषय ३७ खाली आलेला आहे. रस्ता ९ मीटरचा १२ करायचा, १२ चा ९ करायचा. १८ करायचा हा विषय आपला आहे. ३७ (१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम ३७(१) मायनल मॉडिफिकेशन किरकोळ दुरुस्ती डी.सी. रुल मधल्या दुरुस्तीचा विषय आहे. साहेब २०१५ मध्ये ह्या सभागृहाने सुधारीत आराखडा, सुधारीत करण्याचे काम निश्चित केलेला आहे. याचा अर्थ नविन आराखडा काम सुरु करण्यात आलं होतं. सुरु झालेला आहे. काही कारणास्तव तो विषय वादात गेला जे काही कारण असू शकतो तो लखोटा अजून बंद आहे तो अजून उघडलेला नाही. म्हणजे अशा परिस्थितीमध्ये ३७ खाली ठराव आणणे किंवा विषय देणे, गोषवारात देणे हा प्रशासनाच्या माध्यमातून योग्य आहे. एका बाजूला आराखडा तयार करण्याचा इरादा जाहिर झालेला आहे आणि दुसऱ्या बाजूला ३७ खाली कसे देऊ शकतो. साहेब तर हा विषय तुमच्या राज्यशासनाकडे जाणार आहे. इरादा जाहिर झाला. राज्य शासनाकडे गेलं, नगररचना अधिकारी नेमायचा होता तुम्ही राज्य शासनाकडे गेलात आज तो विषय उन्हाळी अधिवेशनामध्ये मार्च महिन्यामध्ये तो रद्द करण्यात आला. ऑन द हाऊस तेव्हा तो ही राज्य शासनाचाच विषय होता. आज परत आपण ती चुक करतोय असे प्रशासनाला वाटत नाही का? दुसरं तुम्ही एकदमच निवेदन करु शकाल १९ पासून ह्या वर्ष मिरा भाईंदरमध्ये हे गावाच शहर झाल्यानंतर विस्तारीत झाली. लोक राहायला आली. भाईंदर पश्चिम, मिरारोड, भाईंदर इस्टलाही बराच काही परिसर तो गावातलाच त्याच परिसर आहे अजून ही मी त्यांना गावच म्हणतो. छोटी छोटे रस्ते आहेत आणि त्या रस्त्यावर लोक राहतात. त्याला आरक्षण डी.पी. चा केला असेल तर त्या गावामध्ये हा नऊ मीटरचा रस्ता निश्चित करण्यात आला होता. एम.एम.आर.डी. त्याची प्लानिंग ऑथोरीटी आजही आहे. बांधकामाची परमिशन आपल्याला संरक्षण करायची जबाबदारी पालिकेची असली तरी ही गावासाठी त्या लोकांचे काय? किती लोकांची घर आहेत तिथे. विकास झालाच पाहिजे. विकासाच्या विरोधात कधीच जाणार नाही. स्वतः लोकांनी आपली जागा द्यायला तयारी असेल तर आमचं काय जाते. कारण की त्यांची भुमिका मांडले आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. त्यांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. त्याचं घरांना बेघर करुन चालणार नाही. म्हणून त्याविषयावर सुध्दा प्रशासनाने गांभिर्यपूर्वक विचार करावा. एकतर हा नियमाचा विषय आहे. ३७(१) खाली बरेच काही विषय आलेले आहेत. ३७ खाली आले की आम्हाला भिती वाटायला लागते की काय चाललंय.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब प्रशासन खुलासा करेल यात आपली ज्यावेळेला आढावा बैठक झाली त्या बैठकीत मा. महापौरांच्या दालनामध्ये त्यावेळी मी आपल्याशी चर्चा केली होती की उत्तनला जाताना, येताना उत्तनकरांची परिस्थिती काय असते त्यांचा चांगला अनुभव त्यांना आहेच. दोन बस तिथून सहज सुलभपणे पास होत नाही. आपल्या सुरुवातीच्या विकास आराखड्यामध्ये आपल्याला अपेक्षित असलेला

... करणार आहे. कोणावर ही अन्याय
... जसे तुम्ही भुमिका मांडत आहेत ती भुमिका आमचीही आहे. कोणावरती अन्याय होणार नाही. परंतु एवढा निसर्ग रम्य परिसर आणि आता गाव विकसित झाला आहे. मॅक्झीमम आपला बसचा रुट कुठे बिझी असतो तो उत्तनला आणि अशा वेळेला आपण ही जी व्यवस्था सांगतो की १२ मीटरचा रस्ता रुंदीकरण तुम्ही सांगितल की नविन आपल डी.पी. प्लान येतो. त्याच्यामध्ये त्या नोंदी करायच्या त्याला उशिर झाला तर आता आपण रस्त्याचे काम सुरु केलं आहे तिथे ते काम थांबेल आपला म्हणून आपलं असं आणि हे आपण ३७ (१) खाली आपण शासनाकडे आपण प्रस्ताव पाठवणार आहोत आणि शासनाकडे विशेष फॉलो अप करुन आपण तो मंजूरी करुन घेणार आहोत. त्याच्यावरती माझे असे प्रामाणिक मत आहे की हे विकासाचं काम आहे एक म्हण अशी आहे की रस्त्याचा विकास झाला तर शहरांचा विकास होईल आणि उत्तनच्या नगरसेवकांचेही मी खूप कौतुक करतो की त्यांनी ह्या प्रकरणामध्ये नेहमीच चांगली भुमिका घेतली आहे; सहकार्याची भुमिका घेतली आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्याच्या आधी ही म्हणजे आरक्षणाचे रस्ते विकसित झाले मोबदलाच्या स्वरुपात साहेब, तुमची जागा शंभर बाय शंभर होती ती तुमची पन्नास झाली. तुम्ही वर बांधा कायद्यात आहे का असं. कायद्यात नाही नियमावलीत असा कुठेच उल्लेख नाही ते करुच शकत नाही. आयुक्त गप्प बसतात, प्रशासन गप्प बसते मात्र आपल्याकडे शहरामध्ये हौशी कलावंत भरपूर आहेत ते त्यांना कामाला लावतात. प्रशासन आपलं काम करुन मोकळ होते. त्यांना बोलतो तुम्ही वरती भांडा, लेखी काहीच देत नाही. तक्रारी गेल्या की २६० ची नोटिस. साहेब हा प्रकार होतो. म्हणून गरज आहे. तिथे कराव दुसरं आज तुमचा आराखडा तयार होण्याच्या म्हणजे कामाला लागले आहेत तुम्ही इरादा जाहिर केलेला आहे. आज तो परत त्याच विषयामध्ये हा डी.पी. मध्ये आराखड्यामधला बदलाचा विषय आहे. समोर तुमच्याकडे तो लखोटा तयार आहे तो उघडा आणि बघा जेव्हा काही होईल तेव्हा आणि काय त्याच्यामध्ये बदल करायचा ते तुम्हाला करता येईल हरकती सुचना तेव्हाही तुम्हाला मागवायच्या आहेत. मग त्या हरकती सुचना मागु तेव्हा त्यावेळी हा प्रकार घडून आणा. आजपासून त्याची तयारी त्या लोकांना मानसिक त्रास द्यायचा प्रयत्न कशाला करता. जेव्हा होईल तेव्हा बघू. तो अलग निघाला नको. ते सुरक्षित आहेत. जागृत आहेत. तुमच्यांकडे हरकती सुचना घेऊन येतील तेव्हा तुम्हाला करता येईल म्हणून साहेब माझी विनंती तशीच असेल आजही हे करताना ते प्रथमतः एकतर कायद्याचा भाग त्यातून काय आहे. त्याची शाश्वती प्रशासनाने करुन घ्यावी.

**बगाजी शर्मिला :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, आताच उपमहापौरांनी निवेदन केलं आणि खरोखरच ऑक्टोबरमध्ये किंवा तत्कालीन आयुक्त नरेश गिते साहेब असताना आमची स्वतःची मागणी होती. आम्ही स्वतः जावून रुंदीकरण व्हावं अशी आमची अपेक्षा होती. आणि आम्ही त्याप्रमाणे काम ही ज्या दिवशी मला माहित आहे की ज्या दिवशी मी पत्र घेऊन नरेश गिते साहेबांकडे गेलो की मला रुंदीकरण आम्हाला प्रस्तावित करायचा आहे. त्यांना मला पहिले उत्तर दिलं की उद्याच तुम्ही जे.सी.बी. लावून करायचं का म्हटल साहेब तसे शक्य नाही. लोकांची मानसिकता आपल्याला करावे लागेल त्याप्रमाणे डी.सी. प्लॅन्ट बघितल्यानंतर नोंदणी करिता रस्ता प्रस्तावित आहे. हे आपल्यालाही माहित आहे. २०१६ साली आपल्याला मुख्यमंत्र्यांच्या सहीनिशी आपल्या एम.एम.आर.डी.ए. चा प्लान सॅक्शन झाला. त्याच्या आधी उत्तनची परिस्थिती उपमहापौर किंवा काका आहेत ह्यांना सगळ्यांनाच माहित आहेत. एम.एम.आर.डी.ए च्या प्लानसाठी आम्ही काय झेललेल आहे. तर त्यावेळी आपण जेव्हा मिटींग झाल्यानंतर सर्व जे बाधीत घरं होती त्यांना आपण सभेसाठी बोलवलं आणि सभेमध्ये ज्यावेळेला तो एम.एम.आर.डी.ए. चा प्लान नऊ मीटर आहे. हे आम्हाला मा. आयुक्त साहेबांनी ही सांगितलं आम्हीही जाणकार असल्यामुळे आम्हालाही माहितच होतं त्याप्रमाणे मार्किंग केल्यानंतर आश्वासन दिलं गेलं की जेव्हा नऊ मीटर जो रस्ता आहे त्याच्यापेक्षा एकही मीटर काम करणार नाही. कारण तिथे जुनी घर होती बरोबर आहे की जाताना

त्याप्रमाण जा दुष्पाना...
झालं. त्याच्यामध्ये टेंडरसाठी किती त्रास झाला. आम्हाला मानसिक त्रास देण्यामागचे ...
त्याच्यामागे प्रशासन त्याला जबाबदार आहे की कोण त्याला मी हे करत नाही परंतु त्याच्यानंतर काम च
झाले. उद्घाटन झालं त्यावेळी धृवकिशोर पाटील साहेब पण गेलेले उद्घाटनाच्या वेळेला आणि त्यांना
माहित होतं. ९ मीटर रस्ता आहे आणि आमदार साहेब होते. बाकीची लोक होते. त्यांच्याबद्दल वाद ना
काम चालु झाले आणि अचानक परत जेव्हा काम चालु झाल लोकांची बाधित घर होती. धुळीमध्ये लो
जात होती. व्हेहीकल जात होत्या. आम्ही स्वतः तिथून पास होत होतो. त्यावेळेला अचानक काम आमद
साहेब गेले आणि सांगितले की १२ मीटर करायचं आम्हाला शॉक लागलं की आम्हाला १२ मीटर ठ
आहे मागणी कोणाची आहे माहित नाही. इथे आपण गोषवाऱ्यामध्ये दिलेला आहे. महापौर मॅडम आ
आमदाराची मागणी वाहतूक विकासाबद्दल आम्ही विरोध करत नाही. परंतु मागणी केलेली आ
त्याच्याबद्दलही तुम्ही इथे गोषवारात म्हणजे तुमच्याकडे कोण येऊन तुमच्याकडे मागणी केलेली आ
त्याचेही काही नाही. त्यानंतर नकाशा दर्शविल्याप्रमाणे तुम्ही सांगता गोषवारा सोबत नकाशा दर्शवला आ
किती घर आहेत. किती निवासी आहेत. किती बिगर निवासी आहेत, किती व्यवसायीक आहेत. ह्य
नकाशा जोडलेला नाही गोषवाऱ्यासोबत तर आम्ही किती घरांना मोबदला देणार त्याच्यानंतर ५/०७/२०
रोजी आपला जेव्हा अतिक्रमणच इथे चालू होत त्यावेळेला आपल्याला विशेष महासभेमध्ये ठराव झाले
होता. त्याप्रमाणे आपण क्रायटेरीया ठरविलेला आहे. मोबदला कुणाला देणार पण मोबदला द्यायला म
मालकाला देणार की आधीपासून ग्रामपंचायत काळापासून जे लोक व्यवसायिक आहेत किंवा जिथे राहण
लोक आहेत त्यांना देणार ह्याचं ह्याच्यामध्ये कुठे उल्लेख केलेला नाही. तर ऑक्टोबर पासून आता ज
चालु झालं आज सात महिने झालेले आहेत. तुम्ही काम रखडवलेला आहे. आमची एवढी मागणी होती
९ मीटर काम आहे ते तुम्ही पूर्ण करा. १२ मीटरचं तुम्ही प्रस्ताव आणा त्यानंतर तुम्ही परत बाधीत घर
असेल ते करुन घ्या. आज तुम्ही जाताना बघा जो क्रोशन तोडलेला आहे. आज काही तर लोकांची
उजाळ झालेली आहेत. काही आपण बोलवलं नाही की त्यांना तुम्ही भाड्याने देवू शकतो. काही
त्याच्याबद्दल आपल्यामध्ये भावनाच दिसत नाही की त्या लोकांना काही तरी द्यायचं आहे अस तर अस गे
सात महिने एखादी ठिकाणी तो रस्ता थांबवून ठेवतो. आणि आज तुम्ही ३७ (१) खाली प्रस्ताव आणून
पुढे शासनाकडे घेऊन झाल परत हरकती येतील. परत सुचना येतील त्यानंतर म्हणजे अजून किती वे
आम्ही वाट पाहायची. आम्ही लोकप्रतिनिधी असताना आम्ही तिथे उभे राहून काम केलेले आहे. त्या
सगळ्यांनाच जाणीव आहे. हे असताना देखील आम्ही लोकप्रतिनिधी आम्ही लोकांना प्रश्नाची उत्तर द्याय
का? प्रशासन त्याला काहीही जोडलेला नाही. आम्ही प्रशासनाला मदत केली तर आम्ही आमच्या जीवा
उठल्यासारख प्रशासन हट्ट करत असेल तर हा प्रस्ताव आणून त्याच्यातून काय सिध्द करायचे आ
ह्याच्यामध्ये अजूनही मला कळलेलं नाही. तर मा. आयुक्त साहेब.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्या मुद्दयांचा खुलासा करतो. सन्मा. महापौर महोदय ह्या ठिकाणी रोझ कॉटे
इमारतीपासून उत्तन नाका रोजी उत्तन गावामध्ये मंजुर विकास योजनेला १२ मीटर रुंद रस
रुंदीकरणाचा ३७ (१) खाली हा प्रस्ताव आलेला आहे. मी महानगरपालिका आयुक्त पदाचा चा
घेतल्यानंतर उत्तनची पाहणी केली. सन्मा. सदस्या आणि दुसरे नगरसेवक आमच्या सोबत होते. महाप
होते ह्या गोषवाऱ्यात नमुद केलेले सगळे पदाधिकारी होते आणि निश्चितच ह्या ठिकाणी जे मुद्दे चर्चे
आलेले आहेत हा प्रस्ताव नियमबाह्य नाही. ह्या सर्वप्रथम मी आपल्यासमोर नमुद करु इच्छितो.
नियमानुसारच आहे. महापालिकेचा सुधारीत विकास आराखड्याचा इन्टेन्शन डिक्लेअर झाला आणि प
नव्याने हे ३७ असा जो आक्षेप आहे. ते आक्षेप ह्याला लागू होत नाही कारण सुधारीत आराखडा डिक्ले
झाला तेव्हा एम.एम.आर.डी.ची जी प्लानिंग ऑथोरिटी होती तो भाग डिलेटेड आहे. म्हणून आ
ह्याच्यापुढे जे काही मॉडीफिकेशन एम.एम.आर.डी.ए च्या एरियात करायचे आहेत. त्यांनी ते आपल्या
हॅन्डवर्क केलेले आहे. आम्ही त्यांच्याशी खात्री केली की ह्या प्लॅनमध्ये काही सुधारणा करायची असेल त

प्रस्ताव आम्ही आपल्याकडे पाठवावेत की काय करावे. तेथील चीफ प्लॅनर कडून द्यावे त्याच्याकडून अंतिम माहिती मिळाल्यानंतर आता ही योजना आपल्याकडे सुपुर्त झालेली असल्यामुळे ह्याच्या पुढचे सगळे कामकाज आपण करु शकता, आयोजित प्लॅन ऑथोरिटी तर हा जो प्रस्ताव दिलेला आहे तो नियमानुसार दिलेला आहे. मुद्दा एक आहे उत्तन नाका पुर्वीचा उत्तन राहिलेला नाही. खुप मोठ्या प्रमाणात त्याठिकाणी रहदारी वाढलेली आहे. मी ज्यावेळी १५,१०,१२ वर्षाखाली होतो आज निश्चितच काही भाग एम.एम.आर.डी.ए च्या ह्याच्यामध्ये १२ मीटर दर्शविलेला आहे. रोझ ह्याच्यापर्यंत आणि ९ मिटर दर्शविलेलं आहे आणि सरसकट जर १२ मीटर झाला तर मी निश्चितच लोकप्रतिनिधी त्या निवडून आल्याचं स्वागत करतो की त्यांनी ह्या कारवाईला सपोर्ट केलेलं आहे. फक्त त्यांच्या ज्या व्यथा आहेत लोकप्रतिनिधी म्हणून लोकांना डायरेक्ट बेनिफिट देणेसाठी आपण कमी पडतो. आपण ९ मीटरचं डायरेक्ट वाईंडींग केलं तर आपल्याला हक्क त्यांना बेनिफीट देण्याचे तुमच्याच मुद्दयाच लवकर निराकरण व्हावं म्हणून हे प्रशासनाची धडपड आहे. एकदा ह्याला मंजुरी झाली आणि हे आपल्याला टाईम बॉन्डमध्ये मंजुर करुन घ्यायचं आहे. जेणेकरुन तिथे जे विस्थापित होतात तिथे जे हक्काचे लोक आहेत त्यांना आपल्याला एकतर टी.डी.आर देता येईल त्यांना वेगवेगळ्या पध्दतीचा मोबदला देता येईल आणि रस्ता विकसित सुध्दा करता येईल. आणि हा रस्त्याची ज्यावेळेस मेजर पाहणी केली तर हे कारवाई करताना लोकप्रतिनिधी आणि तिथले लाभधारक जे आहेत त्यांना विश्वासात घेऊन प्रशासनाच्या माध्यमातून कारवाई केली जाईल बेकायदेशीर कारवाई आपण करणार नाही. सगळ्यांचे हात समावेश असेल तर हे नियमाने असलेला प्रस्ताव आपण मंजुर करावे माझी विनंती आहे.

**शर्मिला बगाजी :-**

साहेब ठीक आहे तुमचं जे आश्वासन आहे तसे नरेश गिते साहेबांच आश्वासन होतं त्याच पण आम्ही स्वागत केलं. तुमच आश्वासन आहे त्याच पण आम्ही स्वागत करतो. आम्ही कधीही उत्तनचे लोक तुम्हाला माहित असेल किंवा इथले ज्येष्ठ नगरसेवक आहेत त्यांना माहित आहे. कधीही आम्ही कोणत्याही कामाला विरोध न करणारे लोक आहोत. सत्ताधारी कोणीही असु दे, सत्तेत असो नसो पण आम्ही कधीही विरोध केलेला नाही. परंतु आता जो ठराव झालेला आहे त्याच्यामध्ये आमची सुचना जे तुम्ही आपण सांगितल ते सुचनामध्ये घ्याव नाही तर विशेष महासभेमध्ये.

**मा. आयुक्त :-**

पुढील कारवाई करताना सर्वांना इनव्हॉल करुन कारवाई केली जाईल. लोकप्रतिनिधी आणि लाभार्थी त्याच्यात काही सुधारणा करायला हरकत नाही. तुम्ही त्या सुचना द्या. त्या ठरावाचा भाग होईल असे पुरक मांडणी करा कोणीतरी.

**शर्मिला बगाजी :-**

सुचना माझी अशी आहे की विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ रोजी ठराव क्र. ३४ प्रमाणे ज्यांची जागा, दुकानं, घरे, रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत आहेत. त्यांना महापालिकेद्वारे नोटिस देण्यात यावी आणि त्यांची बैठक घेऊन त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत मोबदला, लेखी स्वरुपात हमी पत्र आणि पुनर्वसन संपूर्ण व्यवस्था केल्यानंतर पुढची तुम्ही कारवाई करावी अशी आमची सुचना आहे.

**स्नेहा पांडे :-**

एक सुचना मेरी भी है २०१६ में जिस तरह भाईंदर ईस्ट में कारवाई हो रही थी, तोडक कारवाई वेदर सुचना, बाद में जन आंदोलन लिया गया उसमें हमारे नगरसेवक नलावडे साहब भी उनका भी गाला था बाधीत हुए थे। उनके साथ मिटींग करके उत्तन में भी नोटिस दिया जाए उनको मोबदला देके ही रुंदीकरण का काम शुरु किया जाए।

**शर्मिला बगाजी :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते, रुंदीकरणाचे काम चालूच झालेले आहे. तुम्ही आता आश्वासन सुचना घेतली. त्याच्याबद्दल धन्यवाद आणि त्याप्रमाणे आपण जिथे आपण ९ मीटर किंवा १२ मीटर करु दे पण तिथली जी ट्राफीक आहे जे अननेसेसरी तो भाईंदरचा जो रिक्षा स्टॅन्ड बसवलेला आहे. त्या एक वर्षामध्ये, एकाच वेळेला ५० रिक्षा लागलेले असतात तर त्याचा जो रिक्षा स्टॅन्ड बनवलेला आहे. त्याला पर्यायी जागा द्यावी ही पण माझी सुचना आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याचीही नोंद घेतली जाईल.

रोहिदास पाटील :-

आता दिलेल्या ठरावानुसार एक सुचना दुरुस्ती करुन घेऊ त्याच्यामध्ये सन्मा. नगरसेविका बगाजी शर्मिला यांनी दिलेली की जे बाधीत होतील त्यांच्याबद्दल सहानुभुतीपूर्वक विचार करुन त्यांना योग्य तो न्याय मिळेल त्यांना विश्वासात घेऊनच कारवाई केली जाईल अशी माझी सुचना आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर, पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. २६ :-

**गाव मौजे उत्तन येथील "रोझ कॉटेज इमारतीपासून उत्तन नाका" (बस स्थानक) पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे १२.०० मी. रुंद इतके रस्ता रुंदीकरण करणेबाबत.**

ठराव क्र. २७ :-

**महानगरपालिका क्षेत्रातील गांव मौजे उत्तन येथील "रोझ कॉटेज इमारतीपासुन उत्तन नाका (बस स्थानक) पर्यंत" जाणाऱ्या रस्त्याची मा.आयुक्त सो., मा महापौर सो., मा.आमदार सो., व मा.शहर अभियंता यांच्या समवेत दि.10/05/2018 रोजी पाहणी केली असता सदरचा रस्ता अरुंद असल्यामुळे रहदारीस तथा वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. यास्तव उक्त रस्त्याचे 12.00 मी. रुंद पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यास मा. महापौर सो., व मा. आमदार सो., यांनी सुचित केले आहे.**

**महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावांसाठी "मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे.तसेच वगळलेल्या भागासाठी दि.०३/०६/२०१६ रोजी मंजूरी आहे.**

**उक्त विकास योजने अंतर्गत "काका बाप्टीस्टा चौक" (मौजे उत्तन, स.क्र. 298 पासुन) उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत (मौजे उत्तन, स.क्र. 9 पर्यंत) 12.00 मी.रुंद व पुढे उत्तन नाका (बस स्थानक) पर्यंत 9.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.**

**महानगरपालिकेचे नियुक्त ठेकेदार मे. राणे मॅनेजमेंट कन्सल्टंट्स प्रा.लि.यांचेकडील उक्त रस्त्याचा विद्यमान मोजणी नकाशा सोबत जोडला आहे.या नकाशात नमुद "अ ते ब" हा रस्ता 12.00 मी.पर्यंत रुंद करणेबाबत वरील प्रमाणे सुचित केले आहे.सदरचा रस्ता मंजूर विकास योजना अंतर्गत 9.00 मी.रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. या रस्त्याचे रुंदीकरण झालेले असून मोजणी नकाशात दर्शविण्यात आल्याप्रमाणे या रस्त्याच्या दक्षिणेकडील बाजूस महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने गटाराचे बांधकाम केलेले आहे.**

**प्रस्तावित रस्ता विकास योजनेप्रमाणे 9.00 मी.रुंदीचा आहे.सदर रस्ता 12.00 मी.रुंद करण्याचे प्रयोजन आहे.जमिन मालकास जागेचा मोबदला अथवा विकास हक्क प्रमाणपत्र देणे कामी सदरचा रस्ता विकास योजनेत 12.00 मी.रुंद दर्शविणे आवश्यक आहे.तथापि नकाशात दर्शविवल्याप्रमाणे "काका बापटीस्टा चौक" (मौजे उत्तन, स.क्र. 298 पासुन) उत्तन पाण्याच्या टाकीपर्यंत (मौजे उत्तन, स.क्र. 9 पर्यंत) 12.00 मी.रुंद रस्ता विकास योजनेमध्ये दर्शविला असून प्रत्यक्षात जागेवरील सदर रुंदीनुसार रस्ता उपलब्ध असल्याचे दिसून येते.सबब नियोजनाच्या दृष्टीने व रस्ता रुंदीच्या सलगतेच्या दृष्टीने नकाशात दर्शविल्यानुसार अ ते क पर्यंत सुमारे 370.00 मी.लांबीचा रस्त्यासाठी 12.00 मी.रुंदीकरण प्रस्तावित करणे (सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे) योग्य राहील.**

**सबब उपरोक्त बाबींचा विचार करता अ ते क या लांबीसाठी नकाशात दर्शविल्याप्रमाणे 9.0 मी.रुंदी ऐवजी 12.00 मी. रुंदीकरण प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार करावयाच्या फेरबदलास व सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरीसह शासनास सादर करणेस तसेच त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्रीम. नयना म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. शर्मिला बगाजी व अनुमोदक श्री. एलायस बांड्या यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

**सदर रोड रुंदीकरण करणेकरीता विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ रोजी ठराव क्र. ३४ प्रमाणे सर्वप्रथम ज्यांनी जागा, दुकाने, घर, रोड रुंदीरकणामध्ये येत आहेत. त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेद्वारे नोटीस देण्यात यावी व त्यांची बैठक करुन पुर्नवसन आणि मोबदला लेखी स्वरुपात हमी देऊन आणि पुर्नवसन आणि**

रोहिदास पाटील :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) येथे मौजे.नवघर सर्व्हे क्र.239 (नविन सर्व्हे क्र.184 (1) या जागे समोर असलेल्या चौकास (आरक्षण क्र.231 मार्केट समोर) स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील यांचे नाव देण्यास व सदर चौक त्यांच्या कुटूंबियांना स्वखर्चाने बांधण्यास परवानगी देण्यासाठी मा. महासभेने विषय घेण्यासाठी मा.महापौर यांनी दि.29/06/2018 रोजीच्या पत्राने कळविलेले आहे. सदर चौकास यापुर्वी नामकरण करण्यात आलेले नाही. सदर चौकास स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील यांचे नांव देण्यास व सदर चौक बांधण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच खालील चौकाचे देखील नामकरण करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | परिसर | चौकाचे नाव |
|---|---|---|
| 1 | आरक्षण क्र.231 मार्केट समोर | स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील चौक |
| 2 | भाईंदर (प.) साई भवन-महावीर छाया इमारती जवळील महाराणा क्रॉस रोडवरील चौक | बुध्दीसागर सुरेश्वरजी समाधी चौक |
| 3 | हॅप्पी होम, नवग्रह रिगल आर्केड, लाविस्टा सोसायटी समोरील चौक | स्व. रविप्रकाश पाण्डेय चौक |
| 4 | जुन्या अग्निशमन कार्यालयाच्या जागेवर बांधण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृह व क्रिडा भवन | जैनाचार्य श्री विजय अभयदेवजी सुरीश्वरजी |

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

विषय काय काकांनी वाचल काय नामकरणाचा एका चौकाचा विषय होता त्याला आमचा आक्षेप नाही. त्यासाठी आम्ही ही मागणी केली होती. पण काकांनी दोन चार चौक अजून घेतले त्याच्यामध्ये तुम्ही चौकाचे विषय घेताना काही तरी ठरवा ना.

**अनिल सावंत :-**

सभागृह नेते ज्येष्ठ नगरसेवक ह्या सभागृहाचे त्याच्याजवळून ज्यावेळी असे ठराव वाचले जातात गोषवारा वेगळा आणि ठराव वेगळा ही अपेक्षा नसते. मा. आयुक्त साहेब तुम्ही गोषवाऱ्यामध्ये द्यावा आम्हाला एवढे चौक करायचे आहे. बजेटच्या वेळेलाही असेच घुसवाघुसवी केली विकास कामाची आणि काकासारखा माणूस ठराव वाचतो.

**प्रविण पाटील :-**

खुलासा करा ना. आमच्याकडे ही भरपूर चौकाची नाव द्यायची आहेत. ती पण घेतो ना आता. विषय आहे फक्त एका चौकाला नामकरण करा आणि स्वतःच्या खर्चाने सुशोभिकरण करणार. तिथपर्यंत मर्यादा ठीक आहे. परंतु त्या चौकाच्या जोडीला अजून मिरा भाईंदरमध्ये अनेक चौकाला नाव देण्याचं तुम्ही विषय आणा. रितसर चौकावर नाव देण्याचं आमची ही काही चौकाची नाव आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

एकच विषय होता आणि त्याच्यामध्ये तुम्ही अनेक नाव घुसवली जातात.

**प्रविण पाटील :-**

काका कुठली नाव आणली? स्वातंत्र्य सैनिक आहेत ते पण.

[illegible] करल त्यांच्या व्यातिरिक्त घुसवाघुसवी केलेली कुठेलेही वस्तु मान्य करणार नाही ही भूमिका साहेब तुम्हाला घ्यावी लागणार आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम गोषवारा बनवते वेळी सभागृहनेत्याना विश्वासात घेतले जाते. त्यांना विचारले जात नाही का? महापौर मॅडमने खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम त्यावेळी बहुमताने निर्णय घेतलेला आहे त्यात चुकीचे काय आहे. सगळी चांगली लोक आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

महापौरांचा अधिकार विषय देण्याचा होता. प्रशासनाने त्याच्यावर त्यांना योग्य वाटले त्यांनी गोषवारा दिला.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम एखादा विषय आला की त्याच्यामध्ये सगळ्यांचा विचार विनिमय होतो आणि विचारविनिमय झाल्यानंतर निर्णय होतो. त्या अनुषंगाने आणखीन इतर नगरसेवकांची वार्डातले चौक होते, नामकरण करायचे बाकी होते त्याप्रमाणे हा ठराव मांडला आहे. त्याप्रमाणे हा ठराव मान्य नसेल तर त्यांना तसे ऑब्जेक्शन नमुद करावे.

**जुबेर इनामदार :-**

ऑब्जेक्शनचा विषय हा तुम्ही गोषवारा दिलेला. गोषवाऱ्याला मी विरोध करतो. गोषवाऱ्यामध्ये दिलेला जो चौक आहे त्याला आमचा विरोध नाही. महापौर मॅडम तुमच्याकडे विषय आल्यानंतर तुम्ही तो विषय प्रशासनाकडे देता गोषवारा तयार करायची जबाबदारी प्रशासनाची गोषवारा प्रशासनाचा असतो किंवा अशा मुद्दयांवर तसा आपल्याला करता येईल. कायद्यात आहे गोषवारा आला म्हणजे त्याला जबाबदार प्रशासन हा जो तुम्ही प्रशासनाचा गोषवारा व्यतिरिक्त जे काही त्याच्यामध्ये घुसवाघुसवी कराल त्याचा आम्हाला अनुभव नसतो ना आम्हाला स्वप्न पडत नाही रात्री काय विचार केलेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ही महानगरपालिका अस्तित्वात आहे अनिल सावंतलाही माहिती आहे आणि जुबेर इनामदार आपल्याला पण माहिती आहे असे कित्येक प्रकारचे नामकरण झाले आहे.

**अनिल सावंत :-**

अशा प्रकारचे गोंधळ आम्ही केला नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, ज्यावेळेला ह्या शहरामध्ये चौकाची आणि ज्यासाठी नाव देतो त्यावेळेला स्वतंत्र विषय येतो आणि महापालिकेच्या नगरसेवकांकडून तिकडून प्रस्ताव मागितला जातात त्या-त्या विभागातील आणि ज्याच पत्र येतो त्या प्राधान्याने त्यांना नाव दिली जातात. ही प्रथा आणि असा ठराव आहे. आता तुम्ही कुठे पत्र मागवले आणि कुठल्या नगरसेवकांकडून रितसर मागितलं अस नाही ना तुम्ही नामकरणाच बघा ना प्रस्ताव कसे आहेत ते.

**मा. महापौर :-**

तुमचा विरोध आहे का?

**प्रविण पाटील :-**

विरोधाचा प्रश्नच येत नाही गोषवाऱ्याला आमचे समर्थन आहे.

महापौर महोदय एक मुद्दा ह्या ठिकाणी थोड त्याची दखल घेतो प्रशासनाची सन्मा. सभागृह नेत्यांनी जी नाव आहेत ऑलरेडी जर ते कोणाला दुसऱ्याला दिलेले असतील तेच नाव त्याची तपासणी केली जाईल आणि उपमहापौर साहेबांनी जो मुद्दा मांडला ह्या धोरणाबाबत नामकरणाच्या बाबतीत ठाणे महानगरपालिका, मुंबई किंवा नवी मुंबईचे काही धोरण असेल तर ते धोरण सुध्दा आपल्याकडे आणले जाईल.

**दिनेश नलावडे :-**

उपमहापौर साहेब एकच नाव आलेले आहे ना. गोषवारा आमच्याकडे कसा आलेला आहे. त्यांना आम्ही मान्यता देतो त्याला विरोध नाही. परंतु इतर नाव असतील तर महापौर मॅडम सगळ्यांचीच नाव येऊ द्या ना. आणि तो विषय सेप्रेट आणा गोषवाऱ्यामध्ये एक नाव असताना त्याच्यामध्ये दुसरी नाव घुसवण्यात आली.

**मा. उपमहापौर :-**

असे पहिल्यांदा झाल अशातला भाग नाही ना. तुमचे नावे देताना सामाजिक दायित्व किंवा धार्मिक कार्यक्षेत्रात त्यांची कामगिरी घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

तुमचा नावाला विरोध नाही. नाव सुचवलेले आहेत ते यापूर्वी इतरांना दिलेले आहेत का याची खात्री करुनच त्यांची अंमलबजावणी केली जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम तुम्ही वेगळा विषय घेऊन या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलतो मा. आयुक्त साहेब याच्यापूर्वी असं झालं भाईंदर वेस्टला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच नाव देण्याचे सुचवण्यात आले. परस्पर ते नाव कट करुन तिथे भलतच काही तरी केलं ह्या अशा गोष्टी घडल्या आहेत ह्या सभागृहात.

**मा. आयुक्त :-**

तेच मी सांगितले आहे की अस आलेल्या यादीमध्ये यापूर्वी काही कामकाज झालेले आहे का याची तपासणी केली जाईल.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब अजुन एक सांगतो काही वर्षापूर्वी मला तारीख नाही आठवत परंतु ह्या मिरा भाईंदरमध्ये जेवढे स्वातंत्र्य सैनिक आहेत त्या स्वातंत्र्य सैनिकांची आपण मिरा भाईंदरमध्ये प्रत्येक प्रमुख रस्त्यांना नाव दिलेली होती. परंतु आता काय झालं त्या स्वातंत्र्य सैनिकांची नावाच्या पाट्यांच्या जागी दुसरेच कुठलेतरी नाव आलेली आहेत. तर मुळात ती नाव कुठली आहेत ती तपासा. त्याच्यानंतर दुसरी नाव द्या.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

आरक्षण क्र. २३१ मार्केट समोर स्वातंत्र्य सैनिक कमलाकर पाटील चौक २. भाईंदर पश्चिम साई भवन महावीर छाया इमारती जवळील महाराणा क्रॉस रोड वरील चौक, बुध्दी सागर सुरेश्वरजी समाधी चौक. ३ हॅप्पी होम नवघर रिगल आर्केड लाविस्टा सोसायटी समोरील चौक स्व. रवी प्रकाश पाण्डेय

अनिल विराणी :-

पुनमसागरचे जे चौकचे नाव दिले रवि प्रकाश पाण्डेजी ते माजी नगरसेवक अशी मी सुचना मांडत आहे.

प्रकरण क्र. २७ :-

**चौकाचे नामकरण करणे.**

ठराव क्र. २८ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर (पुर्व) येथे मौजे.नवघर सर्व्हे क्र.239 (नविन सर्व्हे क्र.184 (1) या जागे समोर असलेल्या चौकास (आरक्षण क्र.231 मार्केट समोर) स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील यांचे नाव देण्यास व सदर चौक त्यांच्या कुटूंबियांना स्वखर्चाने बांधण्यास परवानगी देण्यासाठी मा. महासभेने विषय घेण्यासाठी मा.महापौर यांनी दि.29/06/2018 रोजीच्या पत्राने कळविलेले आहे. सदर चौकास यापुर्वी नामकरण करण्यात आलेले नाही. सदर चौकास स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील यांचे नाव देण्यास व सदर चौक बांधण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच खालील चौकाचे देखील नामकरण करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | परिसर | चौकाचे नाव |
|---|---|---|
| 1 | आरक्षण क्र.231 मार्केट समोर | स्वातंत्र्य सैनिक कमळाकर पाटील चौक |
| 2 | भाईंदर (प.) साई भवन-महावीर छाया इमारती जवळील महाराणा क्रॉस रोडवरील चौक | बुध्दीसागर सुरेश्वरजी समाधी चौक |
| 3 | हॅप्पी होम, नवग्रह रिगल आर्केड, लाविस्टा सोसायटी समोरील चौक | स्व. रविप्रकाश पाण्डेय चौक |
| 4 | जुन्या अग्निशमन कार्यालयाच्या जागेवर बांधण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृह व क्रिडा भवन | जैनाचार्य श्री विजय अभयदेवजी सुरीश्वरजी |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २८, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ७०.०० मी. पेक्षा जास्त उंचीच्या (High Rise Building) करीता परवानगी देणेबाबत.**

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

2.5), म्हाडा गृहसंकुल योजना (चटई क्षेत्र निर्देशांक 2.5), भाडे तत्वावरील गृहनिर्माण योजना (चटई क्षेत्र निर्देशांक 4.0) वपरवडणारी घरे योजना (चटई क्षेत्र निर्देशांक 3.0) याप्रमाणे विविध गृहनिर्माण योजने अंतर्गत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासह देण्याची तरतूद नियमात आहे.सदर अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकामुळे उंच इमारती बांधणे अनिवार्य ठरते.याबाबत खाजगी विकासकांमार्फत मागणी केली जात आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम 30(I) नुसार इमारतीची उंची हि विद्यमान रस्ता किंवा विकास योजना रस्त्याकडुन इमारतीच्या पुढील बाजूने सोडलेले सामासिक अंतर अधिक रस्त्याची रुंदी यांच्या 1.5 पट व जास्तीचे 2 पट या गुणोत्तरानुसार कमाल उंची अनुज्ञेय केलेली आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेचे अग्निशमन विभागामार्फत नॅशनल बिल्डींग कोडनुसार सर्वसाधारण रहिवास वापराच्या प्रस्तावास 45.00 मी. पर्यंत व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक असलेल्या गृहसंकुलाच्या प्रस्तावास 70.00 मी. पर्यंत प्राथमिक व अंतिम नाहरकत दाखला दिला जातो.

सद्यस्थितीत सन 2005 चे नॅशनल बिल्डींग कोड अस्तित्वात आहे. शहरातील भुखंडाच्या मालकीचे क्षेत्रामधील कमी जास्त आकाराचे भुखंडामधील तफावत पहाता विकासक इमारतीचे मजले वाढविण्याशिवाय पर्याय नसतो.

तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरामुळे आवश्यक असलेल्या पार्किंगच्या संख्येत वाढ झाल्याने इमारतीमध्येच पार्किंगकरीता काही मजले प्रस्तावित करणे आवश्यक ठरते. त्यामुळे एकूण इमारतीची उंची वाढते व परिणामी 45 मी. व 70 मी. पेक्षा जास्त उंचीची इमारत प्रस्तावित करणे आवश्यक ठरते.

दि.07 सप्टेंबर 2017 रोजीच्या शासन निर्णयानुसार 70.00 मी. उंचीपेक्षा जास्त उंचीच्या इमारतीस **High Rise Committee** च्या नाहरकत दाखल्याच्या अटीसापेक्ष ठाणे महानगरपालिकेस मान्यता प्रदान करुन मंजूरी दिली आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने **High Rise Committee** दि.16/01/2018 चे निर्णयानुसार गठीत केली आहे.

सबब रहिवास, वाणिज्य व औद्योगिक व तत्सम वापराच्या **70.00** मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारती अनुज्ञेय करणेच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावली व नॅशनल बिल्डींग कोड यांचा विचार करता मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम 30(1) ते 30(5) कायम ठेवून नव्याने विनियम 30(6) मध्ये **<u>High Rise Committee</u>. It is mandatory for the Mira Bhainder Municipal Corporation that for the buildings having height above 70.00 mt. or as modified by the Government from time to time, the building proposal shall be cleared from the High Rise Committee, constituted by the Govt.** याप्रमाणे फेरबदल अंतर्भूत करणेसह **High Rise Committee** गठीत करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी **महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार करावयाच्या फेरबदलास व सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरीसह शासनास सादर करणे व High Rise Committee गठीत करणेस येत असून त्यामध्ये आयुक्त, मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना व शासन सुचविल त्या तज्ञ व्यक्तीची नेमणूक करुन अंतिम मंजुरीकरीता शासनाकडे पाठवावा. अशी High Rise Committee गठीत करणेस ही मा. महासभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम या आयुक्त साहेब हा जो विषय आलेला आहे. सध्या आपण ज्या जनरल इमारती आहेत त्या ४५ मीटरची परवानगी देतो. आता ह्या ठरावात किती होणार आहे.

**मा. आयुक्त :-**

नॉर्मल ४५ मीटर देतो आणि स्पेशल एफ.एस.आय. मध्ये ७० पर्यंत एक्झेस्टींग आहे.

**मा. आयुक्त :-**

आता त्यांनी लिमीट टाकुन देतील ना. आपल्याला आपण ७० मीटर पेक्षा जास्त लिहलेल आहे.

**अनिल सावंत :-**

४५ च्या जागी ७०.

**मा. आयुक्त :-**

हा. सध्या काम करतो आपण इमारतीचा पुढचा रस्ता आणि त्याचा फ्रन्ट मार्जिन असा ॲड करुन एक तर दीड पट किंवा दोन पट बिल्डींगची एक थमरुल असतो. कोणत्याही बिल्डींगची ऊंची समोरचा रस्ता, समोरचा साईट मार्जिन ह्याची जी रुंदी असते त्या रुंदीचा दीड पट किंवा दुप्पट.

**अनिल सावंत :-**

आता लिमिट किती वाढणार आहे.

**मा. आयुक्त :-**

ते शासन निश्चित करेल आपल्याला.

**अनिल सावंत :-**

आपण पर्पोज किती करतोय.

**मा. आयुक्त :-**

आपण ह्याच्यात पर्पोज नाही केलं. आपल्याला लिमीटपेक्षा जास्त कोण देणार आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब १०-१२ वर्षापूर्वी आपण ह्या शहरामध्ये होतात.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब डे बाय डे आपल्याकडे लॅन्ड व्हॅल्यू वाढतोय आम्ही पॉप्युलेश प्रेशर खुप मोठा आहे. आता आपल्याकडे अद्यावत असा पाणीपुरवठा झालेला आहे. सिव्हरेज झालेला आहे. रस्ते चांगले होतात तर आपण मुंबई सारखे उपनगर होण्यासाठी त्या क्षमतेला आलेलो आहोत. म्हणून आपल्या लोकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी आता पार्किंगचा विषय आहे. पूर्वीचे जी घर होती त्याला पार्किंग नाही. ह्याच्यामुळे दोन दोन फ्लोअर पार्किंग होईल हा कस आहे आपण पॉझिटिव्ह ॲटीट्युडने चर्चा करायला पाहिजे. त्याच्यामध्ये सर्व शहराचा विकास आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे आता एक्झेस्टिंगमध्ये ४५ मीटरच्या वरती कोणी नाही ना. अशा काही फिगर आहेत कोणी बांधणार असतील.

**मा. उपमहापौर :-**

७० पर्यंत आहेत ना.

**अनिल सावंत :-**

७० पर्यंत तर एम.एम.आर.डी. आणि म्हाडा आहेत. जनरल नाहीत.

**मा. आयुक्त :-**

स्पेशल एफ.एस.आय. ज्यांना आहे.

**अनिल सावंत :-**

म्हाडा आणि एम.एम.आर.डी.ए. ने ह्या शहराची पूर्ण वाट लावली आहे. ह्या १०,१२ वर्षामध्ये ह्या शहराची एवढी वाट लागली आहे. मा. महापौर तुळशीदास म्हात्रे साहेब असते वेळी आम्ही स्पेशल रिक्वेस्ट केली होती की म्हाडाला आणि एम.एम.आर.डी.ए. ला ह्या शहरामध्ये आणु नका कारण ह्या शहराची ती ताकद नाही. ७९ स्क्वेअर कि.मी. आपला एरिया आहे. आपण गोषवाऱ्यामध्ये दिलेला आहे. एम.एम.आर.डी.ए. प्लानिंग कमिटी सदस्य असते वेळी बऱ्याचशा मिटींगमध्ये विशेष चर्चा व्हायची वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा एक रिपोर्ट आहे. एक स्क्वेअर कि.मी. मध्ये फक्त १० हजार पॉप्युलेशन सामावू

शकेल. आज ७९ स्क्वेअर कि.मी. म्हणजे फक्त ८ लाखाची पॉप्युलेशन हे शहर सहन करु शकतो त्याच्यावरती नाही. आणि आज परिस्थिती काय आहे १२ लाखाच्या जवळपास आणि वोटिंग पॉप्युलेशन पकडली तर १५ लाख पॉप्युलेशन ह्या शहराची झालेली आहे. आणि हे परमिशन दिल्यानंतर ह्या शहराची पॉप्युलेशन किती होईल.

**मा. आयुक्त :-**

तुमची अशी शंका नको की ७० मीटर पेक्षा जास्तच दिलं म्हणजे इथे एक २५ लाख पॉप्युलेशन ५० लाख असे नाही. जे एक्झेस्टींग बेनीफीट आहेत ते क्लस्टर माध्यमातून आहेत. उद्या १० मिलींग जुने एकत्र येऊन जर मोठा प्लॉट एरिया असला तरच हा दिला जातो. सरसकट लोकांना हा बेनिफीट दिला जात नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब क्लेस्टर वेळी तो कन्ट्रोल ठीक आहे. नंतर काय होईल. साहेब एक उदाहरण देतो छोटस.

**मा. आयुक्त :-**

मी लोकांना क्रॉस नाही करत, आपल्याला माहिती देऊ इच्छितो हा सरसकट कोणत्याही फ्लॅटला लागू नाही होणार. त्या समोर तेवढ्या रुंदीचा रस्ता पाहिजे आणि त्याची निर्धारित भूखंड एरिया निश्चित केला जातो. त्यानाच तो लागू होतो आणि हे करत असताना शहराची पॉप्युलेशन मल्टीपल व्हावा अशी अपेक्षा नाही. पॉप्युलेशन कॅरेज, डेनसिटी आणि त्याचा रेश्यू आहे तो मेन्टेन ठेवूनच हा एरिया कॅलक्युलेट केला जातो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब म्हाडाला आपण एफ.एस.आय. दिला त्यांनी कॉम्पलेक्स बांधला रामनगरला तो रस्ता जातो. साहेब जो म्हाडाचा कॉम्पलेक्स आहे ना संध्याकाळच्या वेळी तिथून चालून दाखवा फक्त त्या रोडने गाड्या तर सोडून द्या. एवढ्या बिल्डींग बांधल्या आहेत. २१-२१ म्हाडाच्या आणि खालती रस्ता नाही. म्हणून भांडण होतात. पार्किंगला साहेब तुम्ही स्वतः जा हे म्हाडाने केलेले आहे. लोढाला, एम.एम.आर.डी. ला आपण त्या रस्त्याची परिस्थिती बघा. आज शहराची ट्राफीकचा एवढा प्रॉब्लेम आहे. संध्याकाळच्या वेळेला साईबाबा नगर ते सृष्टीला जायचं असेल ना तर एक कि.मीटर सुध्दा अंतर नाही ४५ ते ५० मिनीटे लागतात. भाईंदर ईस्टची परिस्थिती वेगळी नाही. ह्या शहरामध्ये तुम्ही पाण्याचा उल्लेख केला. पाण्याची साहेब स्वतःची आपली योजना नाही. स्वतःचे धरण नाही. एम.आय.डी.सी. आणि पाणी पुरवठा त्याच्यावर आपण अवलंबुन आहोत. ठाणे महानगरपालिकेची परिस्थिती वेगळी आहे. आज सुर्या प्रकल्पाच काम रखडलेलं आहे ते पूर्ण होईल की नाही ही शंका नाही. ज्या खासदाराचा त्यांनी उल्लेख केला गावीत साहेब आमचे पूर्ण कॉंग्रेसवासी त्यांनी त्याला विरोध केलेला आहे. कडकडून ह्या शहराचे ते नागरीक आहेत. साहेब माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे ह्या शहराला वाचवायचं असेल तर ही परमिशनसाठी शासनाकडे पाठवू पण नका आज परिस्थिती बघा काय आहे. शाळा आपण चालवू शकत नाही. त्याच्यासाठी आपण एन.जी.ओ. बोलवतात. उत्तनचा घनकचरा प्रकल्पाचा प्रश्न साडे चारशे मेट्रीक घनकचरा आपण कशी विल्हेवाट लावायची आल्यापासून तुम्ही त्याच्या मागे लागलात. पाण्याची दुर्भिक्षा आहे व रस्त्याची परिस्थिती तुम्ही बघत आहात.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

तुम्ही असे कराल तर शहराचा पूर्ण आढावा घ्या. शहराची परिस्थिती बघा. आज शैक्षणिक भुखंड आपण विकसित करु शकत नाही म्हणून वाटून टाकले अशी ही परिस्थिती आहे. आढावा घ्या आणि योग्य निर्णय घ्या. मी माझा ठराव वाचतो.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण १९ महसूली गावांचा समावेश असून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९ चौ.कि.मी. आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेची मुदत संपलेली असून नवीन विकास योजनेच्या बाबतीत असंख्य तक्रारी आल्यामुळे विकास आराखडा राज्य शासनाने रद्द केलेला आहे. नविन विकास आराखडा बनविण्याची प्रक्रिया चालु आहे. **WHO (World Helth Organisation)** च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे हे शहर फक्त ७ लाख ९० हजार लोकसंख्या समाऊ शकते. परंतु आजच या शहराची लोकसंख्या जवळपास १२ लाख आहे. सध्या चालु असलेल्या बांधकामांचा वेग पाहता तो लवकरच २० लाखपर्यंत जाईल. आज शहरामध्ये **MHADA, MMRDA** व पालिकेने दिलेला **TDR** यामुळे शहरामध्ये जणू क्रॉंक्रीटचे जंगलच उभे राहते आहे. विविध समस्यांनी या शहरातील नागरीक त्रासलेले आहेत.

मनपाची आर्थिक अडचणीमुळे प्राथमिक सुविधा पुरविण्यात आढाताण होत आहे. आज ४५ मी. पर्यंत सुध्दा अग्नीशमन यंत्रणा कार्यन्वित नाही. त्यासाठी जागणारा कर्मचारी वर्ग नाही. डंम्पींग ग्राऊंडचा गहन प्रश्न निर्माण झालेला आहे. पाणी पुरवठ्याबाबतीत मनपा स्वावलंबी नाही, रस्ते, नाले यांची परिस्थिती भयंकर आहे. परिवहन सेवा पूर्णपणे कोलमडलेली आहे. पालिकेची दोन रुग्णालये आहेत त्यातील टेंबा रुग्णालय निधीअभावी राज्य शासनाला देत आहोत. विविध उपचारांससाठी मुंबईला जाणा-या रुग्णांच्या मनात धकधीच भरते. मनपाच्या शाळांचा प्रश्न जटील झाल्यामुळे त्या प्रायव्हेट कंपनींना देण्याचे विचारधीन आहे. आरक्षित असलेले बगीचे आणि मैदाने मनपा ताब्यात घेवू शकत नाहीत व विकसित करु शकत नाहीत. त्यामुळे समावेशक आरक्षणाखाली विकसित करायला आपण देत आहोत.

मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र. २१४ हे बगीचासाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे या आरक्षणाचे एकूण क्षेत्र १०५०० चौ.मी. असून यापैकी १९९४ चौ.मी. इतके क्षेत्र महानगरपालिकेकडे विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातून ताब्यात मिळालेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि.०२/०५/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणेबाबत शासनाने दि.०२/०५/२०१६ अन्वये या संदर्भात नविन विनियम अंतर्भूत करण्यासाठी अंतिम मंजूरी दिलेली आहे.

सदर शासन निर्णयाप्रमाणे विषयांकित आ.क्र. २१४ (बगीचा) हे विकसीत करण्याची समुचित प्राधिकरण मिरा भाईंदर महानगरपालिका असून सदर आरक्षणाखालील जागा महानगरपालिका ताब्यात घेऊन विकसीत करु शकते किंवा जागामालकाने सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी ७०% जागा विकसीत करुन महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेनंतर उर्वरीत ३०% जागेमध्ये विकासक आरक्षणाच्या संपुर्ण क्षेत्राचा वापर करुन लगतच्या वापरामधील अनुज्ञेय बांधकाम करु शकतो.

जागा मालकाने संबंधीत बगीचा आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसीत करणेची परवानगी मागितली असून त्याप्रमाणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून बगीचा विकसीत करणेस जागा मालकास परवानगी द्यावी व जागा मालकाकडून आरक्षण विकसीत करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुद आहे का बगिचा आरक्षण समावेशक आरक्षणाखाली विकसित करण्याची?

**मा. आयुक्त :-**

एम.आर.टी.पी. ॲक्ट अधिनियम १९६६ च्या विविध तरतुदी नुसार कोणतेही आरक्षण विविध माध्यमातुन विकसित करण्याच्या अधिकार आयुक्तांचा आहे. ऑकोपिएशन मधील सुध्दा विकसित करण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत तथापी संबंधिताने आमच्याकडे प्रस्तावाची मागणी केली असती तर आम्ही त्यावर निर्णय घेतला असता तर मा. महापौरांकडे ही मागणी आली त्यांच्या अधिकारात त्यांनी तो विषय घेतलेला आहे बगीचा मध्ये साधारणतः ७० टक्के बगीचा त्यांनी आपल्याला विना मोबदला विकसीत करून दिला पाहीजे आपल्या ताब्यात दिला पाहीजे. तर त्यांच्यात ३० टक्के जागे मध्ये त्याला फेरी फेरी अनुज्ञेय विकास करता येतो तर ते प्रस्ताव वगैरे आपल्याकडे आले तर आम्ही नियमानुसार छानननी करून नियमानुसार ज्या कारवाई आहेत एम.आर.टी.पी ॲक्ट खाली आम्ही निश्चित ते करू. वास्तविक अशा प्रकारचे प्रस्ताव महासभेत घेण्याची आवश्यकता नाही असे माझे मत आहे.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातुन साधारण ३३ आरक्षण समावेक्षक आरक्षणाखाली आपण विकसीत केलेली आहेत. बऱ्याचश्या याना भोगवटा दाखला पण दिलेला नाही पण त्याच्यामध्ये कुठे बगीचा हे आरक्षण नाही आणि माझ्या माहीती प्रमाणे बगीचा हे आरक्षण आहे.परत तेच आयुक्त साहेबांचा गोषवारा नाही. महापौरांनी विषय घेतलेला आहे. महापौर मॅडम आपण विषय घेतलेला आहे.आपल्या मान्यतेने हा विषय आलेला आहे अस आम्ही समजतो. त्यामुळे ह्या ठिकाणी कुठली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचा भंग झालेला आहे असे आपल्या निदर्शनास आलेले नाही हे मला माहीत नाही कारण ह्या आरक्षणाचे अधिकार पत्र धारक सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी आहे.अशी नोंद आहे.कागदोपत्री आणि माझ्या माहीती प्रमाणे आपण त्या कंपनीचे भागीदार आहात आपले नाते वाईक त्यांचे भागीदार आहेत.

**महापौर :-**

मी त्यांची भागीदार नाही तूम्ही चुकीचे बोलु नका तुमच्या कडे काही असेल तरच बोला नाही तर बोलु नका.

**अनिल सावंत :-**

ते तर आहे म्हणुन तर मी बोलत आहे. पेपर आहेत म्हणुन मी बोलत आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे आपणाला कल्पना आहे ह्या विषयाची असे मी समजतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे जे पण तुम्हाला काही विचारायचे आहे ते विचारा.

**मा. आयुक्त :-**

मुद्दा एकच आहे महापौरांनी हा विषय घेण्याचे कदाचित त्यांचा जो उद्देश आहे.दोन प्रकारचे आरक्षण आपण विकसित करतो एक कम्पलीटली महानगरपालिका विकसीत करते आणि काही विकासकांच्या माध्यमातुन केले जाते. यावेळेस एखादे आरक्षण कम्पलीट आपण विकसीत करण्याचे मनोदय विकसीत करतो तर त्यावेळेस त्याला एक तर मार्केट मालेदा बेनिफीट दिला पाहीजे जे नविन भुसंपदानाच्या ॲक्ट नुसार किंवा त्यांना टी.डी.आर दिला पाहीजे. जर त्यांना जास्तीचे बेनिफीट न देता आहे ते टक्केवारी घेऊन जर आपण विकसीत केले तर विकसीत महापालिका करु शकतो किंवा विकासक करु शकतो मला वाटते ह्या उद्देशासाठी तुम्ही हा विषय घेतला असेल तर माझी विनंती राहील मी याच्यापुढे आयुक्तांच्या निदर्शनाखालील विषय घ्यावेत. महानगरपालिका विकसित केली कम्प्लीटली तर त्याला भुसंपादन द्यावे लागते.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब ह्या आरक्षणाचा १९ टक्के टी.डी.आर. दिलेला आहे. आरक्षणाचा त्यासाठी विकासकाने कुंपन भिंत आणि माती भरावाचे पैसे पालिकेला भरलेले आहेत. आज हे १९ टक्के आरक्षण जे आहे त्याला कुंपन भिंत माती भराव झालेले आहे का?

**मा. आयुक्त :-**

या विषयात प्रशासनाकडून तपासले जाईल.

**अनिल सावंत :-**

फक्त माहिती पाहिजे. टाऊन प्लॅनिंग देऊ शकेल ना किंवा पी.डब्ल्यु.डी. देऊ शकेल आपण जो टी.डी.आर. दिला नक्की ताकद आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

आपण ते तपासून घेऊ ह्याच मॅटरचा जो टी.डी.आर. दिला असेल............

**अनिल सावंत :-**

साहेब दिलेला आहे मी सांगतो दिलेला आहे. १९९४ चौ.मी.चा दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ती मालकी आपली झाली आहे त्याचा काही बेनिफीट दिला जाणार नाही.

**अनिल सावंत :-**

पण ते एका आरक्षणामध्ये आपण १९ टक्के टी.डी.आर. देत आहोत आरक्षणाचे दोन भाग झाले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

आरक्षणाचे दोन भाग आहेत की एकच आहे.

**अनिल सावंत :-**

एकच भाग आहे.

**मा. आयुक्त :-**

आरक्षण क्रमांक २१४ आरक्षणाचे एकुण क्षेत्र आहे. १०५०० पैकी १९९४ चौ.मी. हे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या आहेत. त्याची मालकी महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्याला कुठलीच मालेदा किंवा बेनिफीट देण्याचा प्रश्न येत नाही.

**अनिल सावंत :-**

पण पार्शली असे देऊ शकतो का पार्शली आपण समावेशक आरक्षणाखाली देऊ शकतो का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, राज्यशासनाने जे समावेशक आरक्षणातुन जे आरक्षणे विकसीत करायचे आहेत त्यासाठी जी पॉलिसी तयार केलेली आहे तो भुखंड पुर्ण निट पाहिजे त्याचे पार्शली जर महानगरपालिकेकडे आला असेल तर त्याला ते लागु होत नाही. हे आपल्या निदर्शनास आणतो.

**अनिल सावंत :-**

मग हा ठराव परत घेत आहेत की आम्ही ठराव करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सगळ्यात पहिला म्हणजे अनिल सावंतजीने जे आरोप केले तर ते मागे घ्यावेत कारण की हे सेव्हन इलेव्हन कंपनीचा नाही आहे ना महापौर मॅडमचा याच्यामध्ये भाग आहे. नंबर-१,नंबर-२,सर अजून पर्यंत आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिके मध्ये अशी भरपुर आरक्षण समावेशक आरक्षणामार्फत विकसीत झालेले आहेत. त्याची एंन्ट्री माझ्याकडे आहे. एल.बी.टी चे ऑफीस आहे साहेब त्याच्यामध्ये पण आपण ते विकसीत केलेले आहे.

**मा.आयुक्त :-**

३३ आहेत असे त्यांनी सांगीतले ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

३३ आरक्षणे आपण विकसीत पण केलेले आहेत आरक्षण फक्त त्यांच्यामध्ये नाही आरक्षण विकसीत पण केलेले आहेत. स्टार बाजार नवासिक आरक्षण बघा स्टार बाजारच्या बाजुला पार्किंगच त्याच्यामध्ये पण सेम आहे. महापालिकेच्या जागेमध्ये पण सेम आहे. महापालिकेच्या जागेमध्ये १० टक्के जागा महानगरपालिकेतर्फे होती आणि ९० टक्के जागा त्या प्राईव्हेट माणसाच्या ताब्यामध्ये होती. आणि तरी सुध्दा महानगरपालिकेने त्या स्टार बाजाराला आणि त्या पार्किंग रिझर्व्हेशनला भाड्याने दिलेली आहे. पण असे असताना मग हे का होवु शकत नाही. आपल्याकडे समजा १०-१५ टक्के जागा शिल्लक आहे

प्रिन्सिपल माझे आजच नाही शेवटच्या दिवसा पर्यंत हेच आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब ठिक आहे हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

कायद्याच्या बाहेर जाऊन आपल्याला काहीच करायचे नाही महापालिकेचे हित त्याच्यात जपला जाईल प्रोव्हाईडेड इन लॉ काही असेल तर.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्तांचे साहेब पत्र आहे माझ्या जवळ १४/०९/२०१० त्याच्यामध्ये २१४ बगीचा आरक्षण अधिकार पत्र धारक मेसर्स सेव्हन ईलेव्हन कंट्रक्शन प्रा.लि.नाव आहे.राईटिंग मध्ये मी उगाच बोलत नाही.महापौरांनी सांगीतले ठीक आहे मी ॲग्री करतो.

(सभागृहात गोधळ)

**अनिल सावंत :-**

जो टी.डी.आर दिलेला आहे तो चेंज होऊ शकत नाही दुसऱ्यांच्या नावावर जाऊ शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याचा काही संबंध नाही.

**अनिल सावंत :-**

२१४ आरक्षणाचा टी.डी.आर दिलेला आहे साहेब.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जे १९०० चौ.मी. आहे ते ऑलरेडी तुमच्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे............

**मा. आयुक्त :-**

त्यांनी टी.डी.आर दिल्याच राहीलेल्या भागाचा प्रस्ताव आणलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच्या ठरावात आम्ही क्लेअर केलेले आहे १०,५०० एकुण क्षेत्रफळ आहे आणि फक्त १९९४ क्षेत्रफळ हे महानगरपालिकेकडे निवास हस्तांतरणाच्या माध्यमातून आलेले अहे. तर ते सेव्हन इलेव्हनचे असु शकते ना. पण उरलेले दुसरे दुसऱ्याचे आहे ना.

**अनिल सावंत :-**

साहेब १९९४ चौ.मी.जो टी.डी.आर दिलेला आहे त्यातला २९५.७५ चौ.मी.टी.डी.आर सेव्हन इलेव्हन कंन्ट्रक्शन प्रा.लि.ला दिलेला आहे हे माझ्याकडे डॉक्युमेंन्टस आहेत.

(सभागृहात गोधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब टोटल चौ.मी. १०,५०० आहे आणि १९९४ हे आपल्या ताब्यामध्ये आलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

१९०० बदलच त्यांनी डीलीटच केलेले आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्याध्ये तो म्हणतो ना सेव्हन इलेव्हनचे नांव नाही आहे म्हणुन मी उल्लेख केला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब विषय असा आहे की १९९४ चौ.मी. हे महानगरपालिकेचे आहे सेव्हन इलेव्हनचा संबंध नाही.

**जुबेर इनामदार :-**

म्हणुन म्हणतो गोषवारा येऊ द्या. आपल्या विषय पत्रिकेवर काय दिलेले आहे फक्त आरक्षण दिलेले आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन भरपुर आरक्षणे विकसित झालेली आहेत.

अनिल सावंत :-

हरकत नाही पण उरलेले आरक्षण त्याचे अधिकार पत्र धारक कोण आहेत तेवढे तरी सांगा.

ध्रुवकिशोर पाटील :-

एक्स वाय झेड कंपनी आहे सांगायची गरज काय आहे.

अनिल सावंत :-

**भाईंदर (पू.) मौजे गोडदेव आरक्षण क्र. २१४ (बगीचा) आरक्षण समावेश आरक्षणाच्या माध्यमातून विकसित करण्याकरीता मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव या महासभेपुढे आहे. या विषयाला प्रशासनाच गोषवारा नाही. गोषवारा नाही म्हणजे हा आशासकीय प्रस्ताव असून मा. महापौरांनी आपल्या अधिकारात तो घेतलेल्या आहे. मा. महापौरांचा तो अधिकार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका विकास नियामक नियमावलीमध्ये समावेशक आरक्षणाखाली बगीचा विकसित करण्याची तरतुद नाही. बगीचा विकसित करणे हे मनपाची जबाबदारी व मालकी असून यापूर्वी कोणत्याही आपल्या वा इतर कोणत्याही महापालिकेत असा प्रस्ताव पारित झालेला नाही. विशेष म्हणजे या आरक्षणाचे अधिकारपत्र धारक असलेली कंपनी (सेव्हन इलेव्हन कं. प्रा.लि.) एका लोकप्रतिनिधीच्या मालकीची आहे. या कंपनीचा इतिहास समावेशक आरक्षण विकसित करुन पालिकेची जागा हस्तांतरण करण्याबाबत भुषणावह नाही. गेली ५ वर्ष समावेशक आरक्षणाखली रुग्णालय विकसित करुन मनपाला जागा हस्तांतरीत केलेली नाही. शिवाय ५ वर्षे पालिकेला करही भरलेला नाही. पालिकेच्या सुविधा मात्र घेतल्या. यासाठी समाजसेवकांना उपोषण, लोकायुक्त यांच्याकडे तक्रार, न्यायालयीन लढाई या सारखे उपाय करावे लागले. वृत्तपत्रांनी आवाज उठवला तरीसुध्दा अजून मनपाला त्यांची जागा हस्तांतरीत झालेली नाही आणि विशेष म्हणजे समावेशक आरक्षणाखला महापालिकेला जागा विकासकाने हस्तांतरीत न केल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव भाजपानेच पारित केलेला आहे.**

**या आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ १०५०० चौ. मीटर असून १९९४ चौ.मी. मनपाच्या ताब्यात आहे. त्यासाठी रु. ११९२१३.०० कुंपण भिंतीसाठी व माती भरावासाठी रु. १२६६६२.०० विकासकाने पालिकेला जमा केलेले आहेत. मनपाने त्याचा टी.डी.आर. ही दिलेला आहे. म्हणजे हे आरक्षण १९ टक्के पालिकेच्या ताब्यात आहे. अधिकार पत्रधारक कंपनीमध्ये मा. महापौर व त्यांचे नातेवाईक भागीदार आहेत.**

**तरी बगीचा विकसित करणे ही पालिकेची जबाबदारी असून उरलेली जागा पालिकेने त्वरीत ताब्यात घेवून बगीचा विकसित करावा असा मी ठराव मांडत आहे.**

हरिश्चंद्र आमगांवकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३३ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक डॉ. प्रिती पाटील अनुमोदन श्रीम. हेतल परमार दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत अनुमोदन हरिश्चंद्र आमगांवकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. अनिल सावंत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक प्रिती पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाहीत

मा. महापौर :-

श्रीम. प्रिती पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ५४ विरोधात २७ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहे. श्रीम. प्रिती पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर.

प्रकरण क्र. ३३ :-

**भाईंदर (पु.) मौजे गोडदेव आरक्षण क्र.२१४ (बगीचा) हे आरक्षण समावेशक आरक्षण माध्यमातून विकसीत करणेकरीता मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ३४ :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र. २१४ हे बगीचासाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे या आरक्षणाचे एकूण क्षेत्र १०५०० चौ.मी. असून यापैकी ११९४ चौ.मी. इतके क्षेत्र महानगरपालिकेकडे विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातून ताब्यात मिळालेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि.०२/०५/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणेबाबत शासनाने दि.०२/०५/२०१६ अन्वये या संदर्भात नविन विनियम अंतर्भूत करण्यासाठी अंतिम मंजूरी दिलेली आहे.

सदर शासन निर्णयाप्रमाणे विषयांकित आ.क्र. २१४ (बगीचा) हे विकसीत करण्याची समुचित प्राधिकरण मिरा भाईंदर महानगरपालिका असून सदर आरक्षणाखालील जागा महानगरपालिका ताब्यात घेऊन विकसीत करु शकते किंवा जागामालकाने सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी ७०% जागा विकसीत करुन महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेनंतर उर्वरीत ३०% जागेमध्ये विकासक आरक्षणाच्या संपुर्ण क्षेत्राचा वापर करुन लगतच्या वापरामधील अनुज्ञेय बांधकाम करु शकतो.

जागा मालकाने संबंधीत बगीचा आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसीत करणेची परवानगी मागितली असून त्याप्रमाणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून बगीचा विकसीत करणेस जागा मालकास परवानगी द्यावी व जागा मालकाकडून आरक्षण विकसीत करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. प्रिती पाटील** **अनुमोदक :- श्रीम. हेतल परमार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १० | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | सौंस नीला बर्नाड | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | रावल मेघना दिपक | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | मोकाशी दिपाली आनंदराव | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | अरोरा दिपीका पंकज | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | नाईक विविता विवेक | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | परदेशी गिता हरीश | |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | शेख अमजद गफार |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | पाटील वंदना विकास |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २५ | अहमद साराह अकरम |
| २६ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २६ | बगाजी शर्मिला विन्सन्ट |
| २७ | म्हात्रे मोहन गोपाळ | २७ | बांड्या एलायस दुमिंग |
| २८ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| २९ | शेट्टी अरविंद आनंद | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | |
| ३१ | तिवारी अशोक सूर्यदेव | | |
| ३२ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | |
| ३३ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | |
| ३४ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| ३५ | रकवी वैशाली गजेंद्र | | |
| ३६ | कांगणे मीना यशवंत | | |
| ३७ | परमार हेतल रतिलाल | | |
| ३८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |
| ४० | म्हात्रे नयना गजानन | | |
| ४१ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ४२ | थेराडे संजय अनंत | | |
| ४३ | राय विजयकुमार सिस्थल नारायण | | |
| ४४ | जैन राजेंद्र भवरलाल | | |
| ४५ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ४६ | जैन दिनेश तेजराज | | |
| ४७ | गजरे दौलत तुकाराम | | |
| ४८ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | |
| ४९ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | |
| ५० | दुबे मनोज रामनारायण | | |
| ५१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | |
| ५२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | |
| ५३ | भोईर गणेश गजानन | | |
| ५४ | पारधी सुजाता यशवंत | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र ३४, **मुख्य अग्निशमन अधिकारी पद तातडीने भरणेबाबत.**

राकेश शहा :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असुन शहराच्या सुरक्षिततेकरिता सतत कार्यरत असते. अग्निशमन विभागातील "**मुख्य अग्निशमन अधिकारी**" हे पद महनगरपालिकेच्या आकृती बंधात एकच पद मंजुर असल्याने एकाकी पद आहे. अग्निशमन विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद अजतागायत रिक्त आहे.

महापालिकेने सेवाप्रवेश नियम तयार करुन शासनाकडे पाठविले होते. तसेच मा. संचालक सो. महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी निर्देशित केलेले सेवाप्रवेश नियम देखील शासन मान्यतेकरीता प्रस्तावित आहेत. परंतु सदर प्रस्तावित नियमांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन मा. संचालक सो. यांच्या शिफारसी घेवून पदोन्नती देणेबाबत कळविले आहे.

शहराची वाढती निवासी संकुलने, उंच इमारती व दैनंदिन घटनांचा विचार करता महापालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी मुख्य अग्निशमन अधिकारी असणे आवश्यक आहे. महापालिकेने शासनास पाठविलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये सदरचे पद एकाकी असल्यामुळे पदोन्नतीने भरता येईल असे शासन निर्णयात नमुद आहे.

"**मुख्य अग्निशमन अधिकारी**" अर्हताधारी अधिकाऱ्याची नियमीत नियुक्ती करणेकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग दोन-संकीर्ण सुचना व जाहिराती यामधील नियम ३(५)(ख) नुसार एकाकी पद भरणेकरिता अवलंबावयाच्या कार्यपध्दती नुसार तसेच शासन निर्णय क्र.अशस १४०७/३९५/प्र.क्र.११७/०७/नवि-२४ मंत्रालय मुंबई, दि.०७/०२/२००८ अन्वये शासन निर्णयानुसार कार्यवाही पार पाडुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या **मुख्य अग्निशमन अधिकारी** पदावर सध्या मनपा आस्थापनेवर प्रभारी काम पाहणारे **श्री. प्रकाश शंकर बोराडे** हे लायक उमेदवार असून त्यांनी मनपा प्रशासनाकडे अर्ज करुन या पदाला लागणारी सर्व अर्हता धारण केल्याची कागदपत्रे जोडली आहेत. शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी पद पदोन्नतीने भरता येईल या बाबीचा विचार करुन संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, यांचेकडून शिफारस घेवून **श्री. प्रकाश शंकर बोराडे** यांची पदोन्नतीने नियुक्ती करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगिने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मुख्य अग्निशमन अधिकारी हे वर्ग-१ दर्जाचे पद मंजुर आहे शासनाने जे सेवा शर्ती नियम अंतीम केलेले आहेत त्यामध्ये या पदाच्या अहर्ता अग्निशमन संचालक यांच्याकडून अंतिम करुन घ्यावेत अस आहे. आणि ह्या सेवा शर्तीने मंजुर होऊन बरेच दिवस झालेले आहेत परंतु ह्या पदाच्या अहर्ता निश्चित न झाल्यामुळे हे पद अद्याप भरण्यात आलेले नाही मी रूजु झाल्यानंतर ठाणे महानगरपालिका,नवी मुंबई महानगरपालिका आणि इतर महानगरपालिकांच्या वर्ग-१ मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याचा अर्हता मागविलेल्या आहेत लेखी स्वरूपात त्यांना विनंती करून आणि तसेच संचालक अग्निशमन म्हणजे डायरेक्टर फायर यांना सुध्दा विनंती केलेली आहे की आम्हाला ह्या अर्हता तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात. आणि ते अंतिम टप्यात आहे. आणि मला सुध्दा तांत्रिक पद हे करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे हे तांत्रिक पद आणि एकाकी पद असल्यामुळे रितसर ॲप्लीकेशन काढुन मागवुन ते भराव लागेल त्यात हे कार्यरत अधिकारी भाग घेऊ शकतात नॉमिनेशन करू शकतात त्यांची अहर्ता पूरवू शकतात आणि त्या कमिटी समोर हे अंतिम केले जाईल सदर पदोंन्नतीने हे पद भरता येते की नाही मला तपासावे लागेल.

**मा.महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर।

**प्रकरण क्र.३४:-**

**मुख्य अग्निशमन अधिकारी पद तातडीने भरणेबाबत.**

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असुन शहराच्या सुरक्षिततेकरिता सतत कार्यरत असते. अग्निशमन विभागातील "**मुख्य अग्निशमन अधिकारी**" हे पद महनगरपालिकेच्या आकृती बंधात एकच पद मंजुर असल्याने एकाकी पद आहे. अग्निशमन विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद अजतागायत रिक्त आहे. महापालिकेने सेवाप्रवेश नियम तयार करुन शासनाकडे पाठविले होते. तसेच मा. संचालक सो. महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी निर्देशित केलेले सेवाप्रवेश नियम देखील शासन मान्यतेकरीता प्रस्तावित आहेत. परंतु सदर प्रस्तावित नियमांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन मा. संचालक सो. यांच्या शिफारसी घेवून पदोन्नती देणेबाबत कळविले आहे.

शहराची वाढती निवासी संकुलने, उंच इमारती व दैनंदिन घटनांचा विचार करता महापालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी मुख्य अग्निशमन अधिकारी असणे आवश्यक आहे. महापालिकेने शासनास पाठविलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये सदरचे पद एकाकी असल्यामुळे पदोन्नतीने भरता येईल असे शासन निर्णयात नमुद आहे.

"**मुख्य अग्निशमन अधिकारी**" अर्हताधारी अधिकाऱ्याची नियमीत नियुक्ती करणेकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग दोन-संकीर्ण सुचना व जाहिराती यामधील नियम ३(५)(ख) नुसार एकाकी पद भरणेकरिता अवलंबावयाच्या कार्यपध्दती नुसार तसेच शासन निर्णय क्र.अशस १४०७/३९५/प्र.क्र.११७/०७/नवि-२४ मंत्रालय मुंबई, दि.०७/०२/२००८ अन्वये शासन निर्णयानुसार कार्यवाही पार पाडुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या **मुख्य अग्निशमन अधिकारी** पदावर सध्या मनपा आस्थापनेवर प्रभारी काम पाहणारे **श्री. प्रकाश शंकर बोराडे** हे लायक उमेदवार असून त्यांनी मनपा प्रशासनाकडे अर्ज करुन या पदाला लागणारी सर्व अर्हता धारण केल्याची कागदपत्रे जोडली आहेत. शासन निर्णयानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी पद

पदोन्नतीने भरता येईल या बाबीचा विचार करुन संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, यांचेकडून शिफारस घेवून **श्री. प्रकाश शंकर बोराडे** यांची पदोन्नतीने नियुक्ती करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र ३५ **मालमत्ता हस्तांतरण केल्यावर मालमत्तेस नविन दराने कर आकरणी करणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

प्रकरण क्र ३५ मा. महापौर मॅडम हा प्रस्ताव तुम्ही मागे घ्यावा.

**मा. महापौर :-**

हा ठराव मागे घेण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद महापौर मॅडम शहराच्या हिताच्या दृष्टीने आपण हा ठराव मागे घेतला यासाठी मी पत्रकारांचे सुध्दा धन्यवाद देईन त्यांनी सुध्दा ह्या विषयाला वाचा फोडली आणि त्याची आपण दखल घेतली.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र ३६ "ज" प्रस्ताव - **सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक ०७/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. — मिरा भाईंदर महानगरपालिका बेकायदा / विधीग्राह्य नसलेली उद्यान व वृक्ष प्राधिकरण समिती बरखास्त करणेबाबत व दि. ११ ते १७ एप्रिल २०१८ कालावधीमध्ये सदर समितीच्या नैनीताल अभ्यास दौऱ्यावरील खर्चाची मंजुरी देणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन खर्चाची वसुली करणेबाबत.**

**मदन उदितनारायण सिंग :-**

**सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम आप यह बताईये की आप यहा पर बैठी है नियम कानुन के विरूध्द महापौर मॅडम यह "ज" का प्रस्ताव जिस विषय में आया है इसकी जानकारी दिये बिना प्रस्ताव फेटाळणा ठिक नही है, यह विषय क्युं आया है क्युंकी वृक्ष प्राधिकारण समिती जो बनी है और बेकायदेशीर है,ऐसा नियम में लिखा हुआ है ट्री ॲथोरीटी ॲक्ट में है की, जो भी समिती बनाई जाती है वृक्षप्राधिकारण समिती उसमें मिनीमम ५ मेंबर मॅक्झीमम १५ मेंबर होते है जिसके अध्यक्ष मा. आयुक्त साहब होते है उसके बाद जो १४ होते है उसके जो दो मेंबर ........

**राकेश शहा :-**

मा. महापौर मॅडम विषय फेटाळलेला आहे मग चर्चा कशाला.

**स्नेहा पांडे :-**

प्लीज महापौर मॅडम मैं आयुक्त साहबसे बात कर रही हुँ तो बीच में कोई बोले नही ऐसी मेरी रिकवेस्ट है

**मा. महापौर :-**

आप दो मिनट बोलीये. आपको जो भी माहीती चाहीए आपको लिखीत दि जायेगी.

**स्नेहा पांडे :-**

माहिती लिखीत दि जायेगी लेकीन आप लोग वहा पर सत्ता में बैठे है.

**मा. महापौर :-**

आपका जो विषय है वह बोलीये मेंने आपको दो मिनिट बोलने की संधी दी है.

**स्नेहा पांडे :-**

आप इस नगरपालिका में पिठासीन अधिकारी है कोई भी गलत कमिटी फॉर्म हूई है तो............

**मा. उपमहापौर :-**

आप अपने विषय पे बोले.

**स्नेहा पांडे :-**

ॲक्शन लेना आपकी जिम्मेदारी है इसलिये आपको लाने दे रहे है १४ मेंम्बर जो वृक्ष प्राधिकारण के रहते है उसमेंसे १२ नगरसेवक और दो मेंम्बर बाहरसे लिए जाते है ओ एन.जी.ओ से नॉमिनेट होते है यानी ॲग्रीकल्चरल और हर्टिकल्चरल एक्सपर्ट रहते है,तो अपनी वृक्ष प्राधिकरण समिती में नाही कोई ओ एन.जी.ओ से मेंम्बर लिया गया है नाही कोई हर्टिकल्चरल एक्सपर्ट है. इसलिए यह कमिटी बेकायदेशीर है ऐसा मेने आपके साक्ष के लीए ऐसा बताऊ की ठाणे महानगरपालिका में ऐसी ही कमिटी बनाई गई थी जिसे हायकोर्ट ने बरखास्त किया है मेरे पास कोर्ट का ऑर्डर है।

**मा.महापौर :-**

ठिक है आपको सब माहिती लिखीत में दि जायेगी.

**स्नेहा पांडे :-**

मुझे इसमें माहीती नही चाहीये मुझे आयुक्त साहब को बोलना है की यह वृक्ष प्राधिकरण समिती जो गठीत हुई है यह बेकायदेशीर है इसके लिए इसके अभि तक जो भी............

**मा. आयुक्त :-**

बेकायदेशीर आहे असे म्हणता येत नाही त्या समिती मध्ये तांत्रिक सदस्य भरले नाहीत असे आपण म्हणु शकता.

**स्नेहा पांडे :-**

पुर्ण नगरसेवक तुम्ही घेऊ कसे शकतात?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, वृक्षप्राधिकरण समितीमध्ये ५ ते १५ सदस्य आणि काही तांत्रिक सदस्य नेमणे बंधनकारक आहे तांत्रिक सदस्याची संख्या ५ ते १५ पेक्षा जास्त असु नये काही सदस्य आणि काही तांत्रिक सदस्य.

**स्नेहा पांडे :-**

दोन तांत्रिक सदस्य.

**मा. आयुक्त :-**

त्यांची संख्या निश्चित नाही पण घ्यायला पाहिजे आणि या पुढची जी समिती गठीत होईल त्यापध्दतीने निश्चित केले जाईल आणि राहिलेला समितीमध्ये किती सदस्य निश्चित केले होते आणि किती भरले ते तपासले जाईल.

**स्नेहा पांडे :-**

ठाणे महानगरपालिका की कमिटी हाय कोर्ट डिसाइड करती है। हायकोर्ट का निर्णय है, तो अपने को भी मानना पडेगा महानगरपालिका क्या हायकोर्ट के उपर है क्या?

**मा. उपमहापौर :-**

स्नेहा पांडे मॅडम, तुम्हाला उत्तर दिलेले आहे तुम्हाला अपेक्षित जी गोष्ट होती की त्या समितीमध्ये जे सदस्य घेतले ते चुकीच्या पध्दतीचे आहेत ह्या संदर्भात तुम्ही तुमचे म्हणणे मांडलेले आहे सभागृहामध्ये हा विषय फेटाळण्यात आलेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

फेटाळण्यात येत आहे हा तुमचा अधिकार आहे. मला माहितच होतं फेटाळण्यात येणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्या विषयाची दखल मा. आयुक्त साहेबांनी घेतलेली आहे.

**स्नेहा पांडे :-**

हायकोर्टामधून फेटाळला आहे डिसॉल्व्ह केलेला आहे जर ठाणे कमिटी......

**मा. आयुक्त :-**

मा. उच्च न्यायालयाचे आदेश आणि ठाणे महानगरपालिकेच्या संबंधीत त्या बाबी सुध्दा तपासून घेतल्या जातील.

**प्रकरण क्र. ३६ :-**

**सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक ०७/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका बेकायदा / विधीग्राहय नसलेली उद्यान व वृक्ष प्राधिकरण समिती बरखास्त**

करणेबाबत व दि. ११ ते १७ एप्रिल २०१८ कालावधीमध्ये सदर समितीच्या नैनीताल अभ्यास दौऱ्यावरील खर्चाची मंजुरी देणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन खर्चाची वसुली करणेबाबत.

**ठराव क्र. ३६ :-**

**सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.**

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३७, **सन्मा. सदस्य श्री. जुबेर अ. इनामदार यांचा दिनांक १२/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या माध्यमातून मिरा भाईंदर शहरात सुरु असलेल्या रुग्णालयात गरजु रुग्णांना नि:शुल्क उपचार उपलब्ध करुन देणेबाबत.**

**रिटा शाह :-**

प्रकरण क्र. ३७ च्या ठरावाचे वाचन केले.

**सुनिता भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

पुर्ण सभागृहाला माझा प्रस्ताव आहे माझा ठराव आहे मी मांडणार पुर्ण सभागृहाला सभागृह नेते साहेब, माझी एक विनंती आहे हा विषय राजकीय नाही शहराच्या निगडीत आहे. ज्वलंत आहे आणि लोकहिताचा आहे मी याच्यामध्ये राजकारण करायला उभा नाही मला राजकारण करायचं नाही हा महत्वाचा विषय मी इथे मांडत आहे तुम्हाला पटलं तर याला बहुमतांने अनुमती द्या केलेला ठराव तुम्ही मागे घेऊ शकता साहेब विषय असा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये दोन रूग्णालय अस्तित्वात आहेत. एक आहे पंडित भिमसेन जोशी जुना रूग्णालय टेंबा बांधला आणि दुसरा इंदिरा गांधी रूग्नालय मिरा रोड एकूण या दोन्ही रूग्णालयामध्ये ह्या शहराच्या निम्यापेक्षा जास्त लोक आहेत त्याचा लाभ घेत आहेत आणि तो खरा गौरवाचा विषय आहे आपण त्यांना तेवढा लाभ देऊ शकतो आणि आरोग्य विभागाला साहेब त्याची तुम्ही पाठ थोपटली पाहिजे की, खरोखर चांगला काम बरेच अडचणी सुध्दा ते करीत आहे कारण डॉक्टर मिळत नाही कारण महानगरपालिकेच्या हॉस्पीटलमध्ये त्यांना पाहिजे तितका त्यांना त्याचा मोबदला मिळत नाही म्हणून तो येत नाही साहेब हे सगळे काही परिस्थिती असतांना सुध्दा आपण ह्या शहरामध्ये काम करतो विषय असा आहे ह्या शहराची लोकसंख्या १२ ते १५ लाखापर्यंत पोहोचलेली आहे मा. महापौर मॅडम १२ ते १५ लाखाच्या जनसंख्येमध्ये १० ते २० टक्के मला फक्त वाटते अशी लोक आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती त्यांची क्षमता आहे की, ते खाजगी रुग्णालयामध्ये जाऊ शकता साहेब बाकीची जी लोकसंख्या आहे ती मध्यम वर्गीय किंवा त्यांच्याहून खाली दुर्मिळ काळातील लोक आहेत साहेब याच्या पुरावा आपल्याकडे आकडेवारीचा पुरावा अशा प्रकारे देवू शकतो साहेब ह्या एप्रिल १७ ते १८ मार्च ह्या एका वर्षाच्या कालावधीमध्ये बाह्य रूग्ण हा ओ.पी.डी. चा आपल्याकडे माध्यम असतो. लोकांना सुविधा पुरवितांना साहेब पाच लाख सोळा हजार लोकांनी रुग्णालयाचा लाभ घेतलेला आहे. मिरा रोडमध्ये सात हजार हे त्याच कालावधी मध्ये याचा अर्थ मिरा रोडमध्ये महानगरपालिका कुठे तरी चांगले काम करित आहे. नाही करत तसे नाही कारण लोकांचा तेवढा प्रभाव त्या बाजुला आहे. साहेब १० ते १२ लाखाच्या जनसंख्येबाबत कमीत कमी हा ......

**मा.आयुक्त :-**

५ लाख १६ हजार दोन्ही दवाखान्याचा आहे की.....

**जुबेर इनामदार :-**

पंडित भिमसेन जोशी रूग्णालयाचा ५ लाख १६ हजार हा आकडा मला प्रशासनाने दिला आहे ७ हजार मिरा रोडचा याचा अर्थ कमीत कमी ०५.७५ लाख म्हणजे ह्या जनसंख्येच्या निम्मे जी लोकसंख्या आहे ती आज आपल्या रूग्णालयाचा फायदा होत आहेत. याचा अर्थ साहेब कुठे तरी आपल्याला त्यांच्या कडे बघायला पाहीजे त्या आशेच्या नजरेने आपल्याकडे बघत आहेत.मी हा मुद्दा जाणीव पुर्वक इथे आणलेला आहे.आज जीवनाच्या चळवळी मधुन लोकांचे बरेच काही हाल झालेले आहेत रक्त दाब,मधुमेह

... जगण्याचा प्रयत्न करतो खाजगी रूग्णालयामध्ये जाऊ शकत नाही त्याची आर्थीक परिस्थिती चांगली नाही. म्हणुन तो महानगरपालिकेच्या रुग्णालयात येतो साहेब ब्लड प्रेशर मुळे हार्टअटॅक वगैरे हा जो प्रकार मेडीकल टर्म मधला विषय झाला त्या मध्ये बरेच रोगी रक्त दाब आणि डायबेटीस हा किडणी विकार म्हणजे मूत्रपिंड विकार सर्वात जास्त ऐकण्यात येतो त्याला दुसरा कुठला पर्याय नाही. तो दोषी झाल्यानंतर मुत्रपिंड किंवा ट्रान्स्फर करावा लागतो किंवा तो रोगी डायलेसीस हा एक, त्यांच्यासाठी शेवटचा उपचार जितके वर्ष जगेल तितके वर्ष त्यांनी तो डायलेसीस करत रहायच हा डायलेसीस चा विषय असा राहीलेला आहे साहेब खाजगी रुग्णालयांमध्ये २,२००,२५०० त्यांच्या रुग्णालयाचा स्टेटस प्रमाणे ते त्याला चार्जेस लावतात नगरपालिकेच्या रुग्णामध्ये साहेब आम्ही फक्त १५० रु. घेतो जास्त घेत नाही.तरी गेल्या वर्षा मध्ये ३७८१ लोकांनी फक्त मिरा रोड कारण टेंबा रुग्णालय पंडीत भिमसेन जोशी रुग्णालयामध्ये डायलेसीसचे मशीन अजुनपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.आरोग्य विभागाकडुन घेतलेल्या माहीती नुसार असे सांगण्यात आले की याच्या आधी ह्या सभागृहाने निर्णय घेतला होता की,खाजगी संस्थेकडून डायलेसीस मशीन उपलब्ध करून दिल्या जातील ती खाजगी संस्था आली किंवा नाही आली त्याचा काही उल्लेख नाही किंवा त्याची माहीती नाही राज्यशासन ते घेणार म्हणूत आम्ही ती डायलेसेस मशीन बसवले नाही.केलेल्या ऑर्डर केलेल्या मशीन आम्ही मिरा रोड मध्ये स्थलांतरीत केले कारण मिरा रोड मध्ये असे प्लांट १० मशीनचा लावलेले आहेत.ते डायलेसीस मशीनला लागतो साहेब अशा प्रकारे त्या ७ मशीन कार्यरत आहेत त्याच्या मध्ये आमदार मुझफर साहेबांनी सुध्दा त्यांचे एम.एच.ए फंड मधुन ५ मशीन दिल्या होत्या नादुरूस्त झाल्या त्याच्या जागी नवीन आल्या अजुन तीन मशीन तिथे लावु शकतो साहेब एवढी क्षमता आहे आणि परिस्थिती अशी आहे की, स्लॉट्स अॅव्हेलेबल नाही कारण एका मशीनला ४ तास जातात दिवसभरामध्ये मॅक्झीमम एक मशीन ३ ते ४ रूग्ण उपचार घेऊ शकतात.अशा परिस्थितीत साहेब आपल्याला डायलेसीस मशीन जास्त लावणे गरजेचे आहे. दुसरे महापौर मॅडम,१५०रू फक्त शुल्क आकारतो खरी परीस्थिती मॅडम आपल्याकडे खरोखरच आर्थिक परिस्थिती चांगली नाही तो माणुस तो रोगी फक्त महानगरपालिकेच्या रूग्णालयाच्या डायलेसीस सेंटर मध्ये जाईल आठवड्यामध्ये ३ ते ४ वेळा डायलेसीस घ्याव्या लागतात त्याच्याकडे तेवढे पैसे नसतात आणि मला खात्री आहे तिथे बसलेल्या प्रत्येक लोकप्रतिनिधीकडे तो माणूस जात असेल कधीना कधी त्यांच्या प्रभागातला की हे मला तुम्ही निशूल्क करून द्या.आम्ही साहेब प्रत्येकाला राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये हा विषय करून घेण्याचा सत्ता बदलली शासन बदलली नाव बदलला मात्र आपल्या महानगरपालिकेला त्याचा लाभ घेता आला नाही त्याचे काय तांत्रिक अडचण आहे ती मला माहिती नाही. मात्र साहेब ३६८१ रूग्ण फक्त ४ हजार होतील १५० रू. प्रमाणे ५.५० लाख रू.याच्या पलिकडे नाही कोटी मध्ये महानगरपालिकेमध्ये कामकाज चालतो त्यापासुन काय काय अनेक दुसरे काही काम होतात तुम्हाला मला इथे सभागृहामध्ये सांगायची आवश्यकता नाही.मात्र अशा परिस्थितीत आम्ही ह्या शहराच्या गोरगरीबांना ५ ते १० लाख रू. मदत करू शकत नाही असे तर मला वाटत नाही. म्हणुन हा विषय मी जाणुन बुजुन आणलेला आहे.महापौर मॅडम मी ठराव वाचणार आहे तुम्हाला योग्य वाटल तर आजपासुन कारवाई करावी .........

**मा. आयुक्त :-**

फक्त डायलेसीस मशीनचा तुमचा प्रस्ताव आहे की ऑल ओ.पी.डी. साठी?

**जुबेर इनामदार :-**

साहेब माझ डायलेसीस साठी.............

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब अस आहे की,सभागृहामध्ये तुम्ही खुप मोठे मन दाखवलत की मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातुन चालवली जाणारी हॉस्पिटल ही चांगल काम करत आहे. त्या सोबत ही महानगरपालिका ८ विभागीय सेंटर चालवत आहे आणि त्यालाही खुप चांगला रिस्पॉन्स आहे मुळात हा विषय अत्यंत महत्वाचा आहे त्यामुळे सन्मा.नगरसेवक रिटाजींनी जो ठराव मांडला तो तुम्ही ऐकुण घेतला नसेल की हा विषय महत्वाचा आहे. आणि प्रशासनाकडून पुर्ण माहिती घेवुन आपण हा विषय सभागृहासमोर आणणार आहोत याच्यामध्ये डायलेसिसचा विषय आमच्या गटनेत्यांची मिटींग झाली त्याच्यामध्ये त्यांनी चर्चा केली त्यावेळी आपण ठरवलेले की ३.५०हजार चार हजार रूग्ण

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम तुम्हाला या विषयामध्ये मी ठराव केला त्यांनी ठराव केला..........

**मा. आयुक्त :-**

एकच मुद्दा उपमहापौर साहेब जे मांडले ते मी मांडतो महापौर मॅडमच्या अनुमतीने आपल्याकडे ८ मशीन आहेत एक ऑपरेशन मध्ये कमी जास्त असेल

**जुबेर इनामदार :-**

७ आहेत साहेब.

**मा. आयुक्त :-**

८ आहेत साहेब ७ ऑपरेशन मध्ये आहेत आणि ते एक सुध्दा आपण चालु करून घेऊ आणि दुसरे आपण ३ मशिन घेण्याचे नियोजन आहे ते लवकरात लवकर ३ जास्तीचे आपण घेऊ. त्याशिवाय आपल्याकडे १० आरोग्य केंद्र आहेत आणि आपल्याला माझे परवा जॉईंट झाल्या नंतर दोनदा बैठका झाल्या आपल्या लोकसंख्येप्रमाणे एरिया प्रमाणे अजुन ७ आरोग्य केंद्र आपण येणाऱ्या काळात लवकरात लवकर चालु करु आणि आपला जो विषय आहे उपमहापौर साहेबांनी जे ठेवलेले आहे त्या प्रमाणे त्याला एक सविस्तर अभ्यास करून पुढच्या सभेत आपण तो विषय ठेवू त्याच्यावर निर्णय घ्या.

**राजेंद्र जैन :-**

आदरनिय महापौर मॅडम जुबेर साहेब ने अपणे पास मे टेंबा और ईंदिरा गांधी मिरा रोड में तीसरा अशासकीय जैसे की महानगरपालिका में एफ.एस.आय. दे के कुछ उन्हे सिस्टम दिये की आपण उनकी सेवा करो मैं बात करता हूँ ओकार्ट जंहापर ४० टक्के रिर्झव्हेशन की प्रावधान की गई थी १० टक्का कमिशनर के पावर से १० टक्का शासकिय कर्मचारी और २० टक्के बी.पी.एल. और ई.डब्लू.एस यह २००२ २४ तारिख को नगररचना मे प्रस्ताव पास किया २४-२ को और २५-२ २०१०मे यह नगररचनाका जो आश्वासन था वह प्रस्ताव किया १० टक्के कमिशनर की पॉवर बोली कमिशनर ने वापस दे दिया.............

(सभागृहात गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

यहां पर अभितक कमिशनर ने इतना बडा फॅसिलिटी ३ गुना एफ.एस.आय.दिया इस शर्त पर की,कमिशनर के पॉवर से १० टक्के बेड उधर फ्री मिलेंगे आज तो कोई जाहिरात नही वहा पे कोई सेक्शन नही कोई सुनता नही उसके बाद मे कल परसो की बात है ई.डब्लु.एस यहा पे समाज को यह मालुम नही की ई.डब्लु.एस होता क्या है अभी तक ८ साल तक ना कमिशनर पॉपर युज किया मेरे पास २०१२ का लेटर है मैंने सन २०१२ में लिख के पुछा था की ह्या हमने जो बेड दि उसका युज कर रहा है झिरो आन्सर अभी शासकीय कर्मचारी का लिखा ॲग्रिमेंन्ट,शासकिय,अशासकिय,केंद्रिय,सरकारी,पंचायती,कनिष्ठ कर्मचारी वह भी डिसाईड नही किया ॲग्रिमेंट के अंदर यह अग्रिमेंट रिव्ह्युव करना चाहिऐ रिव्ह्युव करके संचालक से रिपोर्ट मांगना चाहिऐ बेड दिया पर बेड के साथ मे हार्ड सर्जरी का पैसा पुरा लिया इनव्हेस्टिगेशन पुरा लिया कंन्सलटंन्टने पुरा लिया कितना फ्री किया और २० टक्के बोला बंधनकारक है

(सभागृहात गोंधळ.)

**राजेंद्र जैन :-**

जब इन्होने बोला गरीब लोग ऐसा सारी बाते किया फायनान्शियली इन्होंने कुछ सोचा है इनकी सोच में समझाता हूँ हम इंदिरा गांधी का मिरा रोड पे कितना खर्चा कर रहे है और कुल खर्चा कितना पहले वह डेटा निकाल लिजीए की इतनी सर्व्हिस करनी है वह निकाल लिजीए उसके बाद में आप प्राइव्हेट देके उसका पैसा इन्शोरंन्स देके वह कव्हर करवा सकते है यह कितने अस्पष्ट है।

(सभागृहात गोंधळ.)

**मा. आयुक्त :-**

दोन्ही मुद्यांबाबत खुलासा करतो सन्मांननिय महापौर महोदय सन्मांननिय सदस्य ज्यांनी ह्या ठिकाणी डायलेसिसच्या बाबतीत जे आपण १५० रू फी घेत आहोत त्याबाबतीत त्यांचा प्रस्ताव ह्या ठिकाणी मांडलेला आहे. त्या अनुषंगाने आलेल्या चर्चेमध्ये शेवटच्या बाकावर बसलेले आमचे सन्मांननिय सदस्य

जे मुद्दे मांडले आहेत त्याची दखल घेऊन येणाऱ्या काळामध्ये त्याचा आऊट पुट आपल्याला निश्चित मिळेल आणि जे काही आतापर्यंत बोललेले आहे ते ही आपण तपासुन घेऊ पण यामध्ये डायरेक्टर हेल्थकडे चेक करण्याचे अधिकार आहेत आपण म्हटल्याप्रमाणे यामध्ये १० टक्के सेवा ह्या गरीबांसाठी आहेत आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना आपण सांगीतल्या प्रमाणे काही अनुज्ञेय सेवा आहेत आणि त्यांच्यासाठी

**राजेंद्र जैन :-**

१० टक्के गरीबों के लिये नही है १० टक्के युवर पावर कमिशनर पावर......................

**मा. आयुक्त :-**

बरोबर आणि २५ टक्के कर्मचाऱ्यांसाठी आहे.

**राजेंद्र जैन :-**

महानगरपालिका कर्मचारी नही शासकिय कर्मचारी ......

**मा.आयुक्त :-**

बरोबर तो उसका कार्यपालन होगा आणि त्यामध्ये संबंधित दवाखान्याच्या मॅनेजमेंन्टचा काही विरोध नाही.

**राजेंद्र जैन :-**

इकॉनॉमिक रिसर्च सेक्शन के समाज कल्याण विभागको बोला हुं उनसे पुछो जी.आर उनको मालुम नही आज तक इ.डब्लू.एस. वहा लिखा हुआ है ॲग्रिमेंन्ट के अंदर आप अपने अधिकारीओंको बुलाओ.

**मा. आयुक्त :-**

में वही आपको बोला उनका मेंने मिटींग लिया I complent to them to implement that provision that is my sagation to you आणि दुसरा मुद्दा सेव्हन इलेव्हनचा दवाखान्याबदलचा एक होता तो आपल्या ताब्यात घेण्याचा मी स्वःता जाऊन त्याची पाहणी केली त्याची पुर्ण साफसफाई आता होत आलेली आहे आणि त्याचे रजिस्ट्रेशन महानगरपालिकेच्या नावे रजिस्टर नोंदणी झालेली आहे. थोडयाच दिवसात तिथे आरोग्य केंद्र महानगरपालिकेचे चालु केले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

त्याला टॅक्स लावला का?

**मा. आयुक्त :-**

कारवाई चालु आहे.

**जुबेर इनामदार :-**

एवढी वर्ष लावली नाही ते एकत्र घेण्यात यावे.

**मा. आयुक्त :-**

माझी विनंती आहे वैयक्तिकरित्या जाण्यापेक्षा ह्या प्रस्तावावर चर्चा व्हावी.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण क्र. ३७ च्या ठरावाचे वाचन केले.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मी एक मुद्दा मांडू का आपल्या सगळ्यांचे एक मत असेल तर ह्यामध्ये येणाऱ्या सभेमध्ये आपण डिटेल डाटा बेस आणुन किती रक्कम लागेल ............

**मा . उपमहापौर :-**

प्रशासनाकडून पुर्ण माहिती भागवुन पुढच्या सभेत आम्ही ................

**मा. आयुक्त :-**

ह्या मध्ये दोन ठराव करण्याची गरज नाही एकमताने याच्यावर येणाऱ्या सभेत निर्णय करू.

**जुबेर इनामदार :-**

साहेब महानगरपालिकेचेच उत्तर आहे माझे नाही हे तुम्हीच दिलेले मला उत्तर आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सभागृहासमोर तुम्ही ह्या विषयाच महत्व किती आहे दाखवुन दिलेल आहे तुम्ही मोठ्या मनाने ह्या सभागृहाने तो विषय स्विकारलेला आहे. आताचा ठराव एक ओळीचा आहे.

**जुबेर इनामदार :-**

वैती साहेब हा ठराव तुम्ही वाचा मी वाचणे गरजेचे नाही मला याच्यातुन प्रशंसा नको आहे.

**मा. उपमहापौर :-**

आमचा ठराव एक ओळीचा आहे प्रशासनाकडून संपूर्ण माहिती घेऊन हा ह्या सभागृहाच्यासमोर आणणार आहोत. तुम्ही ठराव वाचला आम्ही आमचा ठराव पारीत करणार आहोत तुमचा ठराव पुन्हा मतदानाला येईल तुम्हाला अश्वस्त करून ठेवतोय की आम्ही ह्या पुढच्या सभेला हा विषय म्हणजे पुर्ण अभ्यासाअंती आणणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

मला वाटत ठराव मांडायची गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मी माझा ठराव पुर्ण करतो मी तुमच्या मताशी सहमत आहे हा विषय माझा अजुनही तसाच आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमचा ठराव निवेदन म्हणून वाचा ठराव करू नका.

**मा. महापौर :-**

महासभेमध्ये येईल तो विषय.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ठराव केला तोही परत घ्या महापौरानी on the house सांगाव पुढच्या सभेमध्ये...........

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव का जो विषय आज हुआ है वह हम महासभा में फिर से आगे की सभा में लेंगें.

**जुबेर इनामदार :-**

केलेला ठराव तो रद्द होतो का,ते आधी सांगा?

**मा. महापौर :-**

दोन्ही मागे घेतले .

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

दुसरा विषय असा आहे दुसरा महत्वाचा विषय आहे आज साहेब ५ महिने झाले १७.५० लाख रू. महानगरपालिकेचा खर्च होऊन रिक्षा येऊन अजुन पांघरूणाखाली आहेत.

**मा. आयुक्त :-**

तातडीने त्यावर कारवाई करण्यात येईल.

(सदरचा विषय पुढच्या महासभेत घेण्याचे ठरले.)

**दिनेश जैन :-**

सरजीभाई उदयलालजी पामेचा यांचा मृत्यु झाल्याने त्यांचा शोक प्रस्ताव आहे तसेच अभिषेक गुप्ता २१ वर्षाचा मुलगा होता त्याला शॉर्टसर्किट लागलेला आहे आणि त्याचा व्होकार्ड हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाला त्याचा शोक प्रस्ताव मी मांडत आहे.

**सुशिल अग्रवाल :-**

आमच्या कॉम्पलेक्सचे रहिवाशी दर्शन शिंदे २१ वर्षाचा तरूण ॲक्सीडंन्टमध्ये निधन पावला १५ मे ला त्याचा ही शोक प्रस्ताव मी मांडत आहे.

**दु:खवठा ठराव क्र. ३७ :-**

सरजीभाई उदयलालजी पामेचा यांचा मृत्यु झाल्याने त्यांचा शोक प्रस्ताव आहे तसेच अभिषेक गुप्ता २१ वर्षाचा मुलगा होता त्याला शॉर्टसर्किट लागलेला आहे आणि त्याचा व्होकार्ड हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाला त्याचा शोक प्रस्ताव मी मांडत आहे. तसेच भाईंदरचे रहिवाशी दर्शन शिंदे २१ वर्षाचा तरूण १५ मे रोजी ॲक्सीडंन्टमध्ये निधन पावला त्याचा ही शोक प्रस्ताव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- डॉ. सुशिल अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी काही क्षण आपल्या जागेवर स्तब्ध उभे राहुन हूतात्म्यास शांती देण्यासाठी शांत उभे रहायचे आहे.

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.३०**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व आस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण् कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही मीरा भाईंदर कामगार सेना, श्रमिक जनरल कामगार संघटना व झुंज जनरल कामगार युनियन यांचेकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.31/10/2002 रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगारपालिका आयुक्त यांचे समावेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-2017 मध्ये महानगरपालिका मा. महासभा दि.16/10/2017, ठराव क्र.05 अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे. :-

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2017-18 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1545 | 20,000/- | 30101666 |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 72 | 15,400/- | 1063883 |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 05 | 8,800/- | 44000 |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 71 | 8,250/- | 585750 |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 117 | 8,800/- | 816570 |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 5,500/- | 27500 |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील | 33 | 12,650/- | 301491 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रुग्णालय | | | |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 8,800/- | 26400 |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7,600/- | 38000 |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 30 | 8,250/- | 238563 |
| 12. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 06 | 13,200/- | 79200 |
| 13. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 8,800/- | 17600 |
| 14. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5,500/- | 33000 |
| | **एकुण** | 1913 | | 33522948 |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 188 | 17,600/- | 3289734 |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 18 | 15,400/- | 246400 |
| | **एकुण** | **206** | | **3536134** |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. 3,01,01,666/- तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदानापोटी एकूण रु.32,89,734/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

सन 2018-19 या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिकेच्या संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्रमिक जनरल कामगार संघटना मिरा भाईंदर महानगरपालिका कामगार युनिट | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | 23,500/- |
| 2. | मीरा भाईंदर महापालिका कामगार सेना | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | 25,000/- |
| | | संगणक चालक | 20,000/- |
| 3. | झुंज जनरल कामगार युनियन | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | 25,000/- |

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2018 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2017 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2017-18 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1518 | 20,000/- | 30360000 |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 15,400/- | 1062600 |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 05 | 8,800/- | 44000 |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.पी. कर्मचारी, आर.बी.एस.के./आहारतज्ञ पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 118 | 8,250/- | 973500 |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 120 | 8,800/- | 1056000 |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचार (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 5,500/- | 27500 |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 42 | 12,650/- | 531300 |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 8,800/- | 26400 |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7,600/- | 38000 |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 43 | 8,250/- | 354750 |
| 12. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 8,800/- | 17600 |
| 13. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5,500/- | 33000 |
| | **एकुण** | **1936** | | 34524650 |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 याया वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 183 | 17,600/- | 3220800 |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 20 | 15,400/- | 308000 |
| | **एकुण** | **203** | | **3528800** |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु.3,03,60,000/- (अक्षरी रुपये तीन कोटी तीन लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.3.15 कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. 32,20,800/- (अक्षरी रु. बत्तीस लाख वीस हजार आठशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.35/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मागील वर्षी मा. महासभेने मंजूर केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

गोषवारा प्राप्त दि. ११/१०/२०१८ वेळ ११:३०am
मा. ~~स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ...63... वर्ष :- 2018/19

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 10/10/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

११/१०/२०१८
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## मा. महासभा दि.१८/१०/२०१८

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.७५:- भाईंदर (प) शिवसेना गल्ली येथिल स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

सदर ठिकाणी महानगरपालिकेची मुख्य जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असुन बऱ्याच इमारतींच्या खालून गेलेली आहे. तसेच सदर जलवाहिनी ७ ते ८ फुट खोलवर असून जीर्ण झालेली आहे. त्याकरीता दुरुस्तीचे काम करण्यास त्रासदायक होत आहे. सदर परिसरात जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. सदर कामास मा. विशेष महसभा दि.०२/०३/२०१७, ठराव क्र.१०६ अन्वये रु.१,१४,५३,९००/- इतक्या रकमेस मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली होती. परंतु सदर निविदेस कमी प्रतिसाद तसेच जास्त दराची प्राप्त होत आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक नव्याने सन २०१६-१७ च्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार सदर कामाचा अंदाजित खर्च रक्कम रु.१,७७,९९,८९६/- इतका होत असून सुधारीत मान्यता घेण्यात आलेली आहे.

सदर कामी रक्कम रु.१,७७,९९,८९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त

मिरा-भाईदर महानगरपालिका

१२/९/१८

गोषवारा प्राप्त दि. २९/०८/२०१८ वेळ. १२:०० ..

मा. ~~स्थायी समिती~~ मा. महासभा गोषवार नोंद

रजिस्टर अ. क्र ......५४...... वर्ष :- २०१८-१९

29/08/2018

लिपिक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. १९/१०/२०१८.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र ( ७६ ) :- आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीमधील हायलँड रस्त्यावरील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी ट्रेंचलेस पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमार्फत पूर्णठेव तत्वावर अंथरणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मिटर व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशत: पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

सबब सदर ठिकाणी अदयावत पध्दतीचा वापर करुन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी तसेच कमी परीमाणाच्या लांबीसाठी त्याक्षेत्रातील तज्ञ ठेकेदार सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. तसेच सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी योग्य त्या व्यासाची मॅक्रोटंनलींग मशिन तसेच याकामाचा अनुभव असणारे ठेकेदार फारच कमी आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजने अंतर्गत मॅक्रोटंनलींग पध्दतीचा वापर करुन १५०० मि.मी. व्यासापर्यंतच्या मलवाहिन्या अंथरण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या कामांतर्गत अतिरिक्त बाब म्हणून / स्वतंत्र निविदेद्वारे विषयांकीत कामातील फक्त मॅक्रोटंनलींगचे काम पूर्णठेव तत्त्वावर करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन त्यानी सदरचे काम करुन देणेस सहमती दर्शविलेली आहे.

या कामासाठी लागणारे १५०० मि.मी. व्यासाचे केसिंग पाईप मिरा भाईंदर महानगरपालिका उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदरच्या केसिंग पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची कॅरिंग पाईप अंथरण्याचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

ठाणे महानगरपालिकेने सदरच्या कामाबाबतची निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी कामाचा अपेक्षीत खर्च रु. १.९८ कोटी पैकी ५० टक्के रक्कम रु. ९९.०० लक्ष निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी व उर्वरीत ५० टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी अपेक्षीलेली आहे.

सदरच्या कामासाठीची अंदाजपत्रकीय किंमत रु. २,२०,६०,२२३/- इतकी आहे.

सदर काम ठाणे महानगरपालिके कडून पूर्णठेव तत्त्वावर करुन घेणे आवश्यक असून त्याकरिता एकूण रु.१.९८/- कोटी इतका खर्च अपेक्षीत असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त

मिरा-भाईदर महानगरपालिका

१/५/१८.

गोषवारा प्राप्त दि. २९/०९/२०१८ वेळ. १२:०० वा.

~~स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र ....५३...... वर्ष :- २०१८-१९

(सही) २९/०९/२०१८

लिपिक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

**महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: अभियो-1312/ प्र.क्र.30/पुनंबांधित-1/11अ, दि. 12 फेब्रुवारी, 2013 मधील परिच्छेद 9 (क) नुसार लाचेचा सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी असे आदेश आहेत. या आदेशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 4 नुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना महानगरपालिका अधिनियमातील नियम 56 (2) मधील तरतुदीनुसार सेवेतून निलंबीत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती *नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील.*"

डॉ. प्रकाश हरिश्चंद्र जाधव, प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग यांचेबाबत मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ अन्वये जा.क्र.मनपा/आस्था/939/2018, दि.03/09/2018 रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ नुसार मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
6/9/18

जिस्टर अ. क्र ...

मिरा भाईदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ७३ :- दि. १८/०७/२०१८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ७५ :-

दि. १८/०७/२०१८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. रोहिदास पाटील

अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.१८/ १० /2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (७८)** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मागणी मा. उप महापौर, श्री. चंद्रकांत वैती यांनी केलेली असून सदर काम त्यांच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर कामाचे रु.१,५०,००,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या रु.१५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 10/9/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-7

गोषवारा प्राप्त दि. १०/९/२०१८ वेळ ०२:३०

प्रा. ~~स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र ५९ वर्ष :- २०१८-१९

१०/०९/२०१८

लिपिक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग
// प्रा. महासभा दि. १०/१०/२०१८

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (८०) :-** राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पायथ्या समातंर ३० मीटर रुंद विकास योजनेतील रस्ता विकसित करणे व नाला बांधणे कामाला सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उदयान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातुन वाहणारे पावसाचे पाणी महानगरपालिका क्षेत्रात येत असल्याने सदर पाण्याचे नियोजन करण्यासाठी सल्लागार नेमणेस मा. महासभा दि.१६/१०/२०१७ ठराव क्र.०६ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे झालेल्या बैठकीत दहीसर चेक नाका ते साई पॅलेस हॉटेल घोडबंदर या राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ या रस्त्यास ३० मीटर रुंदीचा समांतर रस्ता तयार करणे व रस्त्यालगत नाला बांधण्याचे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने सादर केल्यास प्राधिकरणामार्फत सदर काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्या अनुशंगाने सदर कामाचा मे. ५ इलेमेन्ट डीझाईन सेल मार्फत तयार करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगावकर)
आयुक्त 10/10/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-11

गोषवारा प्राप्त दि. १०/१०/२०१८ रु. ३.५०

मा. स्थायी समिती / [illegible] ठरावाची ठराव नोंद

रजिस्टर अ. क्र. ५९ वर्ष - २०१८/१९

१०/१०/१८

[illegible]

मिरा भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. महासभा दि.१९/ १० /2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (८९) :-** "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" अंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरीता रस्ते त्याखालील पुल याकरीता ४.०० कोटी व स्मशानभूमी नुतनीकरणासाठी रु. १.०० कोटी असे रु.५.०० कोटीच्या मर्यादेत कामे घेण्यास व ज़िल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी नगरविकास विभागाने दि. १२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविलेले आहे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि. १२/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मा. महासभेचा ठराव, काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करण्यास तयार असल्याचे प्रमाणपत्र, शासन अनुदानापेक्षा अधिकचा खर्च लागल्यास तो मनपा करण्यास तयार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, सदर काम अन्य कोणत्याही योजनेतून हाती घेतलेले नाही व प्रस्तावित नाही असे प्रमाणपत्र, सदरचे काम विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीनूसार असलेल्याचे प्रमाणपत्र, सदर कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची ताब्यातील व सार्वजनिक वापराची असल्याचे प्रमाणपत्र व विभागीय आयुक्त यांनी पुरविलेल्या छाननी पत्रकानूसार सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

प्रस्तावित रक्कमेतून मौजे चेणा येथील पाटील पाडा, बेलकरी पाडा, वाड्याचा पाडा इ. कडे नदीवरील दोन पुल ओलांडून सर्व्हे क्र. ९८ पर्यंत जाणारा रस्ता व दोन पूलांचे काम प्रस्तावित आहे. सदर रस्ता विकास योजनेत दर्शवून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी रु.४.०० कोटी रक्कम वापरता येणार आहे. त्याचप्रमाणे वर्सोवा, दासगुल पाडा, माशाचा पाडा, घोडबंदर गाव येथील स्मशानभूमीचे बांधकाम व नूतनीकरण करण्यासाठी रु.९९,७३,९००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

वरील दोन्ही कामे "मुलभूत सोई सुविधाचा विकास" अंतर्गत हाती घेण्यास आवश्यक सर्व कार्यवाही करण्यास तसेच मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्या पत्रातील उपरोक्त मागणीनूसार आवश्यक प्रमाणपत्रासह प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

४/१०/१८

PC-3/DK/2018-19/MG-8

गोषवारा प्राप्त दि. ०७/१०/२०१८ वेळ ०३:१००५

मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र. ५८ वर्ष :- २०१८-१९

दिनांक : ०७/१०/२०१८

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## महासभा दि.१९/१०/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८२ ) :-**

**विषय :** भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन व मिरा रोड रेल्वे स्टेशन मधील रेल्वे उड्डाणपुल, फुट ओव्हर ब्रीज वर शेड बांधणे व दुरुस्ती करणेसाठी रेल्वे प्रशासनास रक्कम प्रदान करणे बाबत.

**संदर्भ:** उप विभागीय अभियंता (ब्रीज) यांचेकडील W421/2/795 विभागीय कार्यालय मुंबई सेंट्रल दि.२५/०७/२०१८ रोजीचे पत्र.

भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरा रोड रेल्वे स्टेशन दरम्यान भाईंदर रेल्वे स्टेशन नंतर महानगरपालिकेचे रेल्वे प्रशासनामार्फत Deposite work नुसार दोन फुट ओव्हर ब्रीज व एक उड्डाणपुल बांधण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रीजवर शेड बांधणे व फुट ओव्हर ब्रीजची दुरुस्ती तसेच उड्डाणपुलची दुरूस्ती करणेची आवश्यकता असल्याने रेल्वे प्रशासनाकडे अंदाजपत्रक तयार करुन देण्याची विनंती केली होती. सदर दोन्ही कामे रेल्वेच्या अंतर्गत असल्याने रेल्वे मार्फत Deposite work नुसार कामे करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासनाने सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रीज साठी रू.२,४०,८३,०००/- रक्कमेची मागणी केली आहे. उपरोक्त कामासाठी लागणारी रू. २,४०,८३,०००/- इतक्या रक्कमेची तरतुद सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात करावयाची आहे. व सदर रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट Sr. Divisional Finance manager, Western Railway Mumbai Central यांचे नावे काढणे बाबत रेल्वे प्रशासनाने कळविले आहे. रेल्वे प्रशासना मार्फत सदर रक्कमे साठी पाठपुरावा होत असुन सदर पुल दुरूस्ती न केल्यास काही दुर्घटना होऊ शकते. सदर खर्चासाठी पुर्नःविनीयोजना व्दारे तरतुद उपलब्ध करून रेल्वे प्रशासनास रक्कम भरावी लागेल.

तरी सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 10/10/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा [illegible] दि. १०/१०/२०१८ वेळ ३.४०

[illegible]

रजिस्टर अ.क्र. ६० वर्ष २०१८/१९

१०/१०/१८

नगररचना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ( 43 ) - मौजे नवघर, स.क्र. 267/1 ते 3, 259/4, 260/3, 265/2 ते 4, 266/1 ते 6 या जागेच्या वापरामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजनेप्रमाणे विषयांकित जागा नाविकास क्षेत्रात सामाविष्ट असून भागशः 30.0 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहेत. तसेच प्राप्त सी.आर.झेड. च्या वर्गीकरणाच्या नकाशाप्रमाणे भागशः सी.आर.झेड. ने बाधीत होत आहेत.

सदर जागेपैकी मौजे नवघर, स.क्र. 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेमधील सी.आर.झेडं. ने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत सी.आर.झेड. ने बाधीत नसलेल्या क्षेत्रामध्ये जिमनॅशियम व क्लब हाऊसच्या इमारतीसाठी दि.18/02/2017 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी अन्वये देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतुदीनुसार 30.00 मी. किंवा त्यापेक्षा जास्ती रुंदीच्या रस्त्यालगतच्या नाविकास क्षेत्रामध्ये 30.00 मी. अंतरापर्यंत रहिवास वापर अनुज्ञेय असल्यामुळे त्याप्रमाणे परवानगी मिळणेसाठी विकासकांनी महानगरपालिकेकडे मागणी केल्याप्रमाणे याबाबत शासनाकडे दि.07/07/2016 व दि.06/11/2017 केलेली असून तद्नंतर विकासकांनी विषयांकित जागा 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असून त्याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल्ससाठी (1 + 1) चटईक्षेत्रासाठी बांधकाम परवानगी मिळणेस दि.22/03/2018 रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्याप्रमाणे याबाबत शासनाने दि.13/04/2016 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस अर्जदार यांनी अपेक्षिलेला वापर राष्ट्रीय महामार्ग / राज्य महामार्गालगत अनुज्ञेय असल्यामुळे अर्जदाराची विनंती मान्य करणेत येत असल्याचे कळविलेले आहे.

सदर विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल या प्रयोजनासाठी मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दि.27/06/2018 अन्वये व मा. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी दि.29/06/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस नाहरकत दाखले दिलेले आहेत.

सदर विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेलसाठी अनुज्ञेय करावयाच्या मुळ चटईक्षेत्र निर्देशांकासह प्रिमीयम आकारुन अनुज्ञेय करावयाच्या अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत मार्गदर्शन मिळणेस महानगरपालिकेने दि.05/09/2018 अन्वये शासनास विनंती केलेली आहे.

त्यानंतर विकासक यांनी मिरा भाईंदर हे शहर मुंबई - ठाणे लगतचे प्रमुख व झपाट्याने वाढणारे शहर असून राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 लगत असल्यामुळे तसेच शहरामध्ये व शहरालगत एस्सेलवल्ड, पॅगोडा, ज्युडीशियल अॅकेडमी, सुभाषचंद्र बोस मैदान (ज्यामध्ये प्रस्तावित स्टेडियम आहे) असे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वास्तु व अम्युझमेंट पार्क असल्यामुळे येथे येणा-या उद्योजक व

...... 1.0) प्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करणेबाबत किंवा सदर जागा रहिवास / वाणिज्य वापरामध्ये फेरबदल करणेस शासनास विनंती केलेली आहे.

नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 मधील तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करुन मंजूरीसाठी शासनास सादर करु शकत असल्यामुळे अर्जदार यांच्या विनंतीस अनुसरुन मंजूर विकास योजनेतील फेरबदल शासनास प्राप्त झाल्यास त्यावर शासन गुणवत्तेवर निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.06/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सबब सदर प्रकरणी निर्णय होणेसाठीचा अहवाल मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 9/10/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. /२० वेळ...........
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ.क्र ................ वर्ष :- ...............

[illegible]
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ( ) - मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) या शासकीय जागा Bus Bay साठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेत फेरबदल करणेबाबत मा. महासभेत गोषवारा सादर करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) सह इतर सार्वजनिक उपक्रमासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयात दि.01/10/2018 रोजी बैठक पार पडलेली आहे. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) ही दि.14/05/1997 रोजी मंजूर होवून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले असून वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर होवून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेनुसार मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन) ही जागा भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. तसेच स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) ही जागा मंजूर विकास योजनेनुसार भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा वाणिज्य विभागात (C-2) मध्ये सामाविष्ट आहे.

सदर जागा 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असल्याने तसेच सदर जागेची मालकी सरकारी असल्याने या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेऊन 45.0 मी. रुंद रस्त्यालगत सार्वजनिक वाहतुकीच्या बस सेवेस चालना मिळणेस व वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून Bus Bay साठी उपयोगात येऊ शकणार असल्याची मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष मा.आ.श्री. नरेंद्र मेहता, मा.आयुक्त सो., यांचे उपस्थितीत चर्चा होवून याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचा अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेमध्ये 45.0 मी. रुंद विकास योजना रस्त्यासाठी फेरबदल करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीने शासनास सादर करणेबाबत चर्चा झालेली आहे.

सबब 45.0 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगतच्या विषयांकित जागा Bus Bay साठी 45.0 मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठीचा अहवाल मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

6/10/18

**//गोषवारा//**

**प्रकरण क्र. ८६ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे करण्यांत येणारे सार्वजनिक उत्सव, सणाकरीता बांधण्यांत येणाऱ्या मंडपाशेजारी जाहिरात फलक, बॅनर्स, लावण्यास परवानगी देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज, कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचेकडे दि.०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे. सदर टिपणीस मान्यता देऊन मा.आयुक्त सो. यांनी मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा.पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते. याअनुषागाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती ) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर/कटआउट साठी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा.महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा.महासभा दि०५/०९/२०१८ ठराव क्र. ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका 15/10/18

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.** १८/१०/२०१८

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (87)** :- मोर्वा येथे जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोर्वा येथे नविन शाळा इमारत बांधलेली आहे. सदर शाळेत जागा रिकामी असुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रासाठी जागा मागणी करण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. 20/03/2013 ठराव क्र.67 अन्वये महानगरपालिकेचे विरंगुळा केंद्रासाठी धोरण निश्चित आहे. तसेच नव्याने धोरण देखिल ठरविण्याची प्रक्रीया सुरु आहे. त्यानुसार जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करुन विरंगुळा केंद्र सुरु करण्याची प्रक्रीया करण्यात येईल. प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

१०/१०/

PC-5/DK/2018-19/ MG-2

गोषवारा प्राप्त दि. १०/१० २०१८ वेळ ४.४५ वा.

मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र. ६९ वर्ष : २०१८/१९

१०/१०/१८

नगरसचिव

सभा सचिवालय

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**

**ता.जि.ठाणे, 401101**

**मा. महासभा**

**सभा दि.२८/१० /2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं. ८८ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत "ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र" या संबंधि धोरण निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ :- 1. मा. उप-महापौर सो. यांचे दि.27/07/2018 रोजीचे पत्र.**

**2. ज्येष्ठ नागरीक विरंगुळा संस्था, भाईदर (पु) यांचे दि.26/07/2018 रोजीचे पत्र.**

**3. मा. महासभा दि.20/03/2013 प्रकरण क्रं.58, ठराव क्रं.67 नुसार विरंगुळा केंद्रासाठी निश्चित करण्यात आलेले धोरण.**

**1) विरंगुळा केंद्र :-**

विरंगुळा केंद्र म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व 60 वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले केंद्र.

**2) विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-**

- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विशेषत: "बगीचा" किंवा "करमणूकीची मैदाने" "आर.जी" यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकुण भुखंड क्षेत्राच्या तुलनेत 10% पेक्षा अधिक असणार नाही तथापि किमान 500 चौ.फुट बांधकाम उपलब्ध् होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.
- सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान 2 किमी अंतर असावे.

**3) विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-**

- विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | साहित्य (नग) |
|---|---|---|
| 1 | बुध्दीबळ | 02 |
| 2 | कॅरम | 02 |

| | | |
|---|---|---|
| 3 | दुरदर्शन संच | 01 |
| 4 | सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची | 01 |
| 5 | वृत्तपत्रे | 03 |
| 6 | कपाट, (मोठे) | 01 |
| 7 | टेबल | 01 |
| 8 | प्लास्टिक खुर्ची | 50 |
| 9 | वजन मोजणी यंत्र | 01 |
| 10 | वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे | 01 |
| 11 | शेकण्याची इलेक्ट्रीक बॅग | 01 |
| 12 | सिलिंग फॅन | 04 |
| 13 | प्रथमोपचार पेटी | 01 |
| 14 | कचरा कुंडी | 02 |
| 15 | कॉम्प्युटर | 01 |
| 16 | प्रिंटर व स्कॅनर | 01 |
| 17 | कॉम्पयुटर टेबल | 01 |
| 18 | स्टॅण्ड फॅन | 04 |
| 19 | लाईटचे फोकस | 06 |
| 20 | दिवाळी अंक | कोणतेही 04 |
| 21 | लायब्ररीसाठी पुस्तके | उपलब्धतेनुसार |
| 22 | वॉटर फिल्टर् | 01 |
| 23 | भजनासाठी वादवृंदासाठी हार्मोनियम, पखवाज, तबला-डगा | प्रत्येकी एक |
| 24 | शिसाचे चाळ | 10 नग |
| 25 | सांऊड सिस्टिम Mixer 12 Channel, Ahuja 500W, Amplifier | प्रत्येकी 1 नग |
| 26 | Ahuja speaker | 04 नग |
| 27 | योगा मॅटस | 100 नग |

- उदयानातील पाणी व विदयुत जोडणीमधुन विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विदयुत जोडणी देता येईल.

- सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी 07.00ते 10.00 व संध्याकाळी 05.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत असेल अपावादात्मक् परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

**4) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-**

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) व (इ) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त् तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.
- सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना विरंगुळा क्षेत्राच्या 500 मीटर परीघात वास्तव्यात असणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

- सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवुन करण्यात येईल.
- सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

**5) विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-**

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित करण्यात येत असुन त्याबाबत संबंधित संस्थाना रु.100 च्या स्टॅम्प् पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक् असेल.

- विरंगुळा केंद्राचा व्यवसथापन कालावधी सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.
- विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ती/संस्था/आस्थापना इत्यांदीनी हस्तांतरीत करता येणार नाही.
- विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ् नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य् विषयक हित साधले जातील यासाठीच वापरणे अपेक्षित आहे. याव्यतीरीक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक् राहील.
- सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरीकांना कोणताही भेदभाव न करता प्राधम्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश निशुल्क् असेल.
- विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structuer) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही. जर संरचनेत काही बदल करता येणार नाही. जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राच्या व्यवंस्थापन करारपत्र रद्द करुन ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडुन करुन घेण्यात येईल.
- विरंगुळा केंद्राची देखभाल देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक् असेल.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य् व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.
- विरंगुळा केद्राकरीता संस्थेस महानगरपालिकेकडुन कोणतेही अनुदान, कर्मचारी इत्यांदी उपलब्ध् करुन दिले जाणार नाहीत. सदर बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध् करावयाच्या आहेत.
- व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावुन घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क् सदर

कर्मचाऱ्यांना असणार नाही. सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. त्यातुन कोणतेही कायदेशीर, आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वत:च्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.

- विरंगुळा केंद्र इमारतीची महानगरपालिकेस गरज भासल्यास संबंधित संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महानगरपालिकेस तात्काळ उपलब्ध करुन दयावी लागेल.
- दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.
- महानगरपालिकेसोबत संबंधित संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पुर्ण होण्यापुर्वी अथवा महानगरपालिकेस वाटेल त्यावेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्राचा ताबा काढुन घेता येईल.
- कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत 30 दिवस अगोदर महानगरपालिकेस लेखी कळवुन जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक् असेल.
- विरंगुळा केंद्राची संपुर्ण मालकी महानगरपालिकेची राहील या मालमत्तेवर महापालिका व्यतीरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.
- सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थाव्दोर कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क् प्रवेश फी इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेमार्फत फी/शुल्क्/भाडे आकरण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप-आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.
- सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य् विषयक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.
- विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

**ज्येष्ठ नागरीकांसाठी काही नविन योजना राबवावयाच्या आहेत. सदर योजना खालीलप्रमाणे :-**

1. ज्येष्ठ नागरीकांसाठी साहित्य् पुरवठा करणे.
   1) काठी, 2) वॉकर, 3) कमरेचा पट्टा, 4) मानेचा पट्टा,
2. ज्येष्ठ नागरीकांसाठी मनोरंजन कार्यक्रम आयोजित करणे.
3. ज्येष्ठ नागरीक दिन साजरा करणे.

4. ज्येष्ठ नागरीकांसाठी बैठे खेळाच्या स्पर्धांचे आयोजन करणे उदा. कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, हस्तकला व इतर वेळोवळी ठरविण्यांत आलेल्या स्पर्धा.
5. ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.2000/- आर्थिक मदत करणे.
6. ज्येष्ठ नागरीक महिलांसाठी हळदीकुंकू व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
7. ज्येष्ठ नागरीकांकरीता सहलीचे आयोजन करणे.

तरी सदर विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी सदरचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर) 10/10/18
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. १०/१०/२०१८ वेळ ५.१५ वा.

मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र ................ वर्ष :- २०१८/१९

१०/१०/१८
५.१५ वा.

नगररचना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/ १० /२०१८

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- ८९

विषय :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामाची निविदा मागविणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित ७९ चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठयाप्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळ्या दरम्यान मोठयाप्रमाणात पावसाचे पाणी जामा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पुर्ण करण्यात येत असतात.

एकंदर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मोठयाप्रमाणावर डासांची उत्पत्ती होवून डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठयाप्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असुन दरवर्षी प्रमाणे विविध नामंकित कंपनीची डास नाशके व इतर डास नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे डासनाशके, अळी नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकाचे नाव | वार्षिक अंदाजित परिमाण |
|---|---|---|
| २४. | Alphacypermtrin 10% AC | २००० लिटर |
| २५. | Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved) | १००० किलो |
| २६. | Bifenthrin 10% WP ISI mark | २०० किलो |
| २७. | Cyfluthrin 5%EW | २००० लिटर |
| २८. | Deltamethrin 2.5% SC | २००० लिटर |
| २९. | Dichlorovos 76% EC | ५०० लिटर |
| ३०. | Diflubenzeron 2% Tablet | २०० किलो |
| ३१. | Diflubenzeron 25%WP | २०० किलो |
| ३२. | Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2% | ५०० लिटर |
| ३३. | Harbal Sanitizer | २००० लिटर |
| ३४. | Jet Spray Machine | ५ |
| ३५. | Lambda Cyhalothrin 9.7% CS | ५०० लिटर |
| ३६. | M.L.O. Oil | १०००० लिटर |
| ३७. | Malathion 50% EC | ५०० लिटर |
| ३८. | Novaluron 10% EC | २०० लिटर |
| ३९. | Polydimethylsioxane (PDMS) 70% | २०० लिटर |

| | | |
|---|---|---|
| | Propoxure 2% Bait | १०० किलो |
| | ?ropoxure 20% E.C (ISI Mark) | ५०० लिटर |
| | ?rethrum 2% E.C (ISI Mark) | १००० लिटर |
| | ?ethrum 2% Ettract (ISI Mark) | १००० लिटर |
| | ?sene Oil E ISI mark | ५००० लिटर |
| ?५. | Temephos 50% EC ISI mark | ३००० लिटर |
| ४६. | Spray Pump (Bronze – 12 Liter ) | १०० नग |

महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. ३,००,००,०००/- तरतुद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु. २,००,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याने सदरचा प्रस्ताव इ-टेंडरद्वारे निविदा मागवून खरेदी करणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २५/०९/२०१८ वेळ ०३:०० at.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ५५ वर्ष २०१८-१९

२५/०९/२०१८
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १९/१० /२०१८

//गोषवारा//

**प्रकरण क्र ९५ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग यांचे कडील सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरीक्षण अहवाल सादर करणे बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या वार्षिक लेख्याचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाकडुन पुर्ण झाले असुन संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरीक्षण अहवाल त्यांचेकडील पत्र क्र.स्था.१८/ब/मिरा. भाईंदर मनपा/लेपा/२०१३-१४/४९५ व २०१४-१५/४९२ दि.२४/११/२०१७ अन्वये मा. आयुक्ताकडे सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाच्या प्रती सचिव कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७-अ अन्वये सन २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षामधील लेखापरीक्षण अहवाल मा.महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

आयुक्त

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

14/8/18

गोषवारा प्रा । दि. २८/०८/२०१८ वेळ १२:४५ वा.

~~प्रा. स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद

रजिस्टर अ. क्र ४६ वर्ष : २०१८-१९

२८/०८/२०१८

लिपिक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/2018

प्रकरण क्र. ( ) - घोडबंदर येथील 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापासुन किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी 24.00 मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये मंजूर विकास योजना आराखडयात दर्शवून फेरबदलास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ( ) -

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर किल्ला ही एकमेव ऐतिहासिक वास्तु शहरास लाभलेली आहे. सदील किल्ला हा पुरातत्व विभागाच्या अखत्यारित असुन शिवकालीन शुरवीर योद्धांचा इतिहास पर्यटकांना व शहरवासियांना कळणे गरजेचे आहे. सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी घोडबंदर गावातुन एकमेव रस्ता उपलब्ध असुन त्याची सरासरी विद्यमान रुंदी सुमारे 6 ते 8 मीटर एवढी आहे. त्यामुळे पर्यटकांना किल्ल्यापर्यंत जावयाचे असल्यास घोडबंदर येथील गोवळादेवी मंदिरापर्यंत बसने जाऊन पुढे एक किलोमीटर पर्यंत चालत जावे लागते. पर्यटकांच्या खाजगी वाहनांसाठी किल्ल्याजवळ वाहनतळाची सोय उपलब्ध नाही. सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी योग्य रुंदीचा रस्ता असणे आवश्यक असल्याने मंजूर विकास योजना आराखडयातील नियोजित 60.00 मी. रुंदीच्या रस्त्यापासून घोडबंदर येथील उघाडीमार्गे किल्ल्यापर्यंत मौजे घोडबंदर, स.क्र. 228पै., 49पै., 50पै., 24पै., या जागेतून 24.00 मी. रुंदीचा रस्ता नव्याने प्रस्तावित करुन सदर प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये मंजूर विकास योजना आराखडयात फेरबदल करणेचा प्रस्ताव शासनास सादर करणेकामी विचार विनियम करुन निर्णय होणेसाठी मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगावकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
15/10/18

**// गोषवारा //**

मनपा महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण 2(1) (K) नुसार

**प्रकरण क्रं.८८:- "महापौर चषक 2018-19" चे आयोजन करणेबाबत.**

~~ठराव क्रं.~~ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत सन 2018-19 या वर्षात "महापौर चषक" स्पर्धांचे आयोजन करावयाचे असुन, सदर महापौर चषक स्पर्धेमध्ये खालील नमुद प्रमाणे खेळाचे आयोजन करावयाचे आहे.

| तपशिल | वयोगट |
|---|---|
| सांघिक कला स्पर्धा | **लोकनृत्य् व समुह गायन** |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| मैदानी स्पर्धा | **100मी./200मी./400मी.धावणे/गोळाफेक/थाळीफेक/भालाफेक/स्केटींग/बुध्दीबळ** |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| सांघिक क्रीडा स्पर्धा | कबड्डी/खो-खो/वॉलीबॉल (पासिंग) /लंगडी/लगोरी/महिला क्रिकेट (खो-खो, कबड्डी शालेय गट/इतर (क्लब/संस्था) असा स्पष्ट् उल्लेख असावा) |
| वैयक्तिक स्पर्धा कला विभाग | 12 ते 19 वर्षाखालील<br>कथाकथन-मराठी, हिंदी, इंग्रजी<br>निंबध स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वक्तृत्व् स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी |
| वैयक्तिक स्पर्धा कला विभाग (खुला गट) | कथाकथन - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>निबंध स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वत्कृत्व् स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>पाककला स्पर्धा - शाकाहारी/गोड पदार्थ<br>रंगावली<br>हस्तकला |
| जलतरण | **50 मी. फ्रीस्टाईल, 50 मी. बटरफ्लाय** |

| | | |
|---|---|---|
| **इन्डोर स्पर्धा** | **कॅरम - एकेरी**<br>**टेबल टेनिस - एकेरी व दुहेरी**<br>**बॅडमिंटन - दुहेरी** | |
| | 12 वर्षाखालील | |
| | 14 वर्षाखालील | |
| | 17 वर्षाखालील | |
| | 19 वर्षाखालील | |
| | खुला गट | |
| **कराटे स्पर्धा** | **6 वर्ष ते 18 वर्षावरील** | |

सदर महापौर चषक 2018-19 या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन 2018-19 च्या अंदाजपत्राकामध्ये रु.125 लाखांची तरतुद करण्यात आलेली होती. सदस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.1 कोटी तरतुद शिल्लक आहे. "महापौर चषक 2018-19" चे आयोजन करण्यासाठी रु.1 कोटी खर्च अपेक्षित आहे. तरी सदर "महापौर चषक 2018-19" चे आयोजनासाठी इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत करण्याकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय मंजुरीसाठी तसेच सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 (1) (के) अन्वये दि.19/10/2018 रोजीच्या महासभेत घेणेबाबत मंजुरीस्तव शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**